मार्च १९८६) (किंमत १ रुपया

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



श्रीसाईलीला
मार्च १९८६

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान.
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

## श्री साईकाव्य बहार विशेषांक

**वर्ष ६४ वे]** **किंमत १ रुपया** [अंक १२ वा

**दूरध्वनी ४१२२५६१**

: कार्यालय :

**"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.**

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा विश्वभर प्रसार करणे हे श्री साईलीलेचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



## श्री साई वाक्सुधा

बाबा शिरडी सरोवरींचे कमळ।
भक्त सेविती परिमळ।
अभागी भक्तांचे वाट्यांस चिखल।
सर्व काळ कालविती ॥११२॥

कोणा ना सांगे आसन
प्राणापान वा इंद्रिय दमन।
मंत्र तंत्र वा यंत्र-भजन।
फुंकणें कान तेंही ना ॥११३॥

लौकिकी दिसती लोकाचारी।
परी अंतरीची आणिकपरी।
अत्यंत दक्ष व्यवहारीं।
न ये कुसरी दुजयातें ॥ ११४ ॥

भक्तार्थ धरिती आकार।
तदर्थचि तयांचे विकार
हे संतांचे लौकिकाचार।
जाणा साचार सकळिक ॥११५॥

साई महाराज संतनिधान।
केवळ परमानंद-स्थान
त्या माझें साष्टांग वंदन।
निरभिमान निर्लेप ॥११६॥

— श्री साई सच्चरित अध्याय १० वा

## सुविचार

घृष्टं घृष्टं पुनरपि पुनश्चन्दनं चारुगन्धं
छिन्नंछिन्नं पुनरपि पुनः रचादु चैवणक्षुकाण्डम
दग्धंदग्धं पुनरपि पुनः कांचनं कांतवर्ण
प्राणोऽपि प्रकृति विकृतिर्जायते नो त्तमानान् ॥

★

पुन्हा पुन्हा कितीही उगाळले
तरी चंदनाचा वास गोड तो गोडच.
पुन्हा पुन्हा तोडले तरी ऊस गोड
तो गोडच. पुन्हा पुन्हा तापविले
तरी सोन्याचे सुंदर तेज कायमच.
त्याचप्रमाणे सज्जन माणसांचे
प्राण गेले तरी आपला मूळ
स्वभाव ते बदलत नाहीत.


या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांच्या मताशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# श्री साईलीला अनुक्रमणिका मार्च १९८६


| क्रमांक | शिर्षक | लेखक-कवी नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | 'संपादकीय' | — | ४ |
| २ | मध्यप्रदेशातील भव्य साई वास्तू | — श्री. गजाननराव निरखे | ७ |
| ३ | उठा उठा साईनाथा | — कु. रोहिणी जाधव | १० |
| ४ | महाप्रभु श्री स्वामी समर्थ | — सौ. मृणालिनी पुंडलिक | ११ |
| ५ | श्री साईनाथांचा शरणार्थी-१० | — श्री. विश्वास खेर | १२ |
| ६ | तुझा रे झालो | — श्री. राजेश परळकर | १५ |
| ७ | साई कृपा-माझा मुलगा | — सौ. रा. नं. सावंत | १६ |
| ८ | साईध्यास | — श्री. अशोक लोटणकर | १७ |
| ९ | कर्मयोगाचा महिमा | — ॲड. कृष्णराव थिटे | १८ |
| १० | कर्मयोगी | — सौ. शांता सरोदे | २१ |
| ११ | योगीराज अरविंद | — श्री. सत्यवान गायकवाड | २२ |
| १२ | श्री साईलीलाचे १२ वे स्नेहसंमेलन | — श्री साईनंद | २६ |
| १३ | कफनी | — डॉ. सौ. सुमती खानविलकर | ३५ |
| १४ | प्रचिती | — श्री. गोविंद गोखले | ३७ |
| १५ | जयामनी जैसा भाव | — कु. साधना चित्तर | ३८ |
| १६ | पत्रं पुष्पं फलं तोयं | — श्री. अनिल रसाळ | ३८ |
| १७ | सच्चिदानंद | — सौ. प्रतिभा तेंडुलकर | ४० |
| १८ | पाय बरा झाला | — कु. सुगंधा मरूडकर | ४१ |
| १९ | धावा | — श्री. प्रकाश दळवी | ४१ |
| २० | श्री साईची उदारता | — श्री. वि. म. हटवार | ४२ |
| २१ | साई प्रेमाचे मनोगत | — श्री. प्रदीप पिरणकर | ४३ |
| २२ | श्री. बाबांच्या उदीचा महिमा | — सौ. मीरा ढोक्रे | ४४ |
| २३ | सहजीवन व सहज जीवन | — श्री. शाम जुवळे | ४६ |
| २४ | भगवंताचे अधिष्ठान | — सौ. सुलोचना जोशी | ४८ |
| २५ | साई भक्तीची साधना | — श्री. वसंत प्रधान | ४९ |
| २६ | साई साई दुमदुमे किर्ती | — श्री. अ. प. गुजर | ५२ |
| २७ | शिरडीचे बाबा साई | — सौ. प्रज्ञा ब्रीद | ५२ |
| २८ | बाबांचे आदर्श विचार व उपदेश | — कु. सुधा पाटील | ५३ |
| २९ | नित्य मी जीवंत | — श्री. या. ना. यम्मलवार | ५४ |
| ३० | बाबांविषयी माझा अनुभव | — श्री. लक्ष्मण कडव | ५५ |
| ३१ | देव भाव भक्तीचा भुकेला | — श्री. लक्ष्मण रापतवार | ५७ |
| ३२ | शिरडी वृत्त | — ऑक्टो. ८५ | ५९ |
| ३३ | शिरडी वृत्त | — नोव्हें. ८५ | ६२ |
| ३४ | स्मरा निरंतर नाम साईचे | — श्री. द्वारकानाथ दाभोलकर | ६३ |
| ३५ | घोषणा | — | ६४ |

# श्री साईनाथांची शिकवण

## संपादकीय



**तरीच जन्मा यावे। दास साईचे व्हावे**

या उक्तीप्रमाणे चोखपणे कर्तव्य बजावण्यास संतांचा सहवास पाहिजे. संताच्या वाचेत प्रेमामृताचा पान्हा आहे व त्यांच्या ग्रंथात मधुरतेबरोबर रसरशीत जीवंतपणा आहे. आज कलीयुगात असत्याचे राज्य सर्वत्र चालू आहे. त्या काळाला आपल्या कब्जात आणण्यास अगर त्याचा पराभव करण्यात संतांनी आपणास एकच महत्वाचे वज्र दिले आहे व ते म्हणजे 'नाम'.

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी रचली व ज्ञानेश्वरीवर आणखीन प्रकाश टाकणारी ज्ञानेश्वरी- भावार्थ-दीपिका, पूर्ण केल्यावर आपल्या गुरूचा-श्री निवृत्तीनाथांच्या आज्ञेवरून स्वानुभव लिहिला तो 'अमृतानुभव' होय. ज्ञानोबारायांचे हे दोन्ही ग्रंथ समजणे कठीण आहेत, आणि त्यात ग्रथित केलेले तत्व सामान्य बुद्धीच्या आवाक्यांबाहेर आहे. सर्वसाधारण सर्वांच्या उपयोगी पडेल व सर्वांस लाभ होईल असा 'हरिपाठ' त्यांनी लिहिला. ज्यास ज्ञानाची भूक लागली असेल, ती 'ज्ञानेश्वरी' शांत करील. ज्यास अनुभवाची गोडी लागली असेल तो 'अमृतानुभव' कडे जाईल. पण ज्ञान व अनुभव ज्या प्रेमातून उगम पावले ते श्री हरी बद्दलचे प्रेम हरिपाठात आहे.

जाणीव व नेणीव यांचे ऐक्य स्थान जे प्रेम ते मिळण्यास स्मरणाचे विस्मरण व विस्मरणाचे स्मरण राहिले पाहिजे. व ही अवस्था प्राप्त होण्यास भाव-आवडी-विश्वास पाहिजेच पाहिजे, आणि त्यासाठी संत सहवास नित्य असणे योग्य आहे असे संत वाङ्मयकार आवर्जून म्हणतात.

संत हे महासागर आहेत व त्यांच्या प्रेमप्रवाहात स्नान घडले तरच आपण पतीत, पावन होऊ. त्यांच्या नावात सुद्धा परम तत्व भरलेले आहे. शिरडीचे श्री संत चूडामणी भगवान श्री साईबाबा हे अलिकडच्या काळातील संत-सिद्ध पुरुष होत. त्यांनी आपल्या भक्तगणांना पुष्कळ तत्वे थट्टा विनोद करीत करीत सांगितलेली आहेत. तत्वतः ते परब्रह्मच असल्यामुळे नामरूपातीत आहेत. परंतु भक्तांच्या कल्याणाकरिता त्यांनी स्थूल देह धारण करून नामाभिमान करवून घेतले.

श्री खंडोबाचा भक्त म्हाळसापती याने खंडोबाला साक्षी ठेऊन 'आवो साई' म्हणून पहिल्याच भेटीत संबोधले. तेच 'साई' हे नाव पुढे रूढ झाले. श्री. साईनाथ महाराज नावरुपाला येण्यापूर्वी शिरडीत नामरूपरहित होते. त्यांना फक्त 'पोर' असे म्हणत. नंतर ते काही वर्षे गुप्त राहिले. व सोळा वर्षाचे असताना धूप खेड्यातील चांद पाटलांच्या भाच्याच्या लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर खंडोबाच्या देऊळी आले. त्यावेळस 'साई' हे नाव पडले.

*म्हाळसापतींच्या खळीपाशी।*
*आरंभी बाबा वऱ्हाडापाशी।*
*उतरल्या दिवशी हें पडले॥अध्याय ५ ओळी २६* साईसच्चारित्
*हे बालफकीर गाडीतून उतरले*
*प्रथम भक्ताच्या दृष्टीस पडले।*
*या 'साई' म्हणून सामोरे गेले।*
*नाम पडले तेथून॥*

तेव्हा पंचमहाभूतांचा आधार घेतल्याशिवाय जीवाला नयन गोचर स्वरूप प्राप्त होत नाही, म्हणून साई स्थूल देहाने प्रगट झाले. साई यांचा अर्थ स + आई. निर्गुण परब्रह्माचे सगुण प्रतीक- राम- जसे 'अहम्' = श्रीकृष्ण आत्मा अ + हम. अ= शून्य, निर्विकार, आकाश- त्या आकाशात वाणी 'हम्' स्फूर्ति रूपाने प्रकट झाली. ती 'अहम्' बनली व पुढे 'अहम्' हे वर्तू लागल्यामुळे 'अह्म' ही वृत्ती बनली. तसेच स= सत्य परमात्मा (सदगुरू सद्वृत्ती) आई = माऊली प्रेम.

निर्गुणातून 'साई' सगुणात भक्ताकरिता आले. भक्त झाला की देवाला देवपण आले. देव जरी भक्ताहून श्रेष्ठ व पुरातन असला तरी भक्ताखेरीज देवाला 'देव' नाव मिळत नाही. म्हणून भक्त आधी मग देव. परमात्मा हा सत्य, नित्य, सदानंद आहे. परंतु त्याला तो आनंद, ते सुख ज़ीवन रूपाने होते. म्हणून जीव प्रतीत रुप आहे. जीवाचा आणि शिवाचा (परमात्मा साईचा) असा संबंध असल्यामुळे आणि जीव हा सत्यातून, सुखातून, शिवातून निर्माण झाला असल्यामुळे प्रत्येक जीव सुखाकरिता धडपड करीत असतो; आणि हा शोध प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही वाटांनी सारखा चालू आहे.

हा शोध ज्या वेळेस जीव ज्या ठिकाणाहून प्रतित रुपात स्फुरण पावला त्या ठिकाणी परत जाईल- सागरात मिठाच्या खड्याची जी अवस्था त्या अवस्थेत जाईल आणि या करिताच भक्तिमार्ग आणि तो सुद्धा सगुण भक्ति, हरिनाम, हरिपाठ असा सरळ सोपा मार्ग आपणांस संतांनी घालून दिला आहे.

नामाचा महिमा अगाध आहे. संतश्रेष्ठ मुनी नारद यांनी वाल्या कोळ्याला 'मरा' असा उलट उच्चार दिला, परंतु त्याचा परिणाम वाल्या कोळ्याचा हृदयीचा राम प्रगट झाला व तो वाल्मिकी झाला. ''गौ'' म्हणजे इंद्रिये व त्यांचे कूल म्हणजे 'अंतःकरण' ते गोकूळ ज्या अंतःकरणात अक्षय सुखाचा उदय होतो त्याच क्षणी जीव आनंदात मुरून जातो.

'रामकृष्ण हरी' 'रामकृष्ण हरी' ही अक्षरे जीवाचा भाव दाखवितात, जीवात जीवपणा या नाममंत्रानेच आला.

राम-जीवामधे नटणारा, नांदणारा जो तो ''राम''

कृष्ण-देह इंद्रियांच्या सर्व वृत्ती हृदयाच्या ठिकाणी आणून त्यांचे 'कर्षति' रुप करणारा,-विरोध करून आनंद प्रसवणारा जो तो 'कृष्ण' आणि हे दोघे ज्या प्रेमाच्या आसनावर विराजमान होतात त्या ऐक्य स्थानास 'हरि' असे म्हणतात.

श्री सद्‌गुरु साईबाबांनी आपल्या नावात 'श्री राम' दाखविला आणि म्हणूनच ते स्वतः 'साई साई' म्हण असे आपले नावच घेण्यास सांगत. एका मराठी, अज्ञानी, वेडसर, ठेंगू झिंज्या पसरलेली पण हसतमुख पात्रास सदासर्वकाळ चिंध्या बांधलेली, जिला बाबा 'म्हाळी' म्हणून हाक मारीत तिला बाबांनी 'साई साई' म्हण असे सांगितले. बाबांनी म्हाळीला केलेल्या उपदेशात किती खोल अर्थ भरलेला आहे याचा प्रत्येक साईभक्ताने विचार केला तर बाबांनी प्रेम भक्तीचे, नामस्मरणाचे रहस्य सांगितलेले आहे हे लक्षात येईल.

पंडितांच्या पांडित्यात अवडंबरात देव गुरफटून जात नाही ज्ञानाच्या व धानाच्या पलीकडे असणारा देव जपातपाचया यज्ञयागाच्या जयाची सोय वेदा न कळे एवढा आवाक्याबाहेर असलेला देव, अशक्य कोटीतील देव नामोच्चाराच्या योगे भक्त नाचवू, खेळवू राबवू शकतात. नामाच्या योगे भाव-निष्ठा प्रगट होते, देवास भावाशिवाय दुसरे काहीही नको. श्री बाबांची स्वतःला ओळखण्याची ही शिकवण किती सोपी व सरळ सांगितली व तिची ओळख पटण्याकरिता फक्त साईबाबा हा मंत्रच सांगितला.

**श्रीसाईलीला ६५ व्या वर्षाचा पहिला अंक**

श्रीसाईबाबांच्या श्रीसाईलीला मासिकाचे ६५ व्या वर्षात पदार्पण —
श्रीसाईलीलाच्या गेल्या ६५ वर्षाचा आढावा घेणारा रंजक सचित्र लेख —
श्रीबाबांच्या रामनवमी अमृत महोत्सवी वर्षानिमित्य खास लेख - कविता इ. विविध संग्राह्य लेख
१ एप्रिल १९८६ रोजी थाटात प्रसिद्ध होईल.

**तहहयात सभासद व्हा**

श्री साईलीला ३०० रु. एकदाच भरून या मासिकाचे तहहयात सभासद व्हा.

**श्रीसाईलीला लेखक/कविंना सुचना**

श्रीसाईलीला मासिकांसाठी लेख-कविता-साहित्य पाठविताना ते कागदाच्या एकाच बाजूस भरपूर मार्जिन सोडून चांगल्या अक्षरात शक्यतो टंकलिखित करून पाठवावे. कविता साहित्य अजिबात यापुढे पाठवू नये. कवितांची पोच दिली जाणार नाही किंवा नापसंत कविता परतही पाठविल्या जाणार नाहीत. तेव्हा कवींनी आपापल्या कविता साहित्याची स्थळ प्रत आपल्याकडेच ठेवावी ही विनंती.

श्रीसाईबाबा या विषयावर वैचारिक लेख अवश्य पाठवावेत. तसेच इतर संत-सिद्ध पुरुषांवरही लेख पाठविल्यास त्यांचेही स्वागत केले जाईल. पण हे लेख सुटसुटीत, सोप्या भाषेत व थोडक्यात असावेत. हयात संतांवर लेख पाठवू नयेत. लेखासोबत चित्रेही पाठवावीत.

— का. संपादक

# मध्यप्रदेशातील भव्य साई वास्तू
# श्री साईबाबांचे मंदिर, छत्रीबाग, इंदूर

श्री. गजाननराव निरखे
२० नंदलाल पुरा, इंदूर ४५२ ००४



**छत्रीबाग मंदिरातील श्री साईमूर्ती**

महाराष्ट्राच्या शिरडी गावात एक महान संत श्री साईबाबा नामे होऊन गेलेत. त्यांचे भक्त त्यांना केवळ संतच नाही तर एक ईश्वरीय अवतार मानतात.

भारतामधील अनेक जाती, पंथ ह्या मध्ये एकता, प्रेम, बंधुत्वभाव, नव्हे, विश्वबंधुत्व निर्माण करण्यासाठीच त्याच उद्देशाने श्री साईबाबांनी ईश्वरीय अवतार धारण केला होता हे सत्य होय. श्री साईबाबा संबंधीच्या साहित्याचे वाचन, अवलोकन, मनन केल्यास हे माहीत पडते.

श्री साईबाबा १९१८ चे 'विजयादशमी' दसऱ्याचे दिवशी समाधिस्त झाले. त्यांच्या समाधीकालानंतरच त्यांचे अगणित, भाविक भक्त त्यांचे गुणानुवाद गाऊ लागले. त्यांच्या आशिर्वादाच्या चमत्काराचे अनुभव घेऊ लागले, त्यांच्या 'उदी' माईने अनेकांची इच्छापूर्ती केली. असे भक्त, भाविक भारतातच नव्हे तर इंग्लंड, अमेरिका, आफ्रिका अशा परदेशातही पसरले गेलेत. कामानिमित्त गेले, व अशा प्रकारे त्यांची विश्वबंधुत्वाची भावना, संदेश साऱ्या विश्वात पसरली गेली. अशी प्रसिद्धी कोणाही संत पुरुषास क्वचितच त्याचे निर्वाणानंतर मिळाली असेल.

अशीच एक हकिकत इंदूर, माळवा, आजचे मध्यप्रदेश मध्ये ऐकायला मिळाली ती अशी:-

श्री साईबाबांच्या समाधिकालानंतर, १९१८ नंतर एक फकीरनुमा दिसणारे एक बाबा आपले बरोबर शिरडी गावाहून संगमरवरी पादुका आपले बरोबर घेऊन आले. त्यांची स्थापना, इंदुरातील एक वसती छत्रीबाग येथे श्री राममंदिराजवळील एका ओटल्यावर एक झोपडीनुमा छोटे मंदीर बनवून पादुका तेथे ठेवल्या व स्थापना केली. हे स्थान, ही वसती, होळकर राज्य व्यवस्थेचे वेळेपासून मंदीर, समाधि (राजवंशाच्या छत्र्या) व साधूसंतांचे वसतीस्थान म्हणून प्रसिद्ध होती.

अशी ही वसतीतील जागा, श्री साईपादुका साठी योग्य होती. असे समजण्यात आश्चर्य नव्हते. ह्या पादुकांची सतत पुजा अर्चा आरती करणारे फकीरबाबा तिथे १४/१५ वर्षे पावेतो होते.

पुढे कालांतराने त्यापुढील पांच दहा वर्षापर्यंत त्या पादुका ओटल्यावर मातीच्या ढिगाऱ्यांत लुप्त झाल्या असाव्यात पण मंदीरनुमा जीर्ण झोपडी तिथे कायम होती. पण ते फकीर बाबा त्याच सुमारास कुठे निघून गेले ते कळलेच नाही; व लोकांनाही विसर पडला असावा.

त्यानंतरच्या १५/२० वर्षात म्हणजे आजच्या वर्षच्या मागील २५ वर्षापासून त्या वसतीगृहामधील लोकांना महाराष्ट्राच्या शिरडी साईबाबांसंबंधी माहिती होत गेली, आणि त्यांचे लक्षात आले की-जवळपास एक फकीर बाबाने साईबाबांच्या पादुका आणून इथे कुठेतरी ठेवल्या होत्या. मग काय, ती झाडी झुडपाची जागा, तो ओटला ती झोपडी, भाविक भक्तांनी धुंडुन काढल्या, आणि तेथील भाविक भक्तांमध्ये श्री साईबाबां विषयी आदर, श्रद्धा व भजनी मंडळ साईबाबा मंडळ स्थापन झाले. भक्तांचे त्यांचे ऐकिवात आले कि इथले फकीर बाबा होते ते "जय जय साईबाबा" आरती मराठीतून गात असत. अशा मंगलमय स्थानाची ओटल्याची माहिती मिळताच भक्त मंडळींनी त्या जागेचा जिर्णोद्धार करण्याचे ठरविले. इतकेच नव्हे तर जयपूरहून एकाने श्री साईबाबांची संगमरवरी मूर्ती आणली. आणि तिची स्थापना दि. ९ जुलै १९६७ साली केली आणि वेदोक्त पद्धतीने सकाळ सायंकाळ आरती पुजा, भजन इ. तिथे होऊ लागले.

ह्या छोट्या मंदीरासंबंधी अशी ख्याती विशेषतः होती की मंदीर मूर्ती स्थापना कामी सर्व धर्म जातीय लोक ब्राम्हण, क्षत्रीय, मराठा, वैश्य शिख, मुसलमान व हरिजन

कुणी श्रीमंत कुणी गरीब उत्साहाने उपस्थित राहून मदत करू लागले.

मंदिरात एक छोटा दवाखाना उघडला, त्यास मदत म्हणून निष्णात डॉक्टरांनी कन्सलटंट म्हणून सेवा दिली आहे.

गरीब विद्यार्थ्यांना, हुषार होनहार विज्ञान इच्छुक विद्यार्थ्यांस पुस्तक मदत दिली जाते. धार्मिक साहित्य व वैचारिक पुस्तकांचा संग्रह करून एक वाचनालय निर्माण करण्याची योजना आहे. मंदिराच्या मागील प्रांगणात 'संत निवास' असून तिथे स्नान गृह निर्माण केले आहे. तसेच श्री साईबाबा मंदिरचा साई प्रचार प्रसार म्हणून एक छोटे दुकान ठेवले आहे.

श्री साईसंस्थान मंदीरात वर्षभरात होणारे उत्सव श्री रामनवमी, श्री गुरू पौर्णिमा, विजया दशमी, साईबाबा पुण्यतिथी, व दत्त जयंति हे होत.

साईमंदीराचे लगतच द्वारकामाई धुनि 'अखंड धुनिमाय'' भक्ताचे हाकेला रक्षणरूपी 'रक्षा' 'उदी' अनेक भाविकांचे मनोगत पूर्ण करते अशी आता प्रचिती लोकांस येऊ लागली आहे.

एका महान भक्त संताने आपल्या संकल्पाप्रमाणे श्री साईबाबांच्या चांदीच्या मोठ्या पादुका देव्हाऱ्यासह मंदीरात दिल्या आहेत. केव्हढी अमूल्य विस्मरणीय सेवा? तसेच आता काही भक्त छत्र (चांदीचे), विजेचे दिवे, लोखंडी कपाट, घंटा, घड्याळ, पाट ताट पितांबर व श्रीसाईबाबांसाठी भरजरी वस्त्र मनोभावे अर्पण करीत असतात.

म्हटले वा लिहिले तर अतिशयोक्ति होणार नाही, की दर गुरूवारी सायंकाळी आरतीच्या नंतर हार, फुल, माला, प्रसाद अर्पण करण्यासाठी श्रद्धाळू भक्तांची दीर्घ ओळ रांग उभी राहाते व भक्त मनांत काय मागणे काय पुटपुटतात हे श्रीसाईबाबाच समजतात.

अशा त्या काळी व समयी, कुणालाही कल्पना नसावी किंवा एखाद्यास किंचित मात्र कल्पना असावी की ह्या पवित्र भूमीवर ह्या छोट्या साईमंदिराची एका भव्य मोठ्या वास्तुत साईबाबा मंदीर संस्थान (ट्रस्ट) ह्या रूपात परिवर्तन होईल. भाविक आपल्या परि तन, मन, धनाने येथे साईबाबांची सेवा, भजन, कीर्तन करू लागले.

गेल्या दहा वर्षात भाविकांना श्रद्धा व सबुरी ह्या स्वरूपात बाबांच्या आशिर्वादाचे अनुभव प्रचिती येऊ लागली. ह्याच भक्तांनी श्री मंदीर सेवेसाठी साई मंदीर मोठे उभारण्यासाठी एक ट्रस्ट विश्वस्त मंडळ दिनांक मार्च २०, १९६८ रोजी निर्माण केले व कार्य कारिणी कार्य करू लागली. संस्थान ट्रस्ट संविधान, नियम तयार झाले.

उत्साही कार्यकारिणीने, भाविक भक्ताचे सहयोगाने, दान देणगी, मदत मागून त्याच वास्तूत सरकार मान्यतेने एक मोठे साईमंदिर घडवून आणले. आज छत्रीबाग मधील श्री साईबाबा मंदीर म्हणजे भाविकांच्या श्रद्धेचे प्रतिक म्हणून उभे आहे. त्याच उत्साहांत श्री साई कृपाशिर्वादाने त्याची इच्छा म्हणूनच दिनांक ३० एप्रील १९८० अक्षय तृतियेच्या शुभ मुहूर्तावर श्रीसाईबाबांची एका सहा फूट उंच दिव्य मूर्तीची पवित्र ओटल्यावर विधियुक्त प्राणपतिष्ठापना समारंभासह अपार जनसमुदायात केली गेली. श्री साईबाबा विराजमान व विश्वस्तमंडळ धन्य पावले. प्रथम लहान मूर्तीला अभिषेक पूजा आदिसाठी पुतळ्यासमोर प्रतिस्थापित केली आहे.

आजच्या विश्वस्तांच्या नियमानुसार दैनंदिनी पद्धतीने कार्यक्रम म्हणजे:-

श्री साईबाबा मंदीर प्रातः ५ वाजता उघडले जाते सकाळी ७ ते ८ आन्हिक पूजा अभिषेक आरती व सायंकाळी ७-८ वा. आरती प्रवचन आदी होते. आजच्या तारखेला संस्थान स्टची व्यवस्था १५ व्यक्तींच्या विश्वस्त मंडळाचेपैकी १४ व्यक्ति कार्यरत आहेत. त्यांची प्रत्येकाची भावना श्री साईबाबा,, व साई मंदीर, सेवा त विश्वस्त मंडळ एकमताने मंदीर कार्य उत्सव व विचार आचरणात आणतात.

## उठा उठा साईनाथा

उठा उठा साईनाथा दर्शन द्या सकळा
आता दर्शन द्या सकळा
ओवाळीते मी आरती साईनाथाला
मन आले रंगून मी। साई गुणं गाई
साई मनी किंतू नाही। सर्व शिण जाई
उठा उठा साईनाथा दर्शन द्या सकाळा
आता दर्शन द्या सकळा
ओवाळीते मी आरती साईनाथाला
दुःख दाटुनिया आले। मनी भार अंतरी
मी कसे विनवू। साई धाव तू लौकरी
उठा उठा साईनाथा दर्शन द्या सकळा
आता दर्शन द्या सकळा
ओवाळीते मी आरती साईनाथाला
संकटाशी झुंजायला साथ। दे मजला
साई साथ दे मजला
कृपा दृष्टी ठेवा। साई प्रार्थना तुजला
उठा उठा साई नाथा दर्शन द्या सकळा
आता दर्शन द्या सकळा

— **कु. रोहिणी जाधव**
मिल्का कॉटेज, लेबर चाळ,
समर्थ सोसायटी समोर, ठाणे

# महाप्रभु श्री स्वामी समर्थ

सौ. मृणालिनी हरीश्चंद्र पुंडलिक
११, दत्तप्रसाद दत्त आळी
कल्याण

कलीयुगातील साक्षात परब्रम्ह। कर्म ज्ञान व भक्ति ह्यांचा संगम म्हणजेच स्वामीकृपा. शेगांवचे गजानन महाराज, शिरडीचे श्री साईबाबा व अक्कलकोटचे स्वामी म्हणजे साक्षात् बिल्वदल.

स्वातंत्र्यपूर्व काळात ह्यांचे अवतार झाले असल्याकारणाने त्या ऐतिहासिक कालाचा बोध घेतल्यास समाजाची उन्नती व भक्ति ह्याचीच त्याकाळी जरूर होती. संत व अवतारी पुरुष समाजाच्या कल्याणासाठीच भूतलावर अवतीर्ण होतात. संतांच्या शिकवणुकीमुळेच ते समाजाचे आधारस्तंभ आहेत. संतांचे अवतार ह्या परमेश्वराच्या विभूती आहेत. त्यांचे अवतार निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या रूपाने झाले असले तरी शेवटी तत्वे व सार एकच फक्त रूपे अनेक. अशाच महान दत्त अवतारांपैकी योगीराज श्री स्वामीसमर्थ-जागृत दैवत ह्यांच्या उपदेशाची शिकवण.-

महाप्रभु श्री स्वामी समर्थ ह्यांचे त्यांच्यावरील निष्ठेने व भक्तिने अनेकांना साक्षात्कार, दृष्टांत होतात. सदेह प्रत्यक्ष दर्शन घडते श्री स्वामींच्या ठिकाणी सर्वच दैवते वास करत आहेत. त्यांना अनन्य भावाने शरण गेले की परमेश्वराचे ज्ञान होण्याच्या इच्छेने आल्यास त्यास त्याचे योग्यतेप्रमाणे कर्ममार्ग व भक्तिमार्ग प्रथम दाखवून मग ज्ञानमार्ग दाखवित, कर्तव्यकर्म करून नेहमी स्वामींची आठवण ठेवावी उगीच जप करीत बसावे. भजनपुजनात फार वेळ मोडावा अशी महाराजांची इच्छा नसे. वास्तविक पहाता या जगात उद्योगी मनुष्यच सुख पावतो. जगत नियंत्रणाची इच्छा श्रम करून सर्वांनी ह्या जगाची रहाटी कायम ठेवावी अशीच आहे. म्हणूनच गीता वगैरे वगैरे आपल्या धर्मतत्वांचे ग्रंथात स्वधर्म हा मोठा श्रेयस्कर मानला आहे व कर्तव्यतत्परता हेच देशोन्नतीचे बीज होय. 'कामात काम स्मर रामराणा' हे त्यांचे उपदेशांचे सार प्रत्येकाने अश्रांत श्रम करून आपला स्वधर्म राखावा व जगतनियंत्या प्रभूंची अंतकरणात भक्ति सदासर्वकाल जागृत ठेवावी या योगाने मनुष्य या लोकी सुख पाहून परलोकीही उत्तम गती पावतो. उगीच आपले दैन्य भाकू नये. प्रयत्नी परमेश्वरही साध्य होतो.

श्री स्वामींना पाषाण मूर्तीच्या भक्तिपेक्षा गुरूभक्ति श्रेष्ठ श्रेयस्कर वाटत असे.

कर्म, भक्ति व ज्ञानमार्गपैकी ज्ञान प्राप्त होणे फार दुर्लभ आहे ते प्राप्त करून घेण्यास दिर्घकाल व श्रम लागतात. मानवाचे पाठीमागे संसार लागलेला असल्याकारणाने मनुष्य जेरीस येतो. भक्तिज्ञानाबद्दल विचार करण्यास वेळ मिळत नाही. सबब तरणोपायाचा अति सुलभ मार्ग म्हणजे स्वामी- साई-भक्ति होय. दीन जनांचे पालन करण्या करताच त्यांचा अवतार होता.

# श्री साईनाथांचा शरणार्थी - १०

लेखक: स्वामी साईशरणानंद
अनुवादक: वि.बा. खेर

या सुमारास काकासाहेब दीक्षितांनी दिलेली नाभाजी भक्तमाळ मी माझ्या खोलीत वाचत असे. राधाकृष्णआईच्या ओळखी नंतर तिने सांगितल्यावरून तिच्याकडे वाचण्याची सुरुवात केली. एकदा वाचता वाचता कोण्या संताचा वृत्तांत ऐकून तिचा विरहाग्नि अश्रुरूपे प्रगट झाला. नंतर ती खूप मोठ्याने रडली. खोलीत रात्रीच्या अंधारात वीजेसारखे तेज चमकले व राधाकृष्णआई शांत होऊन निद्रावश झाली.

राधाकृष्णआईचे प्रिय पुस्तक होते निर्णयसागर मुद्रणालयाची तुकारामाची गाथा. ते एक रुपयास मिळत असे. कोणी काही सिद्धांत मांडल्यास तो सिद्धांत असलेला एखादा तुकारामाचा अभंग ती वाचून व नंतर गाऊन दाखवे. एकटी असल्यास हे अभंग पुष्कळच गाई. ती म्हणे, "मी पहिल्यांदा येथे आले तेव्हा संतपर अभंग मी बाबांसमोर गाई, ते त्यांना आवडत." अभंग बहुतेक संतपर अभंग, करुणापर अभंग, स्थितिपर अभंगांपैकी असत. जे अभंग, ती गाऊन दाखवे किंवा ज्यांच्याकडे तिचे लक्ष वेधले होते त्यांवर माझ्याकडे असलेल्या तुकारामाच्या गाथेत तिने विशिष्ट खूण केली होती.

एकदा माझ्याकडे "नवनीत" हा मराठी काव्यसंग्रह पाहून तिने तो थोडे दिवस स्वतःकडे ठेवला व त्यातील कृष्णाचे वर्णन करणाऱ्या दहा बारा पंक्ति ज्यांच्यात 'अधरी धरि पावा' हे शब्द आहेत * त्या पाठ करून ती वारंवार म्हणत असे. ते पुस्तक परत केले तेव्हा त्यात भगवद्गीतेतील, अठराव्या अध्यायातील, बेचाळीसाव्या श्लोकात * * सांगितलेल्या ब्राम्हणधर्मावर टीका असलेल्या जागी तिने खूण ठेवली होती. त्यावरून मी असे समजलो की त्यात वर्णीलेल्या ब्राम्हणाचे सद्गुण मी जीवनात आचरावे असा तिचा उद्देश होता.

एका रात्री वामनराव नार्वेकरांनी एकनाथी भागवत आणले होते ते हातात घेऊन "कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा...' या श्लोकावरील लांब टीका राधाकृष्णआईने वाचून घेतली व म्हणाली की, भागवताचे सार या श्लोकात सामावले आहे, ते नीट ध्यानात ठेव. नंतर मी माझ्या खोलीत जाऊन तो श्लोक पुनः वाचला, समजण्याचा प्रयत्न केला,

* वामन पंडिताच्या वेणुसुधेतील हे वेचे असून श्रीकृष्ण वनांत वेणू वाजवीत असतां त्याचा अमृतासारखा गोड ध्वनि ऐकून सर्व प्राणी कसे मोहित झाले त्याचे वर्णन आहे. त्यांतील पहिला वेचा असा आहे.

अंगवक्र अधरीं धरि पांवा। गोपवेष हरि तोच जपावा।
वामबाहु वरि गालहि डावा। तो ठसा स्वन्हदयांत पडावा ॥२॥

* * शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेवच।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥

भगवद्गीता, अ. १८, श्लो. ४२

परंतु बरोबर समजले नाही. आता त्या टीकेचे स्पष्ट अर्थ सांगणारे भागवत मिळाले म्हणून ती अडचण दूर झाली आहे.

तुकारामाच्या गाथेशिवाय जयदेवकृत गोपीगीत राधाकृष्णआईला अत्यंत आवडे. ती ते वारंवार गाई व म्हणे, "या गोपीगीताची खुबी अशी आहे की प्रत्येक रागात ते वाजवता येते. डॉ. पिल्ले खूप परिश्रम करून एका मस्त फकीराकडून सतार वाजविण्यास शिकले होते. सकाळ संध्याकाळ राधाकृष्ण आईपाशी बसून सतारीवर गोपीगीतेतील पदे सांगितल्याप्रमाणे वाजरत. पिल्लेबरोबर तिने समर्थ रामदासस्वामींचा दासबोध काही काळ वाचला. बहुधा पिल्ले असताना मी उपस्थित असल्यामुळे मला हे सर्व जाणण्याची संधी मिळाली.

तुलसीकृत रामायणाचा कणा वारकऱ्याने केलेला मराठी अनुवाद मी मुंबईत मागवला होता तो राधाकृष्णआईने वाचून त्याची प्रशंसा केली. मराठीत लिहिलेले गौरांगप्रभूचे जीवनचरित्र तिच्याकडे एकदा आले व ते वाचून त्या जीवनाच्या नशेत एक दोन दिवस ती राहिली.

त्या वेळी गुजराती प्रेसचे आठ आण्याला मिळणारे रामकृष्ण बोधामृत मी शिरडीत आणले होते. त्यात दोन तीन विभाग होते. प्रत्येक विभागाच्या शेवटी व पुढील विभाग सुरु होण्यापूर्वी श्री रामकृष्णांच्या शब्दात सुंदर प्रार्थना होती जिचा भावार्थ असा होता की, 'हे माताजी, मी माझ्या ब्राह्मणजातीच्या श्रेष्ठत्वाच्या अभिमानात गर्क न होता माझे चित्त तुझ्या चरणाकडे सदैव जडो. राधाकृष्णआईच्या सांगण्यावरून ती प्रार्थना तिला वाचून दाखविली. नंतर त्यातील दुसरे काही उतारे तिला वाचून दाखवत असताना बापुसाहेब जोग आले. ते म्हणाले, "पुस्तक असे धरून राधाकृष्णआई समोर वाचत राहिलास तर येथे काही शिकणार नाहीस; ती म्हणेल ते ऐकत जा." म्हणून मी वाचण्याचे बंद केले. या सुमारास Gospel of Shri Ramkrishna Part I मी वाचत असे व मला ते फार आवडे. आईने त्या पुस्तकाला 'स्पेलगो' (Spellgo)म्हणजे मायेचे बंध तोडणारे शास्त्र असे नाव ठेवले. या दरम्यान बाबा एकदा माझ्या स्वप्नात आले व तुकारामाची गाथा हातात घेऊन मला दाखविली, व ती उघडून म्हणाले, शंभर पान एकशेचार लगेच सकाळी एकशेचार पान पहाता 'दरवेस' नावाचे काव्य पाहिले ज्याचा पहिला शब्द अल्ला होता* प्रभु ठेवतो तसे राहावे.· त्याच्यात संतोष मानावा, वरचा व खालचा, स्वर्गाचा व नरकाचा  हे दोन्ही मार्ग सोडून सन्मार्गाने चालावे. 'फिकर की

* 'दरवेस' नावाचे तुकारामाचे काव्य खालील प्रमाणे आहे:

अल्ला करे सो होय बाबा करतारका सिरताज।
गाऊ बछरे तिस चलावे यारी बाधो न सात॥१॥
ख्याल मेरा साहेबका बाबा हुआ करतार।
व्हांटे आघे चढ़े पीठ आपे हुवा असवार॥२॥
जिकिर करो अल्लाकी बाबा सबल्यां अंदर भेस।
कहे तुका जो नर बुझे सोहि भया दरवेस॥३॥

तसेच 'अल्ला' या शब्दाने सुरू होणारे तुकारामाचे दुसरे काव्य "वैद्यगोळी" वरील परिच्छेदात दिलेल्या अर्थाचा खालील प्रमाणे आहे:

अल्ला देबे अल्ला दिलावे। अल्ला दारू अल्ला खिलावे।
अल्लाबिगर नहीं कोय। अल्ला करे सोहि होय॥१॥
मर्द होये वो खडा फीर। नामर्दकू नहीं धीर।
आपने दिलकूं करना सुखी। तीन दामकी क्या सुमासी॥२॥
सब रसोंका किया मार। भजनगोली एकहि सार।
इमान तो सबहीं सखा। थोडी तो भी लेकर ज्या॥३॥
जिन्हो पास नीत सोय। वोहि बसकरी तिरावे।
सांतो पांचो मार चलावे। उतार सो पीछे खावे॥४॥
सब ज्वानी निकल जावे। पीछे गधडा मट्टी खावे।
गांवढाळ सों क्या लेवे। हगवनी भरी नहीं धोवे॥५॥
मेरी दारू जिन्हे खाया। दिदार दरगा सो ही पाया।
तल्हे मुंढी घाल जावे। बिगारी सोवे क्या लेवे॥६॥
बजारका बुझे भाव। वोहि पुसता आवे ठाव।
फुकट बादु कहे तुका। लेवे सोहि लेवे सखा॥७॥

फाकी करे उसका नाम फकीर' असा भावार्थ आहे. मला स्वप्नातून जाग येणाऱ्या पानांविषयी साशंक झाल्यामुळे तुकारामाचे अल्लाचे काव्य तर वाचे, परंतु अगोदरची दोन पाने व नंतरची दोन पाने विराण्या इत्यादीही वाचत असे.

या काळी मी ज्ञानेश्वरीमधील सहाव्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे सिद्धासन घालून ध्यानाला बसत असे. एके दिवशी राधाकृष्ण आईने दुसरे आसन दाखविले. ते पद्मासन नसून स्वस्तिकासन किंवा सहजासन हे होते. हे आसन दाखवून, राधाकृष्ण आई म्हणाली, 'असं ऐटीत बसावं'. एकदोन दिवसानंतर मी रात्री बाबांजवळ बसलो होतो तेव्हा बाबासुद्धा ते आसन घालून बसले. मी बाबांकडे जाताच नित्याची उजवा पाय उभा राखून, डाव्याने अर्धी मांडी घालण्याची बैठक मोडून सहजासन घालून ते दोन चार मिनिटं तसेच बसले. बाबांनी व राधाकृष्णआईने दोघांनी एकच आसन दाखविल्याने त्यानंतर त्याच आसनात मी ध्यानाला बसण्याचे ठरविले.

बोलता बोलता एकदा राधाकृष्णआईने ध्यान करण्याची रीत सांगितली ती अशी. बाहेरच्या ब्रह्म जगतापासून सुरू करून, बाह्यात ईश्वराची भावना करता करता तोच ईश्वर आपल्या अंतरात अंतःकरणात आहे अशी भावना करावी, किंवा भगवद्गीता अध्याय १८, श्लोक ६१ मध्ये वर्णिलेल्या 'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति', अंतर्यामी ईश्वराची आतून भावना करता करता सर्वत्र तोच आहे, अशी भावना करून लीन होऊन जावे. कोणत्याही रीतीने ग्रहण करून ईश्वरात लीन होऊन जगाला तसेच स्वतःला विसरून जावे. कच्चा पेरू मला देऊन 'घे, हा फार गोड आहे,' असे बोलून बाबांनी ज्या प्रकारचे ध्यान करण्यास सांगितले त्याचे वर्णन परमानंदभारती यांचे 'Light on Life' या पुस्तकात आहे. त्याचे व राधाकृष्ण आईच्या वचनाचा मिलाफ करून मी ध्यान करण्याचे ठेवले.

या सुमारास बाबा मला स्वप्नात दिसले व म्हणाले, "चहा बंद कर, कॉफी पण पिऊ नये" म्हणून मी चहा पिण्याचे थांबविले.

राधाकृष्ण आईजवळ राधाकृष्णाची एक पाय वाकडा वाकवलेली पितळेची मूर्ति नेहमी असे व क्वचितच तिला विभक्त होऊ देई. जेवताना प्रत्येक घास मूर्तिच्या तोंडाजवळ धरून, प्रासादिक करूनच ती घेई. हे पाहून मला वाटले की आपल्याला सुद्धा अशी एखादी मूर्ति मिळाली तर चांगले होईल. बरेच दिवस हा विचार मनात घोळत राहिला, परंतु माझ्या नियमानुसार मी कधीही त्याची वाच्यता केली नाही. राधाकृष्णआई मनोगत वस्तु जाणणारी असल्यामुळे ही माझी भावना ती ओळखत होतीच. एक दिवस स्वतःहून ती मला म्हणाली, "तुला या मूर्तीची जरूर नाही. तुला बाबांनी स्वतःचा फोटो दिला आहे ना?"

राधाकृष्णआईकडे सुद्धा बहुधा मी मौनच पाळी. तिला स्वतःला पण दुसऱ्याने काही बोललेले आवडत नसे, व जर कोणी काही धार्मिक विषयावर स्वतःचे मंतव्यज्ञान दाखविले तर त्याला फजीत करून बोलणे बंद पाडी. म्हणून माझ्या मनातील विचार तिच्यासमोर मी बोलतच नसे. बाबांना ही गोष्ट पसंत पडली नाही. ते मला एकदा म्हणाले, "अरे तुला तेथे पाठविलं, तरी तेथेही तू काही बोलतच नाहीस. ही काय तऱ्हा!" परंतु माझा स्वभाव व राधाकृष्णआईची रीतभात हे दोन्ही पाहून मी तेथे मौनच पाळत असे.

*****

# तुझाच रे झालो

शिरडीस येऊनी सुखावलो मी
साई रे तुझाच मी झालो
केवळ तुझाच रे झालो ॥धृ.॥

समाधीच्या पायरीऽशी
पळभर येता पावन करीशी
पदस्पर्शाने तो उद्धरतो
जो क्षणभर तुझाच रे होतो ॥१॥

ही द्वारका मायमाऊली
वात्सल्याची कृपासाऊली
तव मायेची पाखर करीता
धीर हृदयी वाढतो ॥२॥

या इथे निंबतळाशी
तपोभूमी जी सिद्धीदात्री
गुरुभक्तीने उद जाळीता
साईमय जाहलो ॥३॥

— श्री. राजेश र. परळकर

३६ जी, परळकर हाऊस, परळ व्हिलेज मुंबई - १२

# साई कृपा-माझा मुलगा

सौ. रा.नं सावंत
१५३१, सदाशिव पेठ
टिळक रोड, पुणे ३०

परमेश्वरी लीला अगाध आहे. श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र साईंनी दिला आणि ज्यांनी तो पाळला त्यांना हवं ते मिळालं आहे. असा साईभक्तांचा अनुभव आहे. साईंनी या ना त्या रूपात आपल्या भक्तांच्या इच्छा पूर्ण केल्या आहेत.

आमच्या घरात प्रारंभापासून साईभक्ती अत्यंत श्रद्धेने लीनतेने करणारे माझे मिस्टर. त्यांच्यामुळेच हळूहळू मी साईबाबांची पूजा करू लागले, आणि त्यांच्यावर श्रद्धा बसायलाही अनेक अनुभव आले. कुठल्याही प्रसंगी साईबाबांचे नाव घेवून ती गोष्ट करायची असे आमचे ठरलेले आहे. ही झाली आनंदाची गोष्ट! कुठल्याही संकटप्रसंगी किंवा एखाद्या कूटप्रसंगी साईंचाच धावा करायचा असा संकेतच ठरलेला आहे. साईंने आम्हाला अनेक संकटातून मुक्त केलेले आहे तसेच अनेक प्रश्नांतून योग्य मार्ग दाखवला आहे.

आम्हाला दोन मुली आहेत. दोनच मुली बस या मताची मी- तर माझ्या मिस्टरांना मुलगा हवा होता. हो ना करता-करता धाकट्या मुलीला ५ वर्षे होवून गेली. शेवटी एकदा काय तो निर्णय घ्यावा म्हणून मिस्टरांना विचारलं ते आपल्या मताशी ठाम होते. अर्थातच आणखी वर्षे घालवण्यात अर्थ नव्हता. साईबाबांवर सगळा भार टाकून एकदाचा निर्णय पक्का केला. तरीही दिवस राहिल्यानंतर मनात शंकेची पाल चुकचुकत होती. साईंवर विश्वास, श्रद्धा, सगळा भार टाकून हे दुबळ मन मात्र खंतावलेलच होतं. काय होणार म्हणून!

दर गुरुवारी मी उपास करते- तेव्हा साईचरीत्राचा एकेक अध्याय मी वाचत होते. साईलीलाचा अंक वाचताना कुणाकुणाचे अनुभव मनाला दिलासा देत होते. विचार करून प्रकृती मात्र खालावत होती. स्वप्न पडायची. मध्येच रात्री जाग यायची. साईबाबांचा धावा चालू असायचा-केव्हाही-मग झोप लागायची. पुन्हा जाग यायची. असे करता करता ८ महिने उलटले. मी म्हणायचे साईबाबा मला स्वप्नात येऊन सांगा ''तुला मुलगा होईल म्हणून.''

एके दिवशी स्वप्न पडले-मी एका घनदाट जंगलातून जातेय. रात्रीची वेळ. मनातून खूप घाबरलेली- घर गाठायच्यासाठी धावतेय -रस्ता संपत नाही. भितीने बेशुद्ध होवून पडले-तेवढ्यात पाठीवरून फक्त दोन हळूवार हातांचा दिलासा देणारा स्पर्श होतोय-तेवढ्यात मी शुद्धीवर आले- माझे घर आले होते. आई समोर उभी होती. माझे हे जंगलातून फिरणे म्हणजे भरकटलेली मनःस्थिती व तो हातांचा सुखद स्पर्श हा साईबाबांचा दिलासा, धीर होता.

दिवस संपता संपत नव्हते. ९ वा महिना सुरु झाल्यावर काळजीत भरच पडली, -रोज वाटायचं आज हॉस्पिटलमध्ये जावं लागेल. असे ८-१० दिवस गेले. पुन्हा स्वप्न पडले. एक म्हातारेसे गृहस्थ स्वप्नात आले. म्हणाले 'मुली काही काळजी करू नकोस. दोन दिवसांनी तुझी डिलीव्हरी होईल. नेहमीसारखीच स्वप्न पडताहेत म्हणून दुर्लक्ष केले. कारण अजून १५-२० दिवस होते. मला आणखी एक नेहमी वाटायचे आपल्यावर रात्रीची वेळ येवू नये दवाखान्यात जायची.

खरोखरच दोन दिवसांनी माझ्या दुपारीच पोटात दुखायला लागले. दवाखान्यात गेले. तिथे प्रथम जी खोली दिली तिथे साईंचाच फोटो होता. त्यामुळे तर मनाला खूपच दिलासा मिळाला. साईंचे नांव घेत राहीले, आणि खरोखरच साईंच्या कृपेने आम्हाला मुलगा झाला. हा आनंद सगळी दुःखे, वेदना विसरवणारा होता. मुलगा झाल्याचा आनंद आणि साईने आमची इच्छा पूर्ण केल्याचा आनंद! अवर्णनीय!!

साईनाथा तुझी कृपादृष्टी सदैव सदैव राहो!
तुझ्यापुढे आम्ही नतमस्तक आहोत!!

# साईध्यास ....

संकट समयी धावून येशी ... ये बाबा साई,
निशि-दिन आम्हा ध्यास तुझा साई ।।
सगुण - निर्गुण असे आमुची भक्ती
तुझिया चरणी ना कशाची धास्ती ...
डोंगर दुःखाशी झगडण्यासाठी ... दे शक्ती साई,
निशि-दिन आम्हा ध्यास तुझा साई ।।
आम्ही अजाण लेकरे असतो सदापीडीत
भक्तीचे अंकुर साई उगवू दे अंतरात ....
अनंत रूपे अवतार साई ... ये बाबा साई,
निशि-दिन आम्हा ध्यास तुझा साई ।।
मानवतेची मानव सेवा हीच भक्ती खरी
अमुच्या ठायी सदा असु दे श्रद्धा आणि सबुरी ....
एक ध्यास साई ... एक रूप साई ... ये बाबा साई,
निशि-दिन आम्हा ध्यास तुझा साई ।।

**— श्री. अशोक लोटणकर**
बी. आय. टी. चाळ नं. ६/१०६
चंदनवाडी, काळबादेवी, मुं. २

# — कर्मयोगाचा महिमा —

**ॲड. कृष्णराव काशिनाथ थिटे**
एम्.ए. एल.एल.एम. बीएस्सी.बीएड.
६९६, डेक्कन जि. पुणे—४

कर्मयोगाची महती अखिल विश्वाला जर कोणी प्रभावीपणे माहित करून दिली असेल तर ती भगवान श्रीकृष्णांनी भगवद्गीतेत "प्राण्या तू फक्त कर्म करीत रहा, व केलेले कर्म ईश्वरार्पण कर, फलाची आशा धरु नकोस," अशा असंदिग्ध शब्दात कर्मयोगाचा अपार महिमा वर्णिला आहे. भौतिक जगात मानव खूप मोठमोठी सुखस्वप्ने उराशी बाळगतो व तो सुखस्वप्ने प्रत्यक्षात उतरविण्यासाठी भल्याबुऱ्या मार्गाचा अवलंब करतो व वाईट मार्ग अवलंबिल्याने त्या मानवाची प्रगती होण्याऐवजी अधोगतीच होते. आज जगात खरे तर विश्वबंधूत्वाची गरज आहे परंतु या पृथ्वीतील आर्थिक दृष्ट्या समृद्ध असलेली बलाढ्य राष्ट्रे शस्त्रास्त्र स्पर्धेच्या मार्गात असून जगाला व अखिल मानव जातीला विनाशाच्या खाईत लोटायला सिद्ध झाली आहेत.

प्रत्येक कार्य प्रत्येक व्यक्ती आपआपल्या पूर्वसंस्काराने बद्ध असल्यामुळे ते याही जन्मात करते. कोणतेही काम करण्यासाठी पात्रता व अधिकाराचा ठेवा त्या व्यक्तीजवळ असावा लागतो. जसे की वकीलाला शेतात काम करता येणार नाही व कृषिराजाला कोर्टात वकीली करता येणार नाही, आध्यात्मिक साधना करण्यासाठीही ठराविक क्षमता अंगी असावी लागते किंवा ठराविक क्षमता अंगी येण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. आध्यात्मिक विकासासाठी अंगी वैराग्य यावे लागते." परोत्पज्य सर्व व्रर्जात इति परिव्रट "याचा अर्थ स्त्री, संतती, संपत्ति या सर्व वासनांचा मनापासून त्याग करतो तोच सन्यासी होय. गृहस्थाश्रमी व्यक्तीला सुद्धा परमेश्वराचे नामस्मरण, चिंतन, भजन, करण्यास स्थल, कालाची अथवा शुचिर्भूततेची कोणतीही गरज नसते. शिर्डीचे महान संत दत्तावतार श्री. साईबाबा यांनी कर्मयोगाचा एक महान आदर्श अखिल मानवजातीपुढे ठेवला आहे. श्रीसाईबाबांनी कर्तृत्वाला जीवनात फार महत्वाचे स्थान दिले आहे. श्रीसाईबाबांनी आपल्या सद्भक्तांना "श्रद्धा" व "सबुरी" या दोन शब्दाची सतत स्मृति ठेवायला सांगितली आहे. केलेल्या कोणत्याही कर्माचे फळ ताबडतोब मिळेलच असे नाही. तर त्यासाठी वाट पाहिली पाहीजे तरच आपले इच्छित साध्य होईल. परमेश्वर आपल्याला इच्छित कार्यात निश्चित मदत करत आहे अशी अढळ श्रद्धा आपल्या आराध्य दैवतावर असण्याची नितांत आवश्यकता आहे.

*स्ववर्णसम धर्मेण तपसा हरितोषणात ।*
*साधनं प्रभवेत पुंसां वैराग्यादी चतुष्टयम् ॥*

वरील संस्कृत पंक्तीचा अर्थ असा की, आपल्याला ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, व क्षुद्र या वर्णाश्रम धर्माचे जर त्या त्या वर्गातील व्यक्तीने पालन केले तसेच कर्मयोगाने, तपाने, किंवा हरीभक्ती (ईश्वरभक्ती) केली तर त्या व्यक्तीला साधनचतुष्टय प्राप्ती निश्चितच होईल.

*यस्त्वात्मरतिरेव श्यादात्मतृप्तश्च मानवः ।*
*आत्मन्वेवच संतुष्टस्तस्य कार्यन विद्यते ॥१७॥*
*नैव तस्य कृते नर्यो ना कृतेनेह कश्चनः ।*
*नचास्य सर्व भूतेष्यु कश्चिदर्थ व्यपाश्रयः ॥१८॥*

श्रीमदभगवत्‌गीतेतील वरील तिसऱ्या अध्यायात कर्मयोगाविषयी फार महत्वाचे विश्लेषण केलेले आहे. या अध्यायात भगवान श्रीकृष्णानी स्पष्ट केले आहे की, "जो मानव कर्म योगाचे आचरण करतो त्याचे चित्त शुद्ध होऊन आत्मज्ञानाचा अधिकारी होऊन तो मानव आत्मज्ञानाने आपल्या आत्म्यात रममाण होतो व आत्मानंदातच सदासर्वदा तृप्त असतो. व त्याचे स्वतःची असे कोणतीही कर्तव्य अथवा इच्छा शिल्लक राहत नाही.

कर्मयोग्याने कोणकोणती कर्मे किंवा कार्ये करावीत याबद्दल भगवान श्रीकृष्णांनी भगवत्‌गीतेच्या १८ व्या अध्यायात विवरण केले आहे ते असेः-

*नियतं संग रहितभराग द्वेषत कृतम् ।*
*अफलं प्रेप्सुनां कर्म यत त्सात्विक* मुच्यते ॥
*भ. गी. १८/२३*

प्रत्येक व्यक्तीने आपआपल्या वर्णधर्मातील संस्कारानुसार स्वतःचे नियतकार्य कोणत्याही फलाची अपेक्षा न धरता म्हणजेच त्या फलापासून फायदा किंवा तोटा होणार आहे याचा विचार न करता व त्या विषयी प्रेम किंवा राग न मानता त्या व्यक्तीने असे समजून घ्यावयास हवे की मी केवळ शुद्ध आनंद स्वरुप साक्षी आत्माच आहे. माझ्या हातून घडून येणारे कर्म किंवा कार्य हे प्रकृती नियमानुसार घडून येत आहे, व त्याचा मी कर्ताही नाही व भोक्ताही नाही व त्या कर्माच्या परिणामाचे मला कोणतेही प्रयोजन नाही. अशा रीतीने वरील अन्वार्थ ध्यानी घेऊन जे संगरहीत कर्म केले जाते त्या कर्मालाच सात्विक कर्म म्हणून संबोधले जाते. जर एखाद्या मानवाने फळाची इच्छा धरुन एखादे कर्म केले तर ते कर्म मोक्षाला कारण न होता बंधनाला किंवा पुनर्जन्माला कारणीभूत होणारे असल्याचा निर्वाळा धर्मशास्त्रांनी दिला आहे.

सारांश वरील विवेचनावरून हेच दृष्टोत्पत्तीस येते की, हिंदूच्या पवित्र वेदाच्या आज्ञेनुसार स्वतःच्या वर्णश्रमधर्माचे फलाशांचा विचार न करता पालन करणे हाच एकमेव कर्मयोग होय.

# कर्मयोगी

**सौ. शांता अंबाजी सरोदे**
उल्लेंगल बि.नं. ६ खो.नं. १०,
एन्. सी. केळकर रोड दादर मुंबई-२८

कर्मयोगी श्री सद्‌गुरू साई माऊलीने प्रपंच करून परमार्थ साधा ही शिकवण आपल्या भक्तांना वेळोवेळी बोधामृत पाजून, प्रसंगानुसार स्वतः आचाराने पटवून दाखविली. योग ही एक परमेश्वराची आराधना, तपश्चर्या, साधना आहे. पण हे करण्यास प्रपंचात वेळ मिळत नसतो. पोटासाठी नोकरी, व्यवसाय करताना देवाला फूल, पान घालून पूजा, अर्चा अगर कोणतीच सेवा करण्यास वेळ मिळत नसतो. म्हणून कर्म करताना ते सत्याने, निस्वार्थीपणाने, त्यागाने करण्यास अंतरात्मारूपी साई रामाचा आवाज सांगत असतो. पण हा स्वार्थी देहाचा मोह ते करण्याचे टाळून विषयसुखाच्या आहारी जाऊन, अनाचारी बनतो, व कर्मपाशात गुरफटून घेऊन कर्मभोगी होतो —

म्हणूनच श्रीसाई सद्‌गुरू सांगतात. 'बाबांनो' कर्मयोगी व्हा देहाने प्रपंच करा. मनाने साईचिंतन करा. आपल्या वाट्याला आलेले कर्म करताना कर्म फलाची आशा न करता, त्याचा अभिमान न धरता साई आत्मारामावर एकनिष्ठ श्रद्धा ठेवून, त्याला साक्ष ठेवून ते करा. त्यायोगे श्रीसाई कृपेने कर्मभोगाचा ताप भोगताना त्याचे चटके सौम्य होतात त्यांची तीव्रता कमी होते, व तो शीतल होतो. स्वतःच्या सुखाचा विचार करून स्वार्थी होऊ नका. तर दुसऱ्यांच्या सुखासाठी स्वतःच्या सुखाचा थोडासा त्याग करा. उपकार करा. सदाचाराने वागा. भूतदया ठेवा. सर्वांच्या हृदयातली चैतन्यशक्ती आत्मज्योत मीच आहे. म्हणून वैरवृत्ती धरू नका. दुःखी जीवाची सेवा करा. अशी सत्कर्माची सेवा प्रपंचात कर्म करताना घडली. तर तीच माझी पूजा अर्चा अशी साधना करणारा माझा सेवक तोच कर्मयोगी. म्हणजेच प्रपंच करून परमार्थ साधणे.

आत्म्यावर एक निष्ठा ठेवून जगणे. म्हणजेच श्रीसाईरामावर श्रद्धा, सबूरी ठेवून जगणे. जो आत्मरूपी श्रीसाई सद्‌गुरूच्या सत्याच्या आवाजाने, त्यागाने, श्रद्धा, सबुरीने जगतो. त्यालाच श्रीसाईराम शांती, सुख स्थैर्य प्राप्त करून देतो. यावरून एक महान संत बाळेकुंद्रीचे श्रीपंत महाराज ह्यांची बोधकथा त्यातच एक सत्यकथा वाचली. ती अशी की आत्मरूपी परमेश्वर प्रत्येक क्षणाला अनाचारापासून सावध करून सुखाचा मार्ग दाखवीत असतो.

कथा — लाहोर प्रांतातील एक सत्य घटना— हिंदू मुस्लीम यांची दंगल झाली असताना त्यात अनेक हिंदूंची कत्तल झाली. त्यात एका मुसलमानाच्या शेजारी एक हिंदू वृद्ध जोडपे रहात होते. त्यांच्या सोबत त्यांचा सात, आठ वर्षांचा नातू रहात होता. त्याचे आईवडील हिंदुस्थानात होते. त्यादिवशी शेजारी मुसलमानाच्या घरात तो लहान मुलांमध्ये खेळत होता. इकडे घरात त्याच्या आजोबा, आजीची काही मुस्लीम लोकांनी

कत्तल केली. व त्यांच्या त्या लहान नातवाला मारण्यासाठी ते लोक शेजारी धावले— पण त्या घरातल्या एका वृद्ध मुसलमानाच्या आत्म्यातला अल्ला जागा झाला. त्याने त्या मुलाला आपल्या पोटाशी धरून हा माझा नातू आहे. असे सांगताच ते लोक निघून गेले— काही दिवसांनी दंगल निवळल्यावर त्या वृद्ध मुसलमानाने त्या मुलाला त्याच्या आई, वडिलांकडे ते ज्या गावात रहात होते. तेथे घेऊन तो आला. परंतु घरचा पत्ता माहीत नसल्याने शोध करून पोहोचवावे. ह्या विचारात तो चालला असता, समोरून एका लॉरीची टक्कर लागून त्यात त्या छोट्या मुलाच्या डोक्याला जबरदस्त मार बसला.

जवळच रस्त्याच्या बाजूला एक डॉक्टरचा दवाखाना दिसल्याने तो धावतच त्या मुलाला घेऊन तेथे गेला, व डॉक्टराचे पाय धरून त्या मुलाला वाचविण्याची भीक मागितली. तो डॉक्टर हिंदू होता. त्या मुसलमानाला पाहाताच त्याला चिढ आली. की लाहोर प्रांतात त्याचाही ह्याच वयाचा एकुलता एक छोटा मुलगा ह्या मुसलमानांनी मारला. त्याचे स्वार्थी मन पेटले, व ह्या मुलावर दया करू नको असे सांगू लागले. पण निस्वार्थी आत्माराम सांगत होता. 'डॉक्टर' तू तुझे कर्तव्य कर. तुझ्या मुलाचा सूड ह्या मुलावर घेऊ नकोस. वैरवृत्तीचा त्याग कर. एक निष्पाप जीवावर दया कर. त्याचा जीव वाचविण्याचा प्रयत्न कर. अशा दोलायमान विचाराच्या अवस्थेत होता. पण त्या मुलाची जखम जबरदस्त असल्याने त्यावर ऑपरेशन हा एकच उपाय असल्यामुळे त्याने मनाच्या द्वंद्व स्थितीत ऑपरेशन सुरू केले. देहरूपी स्वार्थीजीव व आत्मारूपी शिव ह्यांच्या संघर्षात शिवाचा जय झाला. व ऑपरेशन यशस्वीरीत्या पूर्ण झाले. डॉक्टर बाहेर आले. त्या मुसलमान बांधवाने डोळ्यात आनंदाचे अश्रू आणून डॉक्टरांचे आभार मानले. त्या मुलाची कहाणी सांगून संपूर्ण नाव सांगताच डॉक्टर पळत आत गेले, व मुलाचा चेहरा निरखून पाहिला. तो काय आश्चर्य! तो त्याच्या काळजाचा तुकडा होता. तो मुलगा त्याच्या स्वतःचाच होता. डॉक्टराने बाहेर येऊन आनंदाच्या भरात कृतज्ञतेने त्या वृद्ध मुसलमान बांधवाला कडकडून मिठी मारली. राम व रहीम एक झाले. अशा रीतीने आत्मरूपी परमेश्वराची त्यागी निस्वार्थी कर्मयोगी शिकवण आचरणात आणल्यास तो आनंद व सुखाचे भरभरून माप आपल्या पदरात टाकतो.

## श्रीमती कमलाबाई दिक्षितांचे निधन

साई भक्त परायण श्री. काकासाहेब दिक्षितांच्या वयोवृद्ध सूनबाई कमलाबाई रामकृष्ण दिक्षित यांचे विलेपारले मुक्कामी दुःखद निधन झाले. त्यांचे पती श्री. रामकृष्ण यांना श्रीसाईबाबा बाबू या नावाने हाक मारीत असत. त्यांच्या मुंजीला श्रीसाईनाथ आपण स्वतः हजर राहू असे म्हणाले होते. कै. कमलाबाई या प्रखर साईभक्त होत्या.

श्री दिक्षित कुटुंबियावर कोसळलेल्या आघात प्रसंगी सर्व साईभक्त व श्रीसाईबाबा संस्थान त्यांच्या दुःखात सहभागी आहे.

<u>छोट्या भक्तांसाठी</u>

# —= योगीराज अरविन्द =—

**श्री सत्यवान गायकवाड**
३१९ नवी खडकी येरवडा
पुणे - ४११००६

*नाही संतपण मिळत हे हाटी।*
*हिंडता रानी-वनी ॥१॥*
*न ये मोल देता धनाचिया राशि।*
*नाही ते आकाशी पाताळी तें ॥२॥*
*तुका म्हणे जिवाचिये साठी*
*नाही तरी गोष्टी बोलू नये ॥३॥*

संतपणाचा अधिकार बाजारात मिळत नाही. किंवा रानी-वनी गिरिकपाटात हिंडण्यानेही मिळत नाही. द्रव्याच्या राशीच्या-राशी जरी किंमत दिली तरी ते संतपण मिळत नाही. व ते आकाशात अगर पाताळात कोठेही मिळत नाही. तुकाराम महाराज म्हणतात. हरीला आपला जीव अर्पण करण्यात ते संतपण मिळत असते. अशी जर स्थिती असेल तर संतपणाची गोष्ट बोलू नये.

**श्री अरविंद यांचा जन्म व स्वाध्याय काळ—**

श्री अरविंद यांचा जन्म कलकत्ता शहरी ता. १५ ऑगस्ट १८७२ रोजीं झाला. त्यांचे वडील कृष्णधन घोष हे त्या काळातील एक लोकप्रिय व नामांकित डॉक्टर होते. वयाच्या सातव्या वर्षी १८७९ साली श्री अरविंद यांस त्यांच्या दोन वडील बंधूंसह इंग्लंडमध्ये अभ्यासासाठी पाठविण्यात आले.

यथाक्रम केंब्रिज किंग्ज कॉलेजमध्ये दोन वर्षे अभ्यास करून ते हिंदी सिव्हील सर्विसच्या परिक्षेस बसले. त्या परिक्षेत ते मानसन्मानासह पास झाले. परंतु त्यांना आय.सी.एस. चा मुळीच मोह वाटत नव्हता. घोड्यावर बसण्याची परीक्षा शिल्लक राहिली होती. त्या परिक्षेच्या वेळी हजर न राहून त्या जंजाळातून आपली सुटका करून घेतली होती. त्या काळात त्यांनी केवळ इंग्रजी भाषेवरच नव्हे तर फ्रेंच, ग्रीक, लॅटीन, जर्मन व इटालियन भाषांवरही उत्तम प्रकारचे प्रभुत्व संपादन केले होते. बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड हे त्यावेळी लंडनमध्ये होते. श्री अरविंद त्यांना भेटले व बडोदे सरकारची नोकरी पत्करून ते फेब्रुवारी १८९३ मध्ये मायदेशी परतले.

श्री अरविंद मायदेशात परतल्यावर बडोदा कॉलेजात प्रथम इंग्रजीचे अध्यापक या नात्याने व शेवटी त्या कॉलेजचे उपप्राचार्य या नात्याने त्यांची नेमणूक झाली. हा बडोद्यातील तेरा वर्षाचा काळ म्हणजे पूर्व तयारीचा होता. तेथे त्यांनी आपली मातृभाषा बंगाली, तसेच संस्कृत व इतर देशी भाषांचा अभ्यास करून त्या त्या भाषातील

वाङ्मयाचे परिशीलन केले. या स्वाध्याय कालात त्यांनी हिंदी राजकारणाचाही अभ्यास केला. त्यांनी ''इंदुप्रकाश'' या नावाचे इंग्रजी-मराठी दैनिक सुरू करून देशस्थितीवर काही लेख लिहिले. या काळात त्यांच्याकडून बरेचसे काव्य लेखनही घडले.

बाहेरच्या जगाला श्री अरविंद हे प्राध्यापक किंवा कवी या नात्याने माहित होते तर ते एक विद्यार्थी या नात्याने स्वाध्यायात गढून गेले होते. बडोदे येथे असता ज्या हुद्यावर ते काम करीत होते त्या हुद्यावरून जाहीर रीतीने चळवळीत भाग घेता येत नव्हता. या काळातील त्यांच्या मनःस्थितीची साधारण कल्पना त्यांनी आपली पत्नी श्रीमती मृणालिनी देवी हिला लिहिलेल्या तीन पत्रावरून करता येते. ती पत्रे माणिकतोळा बाँब कटाच्या खटल्यात सरकार तर्फे पुराव्यादाखल सादर करण्यात आली होती, व त्यामुळेच श्री अरविंदांचे त्या काळातील मनोगत समजणे शक्य झाले आहे.

म्हणता म्हणता १९०५ साली बंगालमध्ये फाळणी विरुद्ध चळवळ सुरू झाली. राजकीय चळवळीत पदार्पण करण्याची हीच योग्य संधि आहे. हे जाणून १९०६ साली बडोदे सोडून श्री अरविंद हे नवीनच स्थापन झालेल्या बंगाल नॅशनल कॉलेजचे प्राचार्य या नात्याने कलकत्त्यास निघून गेले.

### वन्देमातरम्

श्री अरविंदांच्या हिंदी राजकारणांशी १९०२ ते १९१० पर्यंत म्हणजे सुमारे आठ वर्षे सबंध होता असे म्हणता येईल. ही पहिली चार वर्षे ते पडद्याआड वावरत-होते. त्या काळात हिंदी राष्ट्रीय सभेची सूत्रे नेमस्त पक्षाच्या हाती होती. चढाईच्या धोरणास बंगाल फाळणीविरुद्ध सुरू झालेल्या लढ्याने प्रारंभ झाला.

श्री अरविंद बंगाल मध्ये येताच राष्ट्रीय पक्षाची जमवाजमव करून त्या पक्षाने आपल्यापुढे निश्चित स्वरुपाचा कार्यक्रम ठेवला होता. लो. टिळक हे या पक्षाचे नेते होते. या पक्षाने नेमस्त पक्षावर जोरदार हल्ला केला आणि त्यांचे सामर्थ्य खिळखिळे करून अवघ्या दोन वर्षात हिंदी राजकारणाचे स्वरूप पार बदलून टाकले. ''वंदेमातरम्'' हे या राष्ट्रीय पक्षाचे मुखपत्र होते व श्री अरविंद यांचे त्या पत्रावर संपादक म्हणून नाव नसले तरी या पत्राचे सूत्रचालक तेच होते.

### प्रत्यक्ष कार्यास प्रारंभ

१९०७ साली श्री अरविंदांवर राजद्रोहाच्या आरोपावरून सरकारकडून खटला भरण्यात आला. परंतु आरोप सिद्ध न झाल्यामुळे त्यांना सोडून देणे सरकारला भाग पडले. श्री. अरविंद तुरुंगात होते तरी वंदेमातरम् पत्र बंद पडेपर्यंत त्यांच्या धोरणांनुसार चालू होते. स्वावलंबन, असहकार, कोर्टकचेऱ्यावरील बहिष्कार, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण वगैरे राष्ट्रीय पक्षांच्या तत्वांचा प्रचार व पुरस्कार या पत्राने अत्यंत परिणामकारक रीतीने केला.

श्री अरविंद यांना तुरुंगातून सोडल्या नंतर त्यांच्या बरोबरीने कार्य करणाऱ्या पुढाऱ्यांस सरकारने तुरुंगात टाकल्यामुळे श्री अरविंद यांस बंगालमधील राष्ट्रीय पक्षाचे एक पुढारी या नात्याने पुढे येणे भाग पडले. तेवढ्यात डिसें. १९०७ मध्ये ते सुरतेस गेले, व

तेथे भरलेल्या राष्ट्रीय पक्षाच्या परिषदेचे अध्यक्षस्थान त्यांनाच स्विकारावे लागले.

सुरत येथून श्री अरविंद बडोदे येथे गेले. तेथे त्यांच्या जुन्या मित्रांनी व विद्यार्थ्यांनी त्यांचे स्वागत धुमधडाक्याने केले. बडोद्यास त्यांनी दिलेल्या या भेटीचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. कारण या भेटीत त्यांची व योगी विष्णु भास्कर लेले यांची भेट झाली. बडोदे येथे असता १९०४ सालापासून श्री. अरविंदांनी आसने व प्राणायाम यांच्या सहाय्याने साधना सुरू केली होती. श्री लेले यांनी त्यांना साधनेची पुढील पायरी अर्थात मन एकाग्र कसे करावे व मनातील विचार काढून टाकून मन निर्लेप कसे करावे याचा मार्ग दाखवून दिला.

आता श्री अरविंदांचे संशयनिरसन झालेले होते. १९०८ सालच्या आरंभी आपल्या पत्नीस लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात "मी आता सर्वस्वी भगवंतांच्या हाती सोपविला गेलो आहे, तो जिकडे मला घेऊन जाईल तिकडे जावे लागेल"

**क्रांतिकारक योगी**

सुरतेहून निघाल्यानंतर बडोदे मुंबई पुणे वगैरे ठिकाणी जाऊन श्री अरविंद हे कलकत्त्यास परत आले व पुनश्च आपल्या उद्योगास लागले. त्यांची वृत्ती, आता योगमय झाली होती. मे १९०८ मध्ये माणिकतोळा बॉंब कटाशी संबंध असल्याच्या आरोपावरून त्यांना अटक करण्यात आली. त्यांचे बंधू बारिंद्रकुमार यांच्या नेतृत्वाखाली क्रांतिकारकांचे एक मंडळ स्थापन झाले होते. त्या अत्याचारी मंडळींशीही श्री अरविंद यांचा सबंध असावा अशा संशयाने त्यांच्यावर अलीपूर येथील कोर्टात खटला सुरू झाला. त्यांना तुरुंगात एकांतवासात ठेवण्यात आले होते. तेथे त्यांनी आपली साधना चालू ठेवली होती. कारागृहात काय किंवा कारागृहाबाहेर काय त्यांना सारी चराचर सृष्टी ईश्वरमय वाटू लागली होती. सुमारे एक वर्षभर खटल्याचे काम चालून शेवटी त्यांच्याविरुद्ध विश्वसनीय असा पुरावा पुढे न आल्यामुळे या खटल्यांतही त्यांची निर्दोषी म्हणून सुटका झाली.

१९०९ मध्ये श्री अरविंद कारागृहातून बाहेर आले तेव्हा राष्ट्रीय पक्ष मोडकळीस आला होता. त्यांचे मन कळवळले अशा परिस्थितीमध्ये त्यांनी आपल्या पक्षाचे निशाण वर्षभर फडकावले.

**कारागृहातील योगसाधना व साक्षात्कार**

श्री अरविंद यांच्या ठायी आत्यंतिक ध्येयवाद व अध्यात्मवाद वास करीत होता; आणि त्यामुळेच धकाधकीच्या जीवनक्रमांस रामराम ठोकून त्यांनी संपूर्ण एकांतवासाचा जीवनक्रम स्वीकारला असावा, असे पुष्कळांस वाटत असावे हे तत्व स्वाभाविकच आहे. त्यांच्या दृष्टीने हा स्वीकृत जीवनक्रम प्रशंसनीय व ठीक असेल, परंतु जगाला त्यापासून फायदा काय? मोक्ष मिळावा म्हणून सर्वांची धडपड चालू असते; परंतु या जगात राहून तो कसा मिळावा? आणि म्हणूनच पुरातन काळापासून मोक्षासाठी धडपडणाऱ्यांनी जगाकडे पाठ फिरवली आहे. ऐहिक दुःखापासून त्यांनी मुक्तता मिळवली आहे. पण मानवजात सुखदुःखाच्या फेऱ्यात सापडून असहाय्य स्थितीत एकसारखे गोते खात आहेच की नाही? श्री अरविंदासारख्या विमल व चारित्र्यसंपन्न व्यक्तिने आध्यात्मिक

मोक्ष मिळविला तरी दुःखाने गांजलेल्या व पोळलेल्या मानवजातीला त्याचे काय? तत्वज्ञान हे काही पोटाच्या भाकरीची सोय करू शकत नाही; किंवा तत्वज्ञान एकाद्याची दाढ दुःखी बंद करत नाही आणि काव्य म्हणजे तरी काय? रंगीबेरंगी स्वप्ने रंगवण्या पलीकडे तरी काय आहे. या दोन्ही गोष्टींचे मानवाने विचारांची सांगड घातल्यास त्याला मृत्यूच्या क्षणार्धापर्यंत त्या कळणार नाही. की तत्वज्ञान म्हणजे काय, काव्य म्हणजे काय त्या करिता योगसाधना करणे हेच उचित आहे म्हणजे स्वतःस तत्वज्ञान, काव्य, योगसाधना यांचे जीवनात काय महत्व आहे. हे कळल्यावाचून राहणार नाही. श्री अरविंदांच्या ठायी तत्वज्ञान, काव्य आणि योग साधना पुरेपूर उतरली होती. श्री. अरविंदांनी जगाच्या अस्तित्वाशी पुरेपूर पाठ फिरविली होती, आणि सर्वस्वी सत्वाशी समरस होऊन योगसाधना पत्करली होती. म्हणूनच त्यांना परमेश्वराचा ज्वलंत साक्षात्कार घडला.

अलीपूर-बाँब प्रकरणाशी सबंध असल्याच्या आरोपावरून श्री अरविंद यांना अटक करण्यात येऊन त्यांना एक वर्षभर अटकेत ठेवण्यात आले होते. शेवटी शेवटी निर्दोषी म्हणून त्यांची सुटका करण्यात आली होती. भावी कार्याच्या दृष्टीने हा एक वर्षाचा अनुभव कारागृहवास महत्वाचा होता. त्यामुळे त्यांच्या जीवनात अभूतपूर्व थारे पालट घडून आला. या कारागृहवासांतील अनुभव श्री अरविंद यांनी "कारागृहवासातील कहाणी" या बंगाली पुस्तकात नमूद केले असून त्यातील काही भागांचे थोडक्यात भाषांतर पुढे देण्यात येत आहे.

"कारागृहांतील पहिले कित्येक दिवस मला पुस्तके किंवा इतर कोणत्याही आवश्यक साधनाशिवाय घालवावे लागले. त्यानंतर प्रिझन अधिकारी यांच्या परवानगीने घराकडून धोतर, शर्ट मागविले. त्याचप्रमाणे एक पत्र पाठवून गीता व उपनिषदे या माझ्या शेदोऱ्या मागविल्या. त्यापूर्वीच मला एकांतवासाचा अर्थ समजून घेण्यात भरपूर अवधि मेळाला होता. अशा प्रकारच्या कैदखान्यात मला परमेश्वर भक्तिची कास दृष्टीस पडली. कैदखान्यात येण्यापूर्वी मी सकाळी एक तास व सायंकाळी एक तास ध्यानधारणेत घालवू लागलो. तुरुंगात आल्या नंतर दुसरे काम नसल्याने बहुतेक वेळ पुन्हा ध्यानधारणेतच घालवत असायचो. अशा प्रकारच्या एकांत कैदेतच मला ईश्वराच्या अपार दयेचा अनुभव घेण्याची व त्याच्याशी तन्मय होण्याची दुर्लभ संधि मिळाली, आणि परमेश्वराविषयी अविट गोडी निर्माण झाली. मनुष्यांचे चंचल मन नेहमी हजारो गोष्टीकडे धाव घेत असते. त्याला एकाग्र करणे ही सहज साध्य गोष्ट नव्हे. तशी सवड पाडावी लागते. शेवटी श्री अरविंद सांगतात कि जेमतेम रोजच्या २४ तासांच्या संधित २४ सेकंद जरी मानवाने त्या दयाळू भगवंताचे नामस्मरण केल्यास त्यास प्रत्येक जन्म फेरे पुण्यप्रद झाल्यावाचून रहाणार नाहीत. अशी माझी खात्रीपूर्वक चिकित्सा आहे. हे प्रत्येक मानवप्राण्याने विसरू नये.

*योगी कविंद्र अरविंद-कला-विलास*
*भाषांतरी धजत मी अनुवादण्यास*
*राधेमुळे हरि जसा वश गोपिकांस*
*सत्संग तें पण यश देईल या कृतीस!*

# श्री साईलीला - लेखक - कवी बारावे स्नेहसंमेलन शिरडी - १९८६

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी ही एक आंतरराष्ट्रीय सुकिर्तीची आध्यात्मिक संस्था आहे. भगवान श्रीसाईनाथांच्या परम पवित्र चरण स्पर्शाने पावन झालेली शिर्डी भूमी आहे. आज ही भूमी भारतातील एक ज्येष्ठ तीर्थक्षेत्र म्हणून ओळखली जाते. श्री बाबांच्या महानिर्वाणाला ६७ वर्षे झाली तरी बाबा याच भूमीत अद्याप वास करून ,आहेत अशी समस्त साईभक्तांची अपार श्रद्धा आहे. अशा या महान तीर्थक्षेत्रीच्या संस्थानेतर्फे दरमहा 'श्री साईलीला' नावाचे एक मराठीतून व इंग्रजी-हिंदीतून एक अशी दोन मासिके नियमित प्रकाशित होत असतात. या दिगंत सुकीर्तीच्या मासिकातून लेखन करणाऱ्या लेखक कवींचे यंदाचे बारावे संमेलन रविवार ता. २ व सोमवार ता. ३ फेब्रुवारी १९८६ रोजी शिरडीस भरविण्यात आले होते. १९०५ साली पाहिले असे संमेलन भरविण्यात आले तेव्हा २०/२५ मंडळीच काय ती हजर होती पण यंदा २०० वर मंडळींनी हजर राहून आपले बाबांवरील व या मासिकावरील प्रेम व्यक्त केले. यंदा १९८० ते १९८५ या काळात श्री साईलीलातून आपले साहित्य दोनदा तरी प्रकाशित झालेले असावे अशी अट लेखक-कवींवर घालण्यात आली होती व यामुळेच की काय संख्या वाढली होती. संमेलनास येणाऱ्या लेखक-कवींनी भरून पाठविण्याचा तक्ता यंदा श्री साईलीला नोव्हें-डिसें ८५ च्या दिवाळी अंकातच प्रसिद्ध करण्यात आला होता; व तक्ता भरून पाठविणे हेच निमंत्रण समजून ता. १ फेब्रु. ८६ चे सायंकाळपर्यंत शिरडीस यावे असे सूचित करण्यात आले होते.

यंदा हे संमेलन मंगल कार्यालयातील पहिल्या मजल्यावर घेण्यात आले. पहिले सत्र तिथेच झाले. पण नंतर जागा अपुरी पडू लागली म्हणून दुसरे, तिसरे व शेवटचे चौथे सत्र मंगल कार्यालयातील तळमजल्यावर घेण्यात आले. सभागृहात उत्तम प्रकारची विजेची रोषणाई करण्यात आली होती. सभागृहाच्या दालनात मुलायम गादीच्या बैठका दोन्ही बाजूस अंथरून स्त्री-पुरुष लेखक-कवींची बैठक सोय करण्यात आली होती.

या संमेलनास ४ थ्या संमेलनाचे माजी अध्यक्ष व अहमदनगरचे विख्यात शिक्षणमहर्षि श्री. गणेश जयदेव उर्फ अप्पासाहेब चितांबर, ९ व्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. रा.सी. कापडी कोल्हापूर, १० व्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. लक्ष्मणराव नाईक इंदूर, मद्रास येथील ऑल इंडिया साई समाजाचे अध्यक्ष श्री. टी. केशवराव, चिटणीस डॉ. मुथ्थू वेंकटरामन, बंगलोरच्या श्री साई स्पिरीच्युअल सेंटरचे अध्यक्ष श्री. एन. मुदलीयार, इंदूरचे विख्यात साईभक्त जस्टिस रेगे यांच्या सुविद्य संस्कृत पंडित कन्या कु. शांताताई रेगे, जबलपूरच्या शासकीय महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. ठाकूर भूपतीसिंह, कसौली-गरखलचे साईभक्त व हिमाचल प्रदेश शिक्षणमहर्षि श्री. पी.एल. गोयल, शिरडी साई मिशन हैद्राबादचे डॉ. श्री. एम. रंगाचारी, महाराष्ट्र राज्य अर्थखाते उपसचिव श्री. चकोर आजगावकर इ. पाहुणे मंडळी हजर होती. श्री साईबाबांना लहानपणी अनेकदा पाहिलेले


व त्यांच्या हातचा प्रसाद ग्रहण केलेले अंधेरीचे साईभक्त श्री. शंकरराव हरीभाऊ चौबळ हे पण उपस्थित होते.

यंदा या संमेलनाच्या अध्यक्षपदी श्री साईबाबा संस्थान शिरडी प्रकाशन समितीचे अध्यक्ष श्री. विश्वासराव खेर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुंबईच्या दैनिक 'नवशक्ति'चे संपादक श्री. पु.रा. उर्फ बापूसाहेब बेहेरे हे सपत्नीक आले होते.

संमेलनास ठीक सुरुवात रवि. ता. २ रोजी सकाळी ९ वा. झाली. मंगल कार्यालयातील पहिल्या मजल्यावर थोड्या दाटीवाटीने भक्तमंडळी बसली होती. व्यासपीठावरील जागेत संस्थानचे कार्यकारी अधिकारी श्री. रा. द. बन्नेसाहेब , अध्यक्ष महोदय श्री. विश्वास राव खेर, मुख्य पाहुणे श्री. पु. रा. बेहेरे व श्री. चकोर आजगांवकर, सौ. मनोरमा बेहेरे, श्री. साईलीला इंग्रजी आवृत्तीच्या का. संपादिका डॉ. सौ. इंदिरा खेर, श्री. टी. केशवराव, डॉ. मुथ्थुवेंकटरामन मद्रास, डॉ. रा. सी. कापडी, श्री. लक्ष्मणराव नाईक, श्री. शंकरराव चौबळ, विश्वस्त सदस्य डॉ. किर्तीकर, श्री. कोऱ्हाळकर, श्री. दर्प साहेब माजी न्यायालय अधिकारी, श्री. क. हि. काकरे साहेब व श्री साईलीला मराठी आवृत्तीचे का. संपादक सदानंद चेंदवणकर ही मंडळी बसली होती. संस्थानचे कार्यालयीन अधिक्षक श्री. द. चिं. पाठक साहेब, विश्वस्त सदस्य श्री. प्रकाश कारखानीस साहेब, श्री. प्रकाश देशपांडे, श्री. भाऊसाहेब साबळे व सुभाष चेंदवणकर ही मंडळी अन्य व्यवस्था पहात होती.

संमेलनाच्या सुरवातीस श्री. श्रीराम सातर्डेकर यांनी स्वागत गीत गाईले. त्यांचेबरोबर साथीला समिती विश्वस्त डॉ. किर्तीकर हे होते. यानंतर १९८५ या वर्ष काळातील दिवंगत साई भक्तांना मिनिटभर उभे राहून श्रद्धांजली वहाण्यात आली. नंतर या संमेलनास आलेल्या साईभक्त लेखक-कवींचा परिचय करून घेण्याचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. व्यासपीठावरील मंडळीचा परिचय श्री. बन्नेसाहेबांनी करून दिला. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचाही त्यांनी परिचय करून दिला. यानंतर चहापानाचा कार्यक्रम झाला.

यानंतर श्री. पु. रा. बेहेरे यांनी सभेस उद्देशून भाषण केले. आपल्या भाषणात ते म्हणाले, "श्री साईबाबांची शिरडी हे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. या तीर्थक्षेत्राचे पावित्र्य राखले गेले पाहिजे व ते राखणे हे साईभक्तांचे कर्तव्य आहे. कोणतेही क्षेत्र स्थान हे 'पिकनिक स्पॉट' होता कामा नये. सरकारचे लांडे कारभार तीर्थक्षेत्रस्थानी चालू देता कामा नयेत. तीर्थक्षेत्री त्रितारांकित किंवा पंचतारांकित हॉटेले काढून किंवा त्यांना काढण्यास परवानगी मिळता कामा नये. तीर्थक्षेत्रांचे विडंबन होता कामा नये. याबाबतीत भक्तांनीच जागरूक राहिले पाहिजे. साईबाबा हे महान होते. त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी, तीर्थक्षेत्र आज तिरूपतीशी स्पर्धा करू पहात आहे. भक्तमंडळींची येथे नेहमीच गर्दी होत असते. हिंदी भाषेत गोरखपूरहून श्री. हनुमान प्रसाद पोद्दार यांचे 'कल्याण' नावाचे मासिक जे प्रकाशित होत असते त्याने आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्य करून फार मोठी कामगिरी बजावलेली आहे. आज लाखोवर प्रती या मासिकाच्या खपत आहेत. अहमदाबादच्या 'अखंड आनंद' या गुजराथी मासिकानेही असेच भरीव कार्य केले आहे.




*श्री साईलीला लेखक-कवी संमेलन प्रसंगी प्रमुख पाहुणे 'नवशक्ति'कार श्री. पु.रा. बेहेरे भाषण करताना, शेजारी प्रकाशन समिती अध्यक्ष श्री. विश्वासराव खेर व त्यांचे शेजारी कार्यकारी अधिकारी श्री. रा. द. बन्नेसाहेब.*

मराठी भाषेत ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम इ.इ. संतांची व त्यांच्या साहित्याची अतिशय समृद्ध अशी परंपरा आहे. गजानन महाराज, अक्कलकोट स्वामी, साईबाबा इ.इ. सिद्ध पुरुषांची, सत्पुरुषांची मोठी परंपरा आहे. असे असताना या सर्व परंपरा 'श्री साईलीला' मासिकात प्रतिबिंबित झाल्या पाहिजेत. या मासिकात महाराष्ट्राच्या आध्यात्मिक परंपरेचे धार्मिक आणि आध्यात्मिक विचारांचे दर्शन घडले पाहिजे. या मासिकाचा दर्जा उंचावला पाहिजे, वाढला पाहिजे.

श्री. बेहेरे पुढे म्हणाले, आज 'बायबल' फुकट वाटले जाते. साईबाबा हे सर्वात मोठे मिशनरी आहेत. त्यांचे दाभोलकर लिखित 'साई सच्चरित' हा पवित्र ग्रंथ बायबलप्रमाणेच आज कमीत कमी किंमतीत विकला गेला पाहिजे. ज्ञानेश्वरी पारायणाप्रमाणे श्री साई सच्चरिताचे पारायण करताहेत हे दृश्य सर्वत्र दिसले पाहिजे. साईंचा हा ग्रंथ अतिशय प्रसादिक आणि खुद्द बाबांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने तयार झालेला आहे. दाभोलकर लिखित या ग्रंथावर एकनाथी भागवताची छाया पडलेली आहे. वाङ्मय दृष्ट्या हा ग्रंथ महिपतींच्या संत चरित्राच्या मालिकेत बसण्याच्या योग्यतेचा

आहे. असा हा ग्रंथ भक्तांना स्वस्त किंमतीत मिळाला पाहिजे. श्री साईबाबांच्या नावाने, निमित्ताने महाराष्ट्राची आध्यात्मिक परंपरा आणि धार्मिक विचार घराघरापर्यंत जाणे अधिक महत्वाचे आहे. तेव्हा साईसतचरित स्वस्तात स्वस्त विविध भाषाभाषांमधून उपलब्ध व्हावे, तसेच साईबाबांचे विचार आणि त्यांनी निर्माण केलेली परंपराही एकदेशीय नाही; संकुचित नाही ती उदार व व्यापक परंपरा आहे व या परंपरेचे दर्शन 'साईलीला' मासिकातून घडले पाहिजे, व त्यासाठी संस्थानने या मासिकावर भरपूर खर्च करण्याची तयारी ठेवली पाहिजे असे आपले विचार प्रगट केले.



*श्री. पु. रा. बेहरे यांच्या भाषणाचा इंग्रजी अनुवाद सादर करताना साईलीला इंग्रजी आवृत्तीच्या कार्यकारी संपादिका प्रा. डॉ. इंदिराताई खेर.*

श्री. बेहेरे यांच्या भाषणाचा समारोप करताना संमेलनाचे अध्यक्ष व संस्थानच्या प्रकाशन समितीचे कार्याध्यक्ष श्री. विश्वासराव खेर यांनी श्री साईसच्चरिताचे विविध भाषाभाषांमधून अनुवाद करण्याचे काम चालू झालेले आहे व साईबाबांचा संदेश जगात सर्वत्र पोहोचविला गेला पाहिजे. संस्थानच्या प्रकाशनांच्या बाबतीत प्रमुख पाहुण्यांनी केलेल्या मौलिक सूचनांचा अवश्य विचार करू असे सांगितले.

या संमेलनाला मद्रास, बंगलोर, पंजाब, गुजराथ, कर्नाटक इ. राज्यातून विविध भाषी साईभक्त लेखक-कवी मंडळी हजर होती तेव्हा श्री. बेहेरे यांच्या मराठी भाषणाचा इंग्रजी अनुवाद श्री साईलीला इंग्रजी हिंदी आवृतीच्या कार्यकारी संपादिका सौ. इंदिरा खेर यांनी केला.

दुपारी ठीक ३ वाजता दुसरे सत्र सुरू झाले. मंगल कार्यालयातील तळ मजल्यावर ते भरविण्यात आले. यावेळी संस्थानचे एक विश्वस्त व प्रकाशन समितीचे सदस्य श्री. प्रकाश कारखानीस अध्यक्षपदी होते. सुरुवातीस श्री. अशोक म्हात्रे यांनी काही भक्तिपर कविता गाईल्या.




*संमेलनाच्या दुसऱ्या सत्राचे संचलन करताना अध्यक्ष श्री. प्रकाश कारखानीस, शेजारी श्री. बन्नेसाहेब.*

दुपारच्या या चर्चा सत्रात शिरडी संस्थानची प्रकाशने व श्री साईलीला मासिक या संबंधी सूचना भक्त लेखक मंडळींनी केल्या. एकंदर ३७ मंडळींनी यात भाग घेतला व आपापले विचार प्रगट केले.

या सत्रातच कोल्हापूरचे वयोवृद्ध साईभक्त व माजी अध्यक्ष डॉ. रा. सी. कापडी व इंदूरचे श्री. लक्ष्मणराव नाईक यांचीही भाषणे झाली.

येथपर्यंत सात वाजले व मंडळी सायं प्रसाद भोजनासाठी गेली. एकीकडे रात्री ९ वा. 'शिरडीचे साईबाबा' हा मराठी चित्रपट दाखविण्यात आला. त्यावेळी काही भक्तमंडळी बैठकस्थानी हजर होती तर काही मंडळी साई दरबारात काव्य गायनाची हजेरी लावीत होती, तर काही ती ऐकत होती.

दुसऱ्या दिवशी सोमवार ता. ३ फेब्रु. रोजी सकाळी ९ वा. तिसऱ्या सत्रास सुरुवात झाली. यावेळी श्री साईलीलाच्या श्री साईकाव्य बहार विशेषांकाचे प्रकाशन श्री. पु. रा. बेहेरे यांचे हस्ते करण्यात आले. या खास अंकात ९६ कवी-कवयित्रींच्या साईपर कविता समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. आजवर एकाच अंकात इतक्या कविता कधीच प्रसिद्ध करण्यात आल्या नाहीत. ज्यांच्या कविता या अंकात आहेत त्यांना प्रमुख

पाहुण्यांच्या हस्ते अंकाचे वाटप व प्रसाद धन देण्यात आले. एकंदर ४२ अशी मंडळी हजर होती.

यानंतर कार्यकारी अधिकारी श्री. बन्नेसाहेब यांचे हस्ते श्री. पु. रा. बेहेरे व सौ. मनोरमा बेहेरे यांचा शाल व श्रीफल हार देऊन सत्कार करण्यात आला. साईदर्शन आपल्या चक्षूंनी घेतलेले वयोवृद्ध साईभक्त श्री. शंकरराव चौबळ यांचाही याप्रसंगी हार व श्रीफल देऊन श्री. बन्नेसाहेबांनी सत्कार केला. सत्कारानंतर श्री. चौबळ यांनी साई सहवासातले आपले अनुभव कथन केले. माजी न्यायालय अधिकारी श्री. काकरे साहेबांनीही समयोचित भाषण केले. मद्रासचे ऑल इंडिया साईसमाजाचे अध्यक्ष श्री. टी. केशवराव यांनीही या प्रसंगी भाषण करून या संमेलनास आपल्याला निमंत्रित केल्याबद्दल आभार प्रदर्शन केले. यानंतर श्री. व सौ. बेहेरे व त्यांचेबरोबर श्री. व सौ. खेर मुंबईला रवाना झाली. सभागृहात काही वेळ काव्य गायनाचा तर काही वेळ सूचनांचा कार्यक्रम झाला व तिसरे सत्र ठीक ११.३० वा. संपले.

दुपारी ठीक ३ वा. चौथ्या व शेवटच्या सत्रास सुरुवात झाली. यावेळी श्री. बिपीन स्वादियांचे चिरंजीव व कन्यकानी भक्तांची भरपूर करमणूक केली. काही वेळ काव्य गायनात गेला, काही वेळ भक्तांनी आणखीन काही सूचना करण्यात गेला. कु. शांताताई रेगे यांनी अस्खलित हिंदीत भाषण करून साईभक्तीची ज्योत अखंडितपणे प्रत्येकाने तेवत ठेवावी असे आवाहन केले. यानंतर संस्थानतर्फे उपस्थित साई लेखक-कवी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थानतर्फे हार व श्रीफल, अहमदनगरचे साईभक्त व माजी अध्यक्ष श्री. ग. ज. चिदंबर यांनी भेट दिलेली द्वारकामाईतील साईंची प्रतिमा, दिल्लीचे श्री. आर. एस. चिटणीस यांनी दरवर्षाप्रमाणे पाठविलेले श्रीसाईंचे सुंदर रंगीत कॅलेंडर, श्रीसाई सुधा - ट्रस्ट गरखलचे श्री. पी. एल. गोमल यांनी आपला साईमहिमा अंक व त्यासोबत सुंदर



*संमेलनाला आलेल्या स्त्री पुरुष लेखक बंधु-भगिनींचा मेळावा.*

चाव्या अडकवण्याची साखळी व शिर्डीच्याच श्रीमती लीलाताई गुजराथी यांनी दिलेली खाऊभेट प्रत्येकास अध्यक्ष श्री. प्रकाश कारखानीस यांचे हस्ते देण्यात आल्या.

श्री. बन्नेसाहेब यांनी सर्वांचे आभार मानले. पुरुष विभागांतर्फे श्री. जगदीश देवपूरकर व महिला भक्तांतर्फे डॉ. सौ. सुमनी खानविलकरांनी आभार मानले व सौ. आसावरी वायकूळ यांनी गायिलेल्या निरोपगीत गायनाने व त्यानंतर पसायदानाने हा दोन दिवसांचा सोहळा संपला.

रात्री भोजन, दरबारात हजेरी, आरती हा कार्यक्रम झाल्यावर दुसरे दिवशी आलेली पाहुणे मंडळी घरोघर परतली. संस्थानने निवास, भोजन, चहापान इ.ची व्यवस्था चोख ठेवली होती.

संमेलनाची छायाचित्रे — श्री. जगन्नाथ कुलकर्णी, पुणे

# श्रीसाईबाबांचा धर्म

**श्री. शं. ग. सारंगधर**
अ/८, डहाणूकरवाडी
कांदिवली (पश्चिम)
मुंबई ४०००६७

असे म्हणतात की नदीचे मूळ व ऋषीचे (साधुचे) कुळ शोधू नये. पण श्रीबाबा हयात असताना त्यांचे कुळ शोधण्याची खूप उठाठेव झाली. श्रीबाबा धूप खेड्याचे पाटील श्री. चांदभाई यांच्या घरच्या लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर शिरडीस आले. हे धूप खेडे मराठवाड्यांतील निजामच्या राज्यांतील. म्हणून साईबाबांच्या बोलण्यात यवनी शब्द वारंवार येत. व्यक्तिचे वास्तव्य ज्या भागांत असते त्या भागांतील भाषेचा परिणाम त्याच्या मातृभाषेवर सहाजिकच होतो. पण धर्माचा याच्याशी संबंध येत नाही. धर्म जन्मानी येतो, भाषेवर संस्काराचा परिणाम होत असतो.

श्रीसाईबाबा हिंदू होते ते मुसलमान नव्हते याबद्दल श्रीसाई-सच्चरितात अनेक ठिकाणी उल्लेख आढळतात. हे श्रीसाई- सच्चरित हेमाडपंतानी (श्री. गोविंदराव दाभोलकरानी) श्रीसाईबाबांच्या अनुज्ञेने लिहीले आहे. इतकेच नव्हे तर श्रीसाईबाबांनी जसे सांगितले तसे मी लिहीत गेलो असे हेमाडपंत जागोजागी म्हणतात.

तोचि की साई अनुमोदिता। तोच तो माझा बुद्धिदाता।
तोच मूळ चेतना चेतविता। तयाची कथा तोच करी।

(सा. स. अ. ४० ओ. १३)

श्रीसाईसच्चरितात असे उल्लेख वारंवार आढळतात. 'अल्ला तेरा भला करेगा' असे

श्रीसाईबाबांच्या तोंडचे उद्‌गार जरी अनेक ठिकाणी पोथींत सांपडले तरी तेवढीच गोष्ट ते हिंदू नव्हते हे सिद्ध करण्यास पुरी पडणार नाही. उलट त्यांचे हिंदुत्व पटविणाऱ्या खूणा श्रीसाईसच्चरितात विपुल आहेत.

बाजूलाच असलेले मारूतीचे देऊळ सोडून आपल्या वास्तव्यासाठी त्यांनी गांवातल्या एका पडक्या मशिदीचा आश्रय घेतला हीच गोष्ट अनेकांच्या त्यांच्या बद्दलच्या गैरसमजास कारणीभूत झाली. पण असा समज करून घेणारांनी त्या जागेचे वर वर जरी निरीक्षण केले असते तरी यवनांना अप्रिय (निषिद्ध) अशा कितीतरी गोष्टी या जागेत चटकन त्यांचे नजरेस पडल्या असत्या. तेथील घंटानाद, अंगणांतील तुळसी- वृंदावन ही फक्त हिंदू मंदिरांतच आढळणार. मशिदीत नाही. टाळ-मृदुंगाच्या साथीसह भजन-किर्तनाचे स्वर मंदिरातूनच येणार.

आणि ती अखंड पेटत असणारी पवित्र धुनी, ती हिंदू धर्मस्थानातच दिसणार. अशा या वास्तुच त्यांनी नामांतर केल- द्वारकामाई! पण धर्माच्या बंधनानी त्यांना इथे कुणाला मज्जाव करायचा नव्हता. कारण प्रवाशासाठी जातीचा धर्माचा विचार त्यांना मान्य नव्हता. तेम्हणतः

चोखामेळा जातीचा महार। रोहिदास हा तो चांभार।
सजन कसाई हिंसा करणार। जातीचा विचार काय यांच्या।

(सा.स.अ. १२ ओ.१६३)

या 'द्वारकामाई'बद्दल ते म्हणतातः
मोठी कृपाळू ही मशीदमाई। भोळ्या भाविकांची ही आई।
कोणी कसाही पडो अपायी। करील ही ठायीच रक्षण।

(सा. स. स. २२)

सुरवातीला श्रीबाबा कुणाला आपली पूजा-आरती करू देत नसत. पण पुढे भक्तांना त्यासाठी त्यांनी आडकाठी केली नाही. श्रीसाईबाबा मुसलमान, आपण त्यांना का नमस्कार करावा, का पूजावे? असे विकल्प आरंभी ज्यांचे मनांत उठले, त्यांना त्यांनी त्यांच्या उपास्य देवतेचे वा गुरुचे आपल्या जागी दर्शन देऊन विस्मय चकीत केले. त्यांच्यांत परिवर्तन घडवून आणले.

एका मामलतदारा बरोबर आलेल्या डॉक्टराना त्यांचे उपास्य दैवत जे जानकीराम त्या रूपात श्रीबाबा त्यांना दिसले. सामुद्रीक श्री. मुळे यांना त्यांचे गुरु घोलपस्वामी श्रीबाबांचे ठिकाणी नजरेस पडले. (पहाः अध्याय १२) श्री. तात्यासाहेब नूलकरांचे स्नेही डॉ. पंडित यांनी तर चक्क श्रीबाबांचे कपाळावर त्रिपुंड्र रेखिला. कां, तर त्यांना श्रीबाबांचे ठिकाणी आपले गुरु 'काका पुराणिक'च बसले आहेत असे वाटले. श्रीबाबांनी या गोष्टीला हरकत कशी घेतली नाही याचाच -तर भक्तजन अचंबा करीत राहिले. (पहा अ.११) शिवभक्त मेघाला ते श्रीशंकराच्या रूपात दिसत व तो श्रीबाबांची बेलांनी (बिल्वपत्रांनी) पूजा करी. श्रीसाईसच्चरितांत असे अनेक प्रसंग वर्णन केलेले आहेत. श्री. नानासाहेब

चांदोरकरांसाठी त्यांनी

'तद्विद्धि प्रणिपातेन, परिप्रश्नेन सेवया।

उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्व दर्शिनः।'

या भगवत् गीतेंतील चवथ्या अध्यायातील वरील श्लोकावर केलेले प्रवचन। विवरण.- त्यांच्या हिंदुत्वाचा आणखी याहून वेगळा पुरावा कोणता हवा?

जन्मजात धर्म खर तर फक्त सामान्यासाठी असतो. संत हे जाती-धर्माच्या बंधना पलिकडे गेलेले असतात. त्यांचा धर्म एकच मानवता! उत्तरेच्या गंगेचे पाणी दक्षिणेच्या रामेश्वराला अभिषेकासाठी घेऊन निघालेल्या एकनाथानी वाटेत तहानेने व्याकूळ झालेल्या गर्दभाला ते पाजले. रामेश्वराच्या अभिषेका पेक्षा एका जित्या जीवाचे प्राण त्यांना अधिक मोलाचे वाटले. अशी ही भूतदया! अशी ही करुणा! श्रीसाईबाबांच्या चरित्र परिशीलनांतून त्यांच्या धर्माचा शोध लागतो तो पण मानव-धर्माचा. कारण संत मानतात एकच धर्मः

मानवता!

वारंवार त्यांच्या धर्माबद्दल शंका प्रगट केल्याने प्रक्षोभित झालेल्या श्रीबाबांना एका विजयादशमीचे दिवशी अंगावरील सारे कपडे धुनींत टाकून जमलेल्यांना सवाल केलाः

त्वेषें टवकारीले नयन। क्रोधे झाले आरक्त नयन।

म्हणती 'करा रे आतां निदान। मी मुसलमान कीं हिंदू'।

(अ.४२ ओ. २७ सा. स.)

## बुकस्टॉल

**श्री साईबाबांचे दर्शनास येणारे भक्तांची संख्या फारच मोठी असते. दर्शनास आलेल्या भक्तांना बाबांचे जीवनावरील पुस्तके व बाबांचे विविध फोटो खरेदी करण्याची उत्कंठा असते. भक्तांना विनाविलंब पुस्तके व फोटो उपलब्ध होणेचे कामी मंदीरासमोरील पुस्तक विक्री विभागाची सेवा अपूर्ण पडू लागल्याने दि. २२।१०।८५ रोजी गुरुस्थान इमारतीचे शेजारी अद्यावत् पुस्तके व फोटो विक्री विभाग संस्थानने सुरू केला आहे. सकाळी ६.०० ते रात्रौ १०.०० पर्यंत ही सेवा उपलब्ध असल्याने साईभक्तांची फार मोठी सोय झाली आहे.**

# कफनी

डॉ. सौ. सुमन खानवीलकर
बँबिपूना रोड लोणावळा

कफनी केवळ तीन अक्षरी शब्द एका पेहराव्याचे नाव जो बाबा नित्य वापरत असत.

पण हे केवळ बाबांचे अंग झाकण्याचे वस्त्र नव्हते ते.

ती होती कफनी ती काय बाबांच्या शरीराचे थंडीवाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी नव्हती ती.

जे पूर्ण ब्रम्ह आहे. त्याला थंडीवाऱ्याची लज्जा रक्षणाची काय गरज.

ती होती सामान्य लोकांसाठी ज्यांना कोणी नाही आधार त्यांच्यासाठी.

कफनी म्हणजे काय

**क** म्हणजे कपट

**फ** म्हणजे फसवणूक

**नी** म्हणजे नियती

ज्यांनी या बाबांच्या कफनीचा आश्रय घेतला आहे. त्यांचे या जगातील कपटी माणसापासून धार्मिक, व्यवहारिक फसवणूकीपासून आणि काळाच्या क्रूर नियतीच्या खेळापासून संरक्षण करणे हा त्या कफनीचा धर्म आहे. दया, क्षमा, श्रद्धा नि सबूरी ही जशी बाबांची शिकवण आहे. तसेच भक्तजनांसाठी कफनीरूपी बाबांचे छत्र आहे, आणि हे छत्र ३२ हात कापडा इतके मर्यादित नाही. तर ते गगना इतकेच अमर्याद आहे.

कोठेही जा कोठेही असा ते सदैव तुमच्या डोक्यावर आहेच हे लक्षात ठेवा.

बाबा तुमची कफनी केवढी मोठी. ती इतकी मोठी का बरे? त्याचे कारण काय असावे.

याचा मी विचार करत असे. नुसते अंग झाकण्यासाठी ३/४ वार कापड पुरले असते. पण तुम्हाला ३२ हात लांबीचे कापड कफनीसाठी लागत असे. ते तुम्ही नंदूवाण्याकडून घेत असा त्याला ४ रु. देत होता.

तसेच बाळा शिंप्याला शिलाई चार रुपये देत असा.

बाबा यात काही तरी मतीतार्थ असावा. असे वाटून मी विचार करू लागले. तेव्हा मला असे वाटते.

मोठी कफनी शिवण्याचे कारण बाबा तुमची लेकरेच भरपूर त्यांचे थंडीवाऱ्यापासून रक्षण करायचे त्यासाठी त्या भक्तांना आपल्या जवळ घ्यायचे त्यांचे प्रेमाने संरक्षण करायचे अर्थात कफनीत सारे भक्त ठेवायचे व ते पडू नयेत म्हणून कफनी चारी बाजूंनी गोळा करून ते सुद्धा किती आस्ते आस्ते.

त्या प्रेमळ मायेनी ओथंबलेल्या सहवासाचा भक्तांना आनंद मिळावा. पण मधूनच संसारी लोक कसे त्रासलेत जे प्रभूपदाकडे वळले नाहीत त्यांचे कसे काय चालले आहे. याची थोडीशी तरी जाणीव व्हावी म्हणजे जे भक्त प्रभूपदी लीन झालेत त्यांना परत या संसारी सुखाची आस लागू नये. यासाठीच खांद्याजवळ कफनी फा

असे हे प्रत्येक फोटो वरून लक्षात येते.

त्यामुळे संसारी जीव बाबांच्या सहवासात जाऊन सुद्धा गुदमरत नसत कारण तसे पाहिले तर बाळा शिंप्याकडून शिवून आलेली कफनी बाबा तुम्ही परत शिवत असा व मग अंगात घालत असा

मग ही फाटलेली कफनी शिवता आली नसती का!

पण न शिवण्याची कारणे एकतर गरीबीला लाजू नका हे सांगणे असेल किंवा वरील प्रमाणे भक्तजनांना कफनीत बाहेरील मायावी जगाचा आवाज यावा असे असेल.

आता त्यांना ३२ हात कापडच लागे याचे कारण असे असावे की चमक नि नमक असे दोन भाग ग्रंथाचे त्यातील एकांत ३२ रुद्ररूपी पूजा आहे, कृष्णाच्या ३२ खोड्या कृष्णलीलेत आहेत खोड्या म्हणा लक्षणे म्हणा हे समजावे की मी कृष्ण अवतार आहे रुद्ररूपही आहे. समुद्र लहरी ३२ प्रकारच्या अर्थात माझ्या नामाचा खडा टाकलात तर मी ३२ जन्म तुमचा उद्धार करीन. तसेच तुमचे अन्न की ज्याच्यावर तुमचे संपूर्ण जीवन अवलंबून आहे. ते चावून पचविण्यासारखे करण्यासाठी देवाने ३२ दात दिले आहेत. त्याचा उपयोग तुम्ही चांगल्या कामासाठीच करावा असे हे साऱ्या भक्तांच्या लक्षात रहावे म्हणून हे ३२ हात कापड बाबा वापरत असावेत.

त्या कपड्याची किंमत चार रुपये शिलाई चार रुपये अर्थात त्याचे कारण सुद्धा असेच काही असावे संतांच्या प्रत्येक वागण्यात अर्थ असतो.

या चार अंकाची शिकवण अशी असू शकेल.

चार खाणी :- जारज, अंडज, स्वेदज, उद्भिज, चार वाचाः- परा, पश्यंति, मध्यमा, वैश्वरी चार पुरुषार्थ :- धर्म, अर्थ, काम, मोक्ष, चार महाकाव्ये :- प्रज्ञानब्रम्ह, अहं ब्रम्हास्मि, तत्त्वमसि, अयमात्माब्रम्ह. चार अनुबंध चतुष्टये :- अधिकारी, विषय, प्रयोजन, संबंध. चार वेदः ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद चार आश्रम :- ब्रम्हचारी, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, संन्यासाश्रम चार साधन चतुष्टये :- विवेक, वैराग्य, षट्संपत्ती मुमुक्षुत्व, चार अंतःकरण चतुष्टये :- मन, बुद्धी, चित्त, अहंकार, चार युगे : सत्त्य, द्वापार, त्रेता, कलियुग चारवर्ण :- ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र या प्रत्येक वाक्यातला अर्थ माणसाने लक्षांत घेऊन वागले पाहिजे. जसजशी कर्मे करशील तसतसे पुढील जन्मात सुख भोगशील अगर दुःख. तेव्हां या साऱ्या गोष्टी नीट लक्षांत ठेवाव्यात आपल्या भक्तांनी म्हणून हा चार रुपयांचा आकडा असावा. अज्ञान निर्वत्ती आणि ज्ञान प्राप्ती यासाठी व भक्तांना सत्त्य असत्त्याचें दर्शन घडावे, भक्तांचे अज्ञान दूर करून त्यांना सन्मार्गाला लावावे. मानव जन्माचे सार्थक करावे. आपण स्वतः वागून बाबांनी भक्ताला ज्ञान दिले. मी कोण हे जाणावे, संसारात राहून सारे नश्वर आहे हे ध्यानांत ठेवावे.

यासाठी बाबा अतोनात झटले. भक्तांनाही पटवून दिले अरे ही कफनी शेवटी आपल्याला लोक चढवतात कफनी ती सुद्धा या देहासहीत येथेच रहाते बरोबर म्हणजे आत्म्या बरोबर फक्त तुमचे बरेवाईट कर्म येते हे तुम्ही लक्षांत ठेवा नि प्रभुचरणाचा, प्रभूनामाचा आश्रय घ्या.

# प्रचिती

**श्री. गोविंद गोखले**
४०१ सोनल, एस.ई.एस. हॉयस्कूलजवळ
पांच पाखाडी ठाणे ४००६०२

श्री बाबांनी आमच्या कुटुंबास गेल्या २ वर्षापासून त्यांचेकडे आकृष्ट केले असून २ वेळां आम्हास शिर्डीला वारी घडवुन आणली आहे. तेव्हापासून काहीना काहीं कारणांमुळे श्री बाबांचे सतत स्मरण होत असते.

ता. २७ नोव्हेंबरची गोष्ट आहे. मी स्कूटरवरून जात असताना मला एका रिक्षाने ठोकर दिली व त्यामुळे स्कूटर व मी असे आम्ही दोघेही पडलो. उजवा हात व पाय ह्यावर खरचटल्याच्या जखमा होत्या. मनगटास एका मार बसला असावा किंवा फ्रॅक्चर झाले असावे मनगट दुखत होते. कशीबशी स्कूटर चालू करून मी माझ्या कामानिमित्त जुन्या घरी गेलो होतो. तेथून शेजाऱ्याकडून बर्फ मागुन घेऊन हात शेकला व घरी परत आलो. झोपण्यापूर्वी आयोडेक्स लावले व झोपलो. रात्री माझा हात अतिशय दुखू लागला व मनगट हलविता येत नव्हते. पोटात खड्डा पडल्यासारखे वाटले. मी फार घाबरून गेलो वाटले जर फ्रॅक्चर असेल तर कमीतकमी महिनाभर उजवा हात प्लॅस्टरमध्ये ठेवावा लागणार, व त्यामुळे माझी मोठी पंचाईत होणार. मी एका राष्ट्रीयकृत बँकेचा शाखाव्यवस्थापक असल्यामुळें ह्या महिन्यात रजेवर रहावे लागल्यास वर्षाच्या व्यवसाय प्रगतीचा इष्टांक गाठण्यासाठी धडपड करता येणार नव्हती. अशावेळी श्रीसाईमाऊली शिवाय कोणाची आठवण येणार. लगेच उठून बाबांचे फोटोसमोर प्रार्थना केली की हाताला फ्रॅक्चर होऊ नये व प्लॅस्टर शिवाय हात बरा व्हावा. त्यानंतर गरम पाण्यामध्ये हात शेकवला व पुन्हा मलम व उदी दोन्हीही हातास लावून झोपलो. दुसरे दिवशीही हात ठणकत होता पण ऑफिसचे महत्वाचे काम असल्यामुळें हेड ऑफिसला जाणे भाग होते. त्याप्रमाणे जाऊन आलो. सायंकाळी एक्स रे काढून घेतला. आणि काय आश्चर्य फोटोमध्ये व रिपोर्टमध्ये फ्रॅक्चर नव्हते. तेथल्या डॉक्टरनी नंतर मला स्टरेच बँडेज बांधण्यास सांगीतले व वेदना नाशक गोळ्या दिल्या. सांगायचे राहून गेले की ज्यावेळेस मी बाबांना माझ्या हाताबद्दल प्रार्थना केली होती. आज माझा हात ९९% बरा झालेला आहे व त्याच हाताने श्री साईमाऊलीने मला त्यांच्या 'श्रद्धा व सबुरी' व भक्तासाठी 'नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य' ह्या लेखाद्वारे कळविली आहे. श्री साईमाऊलीची कृपा अशीच आम्हावर व इतर अनेक भक्तावर सतत राहो अशी साईचरणीं प्रार्थना.

---

**श्रीसाईलीला**

**पुढील अंक श्रीरामनवमी विशेषांक म्हणून थाटात प्रसिद्ध होईल.**

---

## "जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव"

— कु. साधना नागेश चित्तर
कामाठीपुरा ७ वी गल्ली,
बिल्डिंग नं. २५, रुम नं ६,
मुंबई नं. ४०० ००८

श्रीसाईबाबा ही एक अगाध दिव्य शक्ती आहे, त्यांच्या कृपेचा ठेवा ज्याला ज्याला मिळतो तो खूपच भाग्यवान आहे. अशाच एका दिव्य प्रेरणेमुळे मी साईकृपेला पात्र झाले आहे, व माझ्या जीवनाचे सार्थक झाले आहे. त्यांच्या कृपेचा मला पदोपदी अनुभव येत आहे आणि मी साई वर्षावात न्हाहून निघत आहे. वास्तविक बाबांविषयी जास्त काहीही माझ्या वाचनात नव्हते. अचानक एक दिवस 'साईलीलेचा' अंक माझ्या वाचनात आला. त्यातील लेख वाचलेआणि 'श्रद्धा व सबूरी' या दोन चिरंतन सत्यावरच मी माझ्या आयुष्याची इमारत बांधत आहे. त्यांच्या कृपेचे मला अनेक अनुभव येत आहेत. बाबांची शांत प्रेमळ मूर्ती माझ्या मनाला नेहमीच विसावा देत आहे. नुकत्याच एका जबर व्याधी मुळे मी नुसत्या उदीच्या सेवनाने व्याधीमुक्त झाले आहे. काही वर्षा पूर्वी माझे अपेंडीसायटीसचे ऑपरेशन झाले परंतु नेहमी पोट दुखत असे व कितीही औषधे घेतली तरी म्हणावा तितका फरक पडत नसे. त्यामुळे मला नेहमी खूप काळजी वाटत असे. परंतु साईलीलेच्या वाचनामुळे आणि उदी सेवनामुळे व बाबांवरील कृपा! वास्तविक माझ्या आईलाही तिची प्रकृति अतिशय नाजुक असल्यामुळे खूपच काळजी वाटत असे, परंतु आता माझा बाबांवर भार असल्यामुळे उदी लावताच तिला खूप बरे वाटते आणि त्यामुळे मनाला दिलासा मिळतो. साईबाबा ही एक संजिवनी आहे आणि ह्या संजिवनीमुळे भूपृष्ठावरील मनुष्य व प्राणी सुखी राहू शकतो अशा या सद्गुरु श्री साईबाबांना आमचे कोटी कोटी प्रणाम.

❀❀❀❀❀❀

## "पत्रं पुष्पं फलं तोयं"

श्री. अनिल केशवराव रसाळ.
२१/३८२, बी. पी. टी. स्टाफ क्वॉर्टर्स,
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व) मुं. ३७

● श्रींची पूजा करताना अनेक भक्तांच्या मनात अनेक शंका येतात. प्रामुख्याने या शंका उपचारपूर्वक म्हणजेच विधी करून केलेल्या पूजेसंबंधी असतात.

भक्तांना असे वाटते कीं, बाबांना पंचोपचार, अष्टोपचार, षोडषोपचार पूजा यथासांग केली की ती त्यांना पावते. ज्या भक्तांजवळ भरपूर वेळ व सुस्थिती असते त्यांना ही

पूजा अशी करता येणं शक्य असते व ते या खुशींत असतात कीं, आपण वस्तू दिल्या कीं, बाबा खूष असतात. या उलट ज्या भक्तांना वेळे अभावी किंवा सुस्थिती अभावी अशी पूजा करणे अशक्य असते त्यांना खंत असते कीं, आपण श्रींना अतृप्त ठेवत आहोत व पर्यायाने आपली पूजा श्रीपर्यंत पोचत नाही.

खरं तर पूजा हा प्रकार चित्तशुद्धीसाठी असतो. त्यांत ब्राह्य उपचारापेक्षा अंतःकरनातील शुद्ध भावावरच तिची सफलता असते.

या संबंधीं भगवत्‌गीतेच्या ९ व्या अध्यायातील २६ वा श्लोक अतिशय समर्थक आहे.

''पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपद्धतमश्नामि प्रयतात्मनः'' ।।

ज्ञानेश्वरानी या श्लोकावर जे ओवीपूर्वक विवेचन केले आहे त्यात पूजेचें मर्म अगदी उघड करून सांगितलें आहे. ते म्हणतात,

''हे सांगावे काय किरीटी तुवांचि देखिलें आपुल्या दिठी। मी सुदामाचिया सोडी गांठी पव्हयांलागीत। ३९४।। पै भक्ति एकी मी जाणें। तेथ सान थोर न म्हणे आम्ही भावाचे पाहुणे। भलतेया ॥३९५॥ थेर पत्र पुष्प फळ'। हे भजावया मिस केवळ। वाचूनि आमुचा लाग निष्फळ। भक्ति तत्व ॥३९६॥म्हणोनी अर्जुना अवधारीं। तूं बुद्धि एकी सोपारी करीं। तरि सहजें आपुलिया मनोमंदिरीं। न विसंबे मातें ॥३९७॥

श्री साईसच्चरितात २६ व्या अध्यायात हेमाडपंतांनी भक्तीचें अंतरंग अतिशय रसाळपणे विशद केले आहे. ते म्हणतात,

''आनंदाश्रू उष्णजीवन। करू तेणें चरणक्षालन। शुद्धप्रेम चंदन चर्चन। करवूं परिसच्छप्रद
हे अंतरंग पूजाविधान। बाह्योपचार पूजेहून।
येणें तुज सुप्रसन्न। सुखसंपन्न करूं कीं।
सात्विक अष्टभाव-कमल। अष्टदल अतीव निर्मल।
मन करूनि एकाग्र अविकल। वाहूं, निजफल संपादूं।
लावूं भावार्थ- बुका भाळा। बांधूं दृढभक्तीची मेखळा।
वाहूं पदांगुष्ठी गळां। भोगूं सोहळा अलोलिक।
प्रीतिरत्नालंकार मंडण। करूं सर्वस्व निंबलोण।
करूं पंचप्राण चामरांदोलन। तापनिवारण तन्मय छत्रे।
समर्पू ऐसी स्वानंद पूजा। अष्टांग गंध अर्गजा।
ऐसे आम्ही आमुच्या काजा। साईराजापुजूं तुंज''।

व्दारकामाईत बसणाऱ्या आपल्या बाबांना सुद्धां श्रीकृष्णाप्रमाणे अंतःकरणातील शुद्ध भाव प्रिय आहे. जग चालवणाऱ्या व निर्माण करणाऱ्या बाबांना काय कमी आहे? जे आपल्याला मागेल ते देतात त्यांना आपण काय देऊं शकतो? म्हणूनच त्यांना शुद्ध भावाने व एकाग्रतेने अंतःकरण ओतून केलेली पूजा किंवा स्मरणच प्रिय आहे. त्यामुळें आपल्या माऊलीला जरी आपण पूजा करतांना कांही चुकलो तरी त्या पाठीमागे असलेला

जिव्हाळा दिसतो व म्हणूनच भोळ्या भावाने केलेली पूजाच अतिशय प्रिय आहे. बाबा स्वतः अध्याय १३ मध्ये म्हणतात,''

''पाप जयांचे विलया गेलें। ऐसे जे पुण्यात्मे वहिले।
तेचि माझे भजनीं लागले। खूण लाधले ते माझी।
''साई साई'' नित्य म्हणाल। सात समुद्र करीन न्याहाल।
या बोला विश्वास ठेवाल। पावाल कल्याण निश्चयें।
नलगे मज पूजासमारंभ। षोडश वा अष्टोपचार।
जेथें भाव अपरंपार। मजला भार तें ठायीं॥

*****

# सच्चिदानंद

सच्चिदानंद आत्म्याचे
द्वार उघडून द्या त्याचे
घडेल दर्शन स्वानंदाचे
रुप पाहिन त्यात तुमचे ।।१।।

घडता दर्शन स्वानंदाचे
भरते येईल प्रेमाचे
अभिमान, दुराग्रहाचे
तुटतील पाश हे दंभाचे ।।२।।

अद्वैत भाव उमटेल
अहंकारहि गळेल
भवभयचिंता पळेल
नामस्मरणच उरेल ।।३।।

तुमचे चरणी हेच मागणे
करु नका काही उणे
ऐहिकाचे नाही मागणे
सच्चितानंदाचे द्या देणे ।।४।।

**— सौ. प्रतिभा मंगेश तेंडूलकर**
१/६ यमुना सदन
विष्णूनगर, ठाणे

# पाय बरा झाला

**कु. सुगंधा ना. मरुडकर**
बी/३-१७ सिंदिया सोसायटी
सर एम.वी. रोड
अंधेरी (पूर्व) मुंबई-६९.

श्रीसाईनी आम्हास प्रत्येक संकटात सहाय्य केले आहे. व त्यामुळे आमच्या कुटुंबातील प्रत्येकजणास साईकृपेचा प्रत्यय आला आहे.

मी एक बँकेत नोकरी करणारी मुलगी आहे. एके दिवशी भाजी आणावयास जाताना माझा पाय अचानक मुरगळला. पाय बरा होण्यास मी खूप प्रयत्न केले. सर्वप्रकारचे लेप लावून झाले. तसेच डॉक्टरंनी दिलेले बँडेज पण लावून झाले पण पाय काही बरा होईना. माझा पाय बरा होत नाही हे पाहून माझ्या आईने श्री साईबाबांच्या चरणी नवस केला की पाय बरा व्हावा. आणि काय आश्चर्य! माझा पाय खरोखरच थोड्याच दिवसात बरा झाला. ही सर्व साईबाबांचीच कृपा.

म्हणून मी म्हणते की श्री साई समर्थ तारी त्याला कोण मारी.

# धावा

धाव रे दयाधना साईनाथा
पडला रे हा भक्त तुझा संकटा ॥धृ. ॥
असा कसा रे घात झाला
आयुष्याच्या वाटेवरि पाय हा घसरला
हितशत्रूंना हसण्याचा मोका लाभला
आयुष्यातूनि उठविण्याचा चंग त्यांनी बांधला
धाव रे दयाधना साईनाथा..... ॥धृ. ॥
अशा या बिकट अंधार समयी
आहे मज विश्वास अपार साईनाथा
दाविशी तू मज पामरा प्रकाश
म्हणूनी दयाधना करितो धावा मी प्रकाश
धाव रे दयाधना साईनाथा.... ॥धृ ॥

— **श्री. प्रकाश दळवी**
रत्नागिरी

# श्री साईंची उदारता

श्री. वि. म. हटवार
११९, रेशिमबाग, नागपूर

साईबाबा खरोखरच चमत्कार करीत होते. मानवांच्या व्यक्तीगत, कौटुंबिक व सामाजिक अडचणी दूर करीत होते. त्यांना भक्तिचा मार्ग दाखवित होते. साधुसंतांना पाहिजे असते श्रद्धा. ह्या श्रद्धेने त्यांच्या संपर्कात जो जो आला त्याला त्यांनी त्याची काळजी दूर करून सन्मार्गी लावले. लोकांच्या दृष्टीतून त्यांच्या सहजलीला चमत्काररुपाने दिसत असत. धूपखेड्यावरून शिर्डीस येत असता रानात चांदभाई आपला घोडा शोधत असताना दिसला. श्रीसाई झाडाखाली विश्रांतीसाठी बसलेले होते. त्यांनी चांदभाईस चिलीम पिऊन जा असे म्हटले तो काळजीत आहे हे समजताच त्यांचे भक्तप्रेम जागृत झाले व चांदभाईस घोडा पलीकडच्या कुंपणाच्या आड आहे असे सांगितले. घोडा दाखविला व चिमटा जमिनीवर आपटून विस्तव उत्पन्न करून चिलीम पेटविली. भक्ताची श्रद्धा बसली व तो चमत्कार समजला. वास्तविक ते त्यांचे नित्यकार्यच होते.

लग्नाचे वरातीबरोबर शिर्डीस आलेले साईनाथ गावाबाहेरील खंडोबाचे देवळात गेले. तेव्हा समोर प्रथम म्हाळसापती भेटले. ते देवभक्त असल्यामुळे त्यांनी 'आवो साई' असे म्हणून त्यांचे स्वागत केले. काशीराम शिंपी व अप्पा जागले या मित्रांनाही सांगितले व तिघांनी साईनाथजींची सेवा केली. काशीरामने त्यांना हिरवी कफनी व हिरवी टोपी शिवून दिली. महाराजांचे बसणे मशिदीत असे व निजणे मशिदीत व चावडीत असे. कोणी जेवावयास नेले तर जात होते. ते दवा पाणी लोकांना करीत व अंगारा देत असत. व त्यांपासून लोकांना गुण येई. साईबाबा आले व गावात खुशाली आली. सर्वांच्या उत्साहाने त्यावेळी श्रीरामनवमीच्या उत्सवाची सुरुवात झाली. श्री साईने उदारतेने महारोग्यासही सेवा करू दिली. ते वीतभर फळीवर निजलेले पाहून लोक त्यांचा नित्यक्रम बघण्यास उत्सुकतेने येत असत.

श्री खापर्डेच्या मुलाचा प्लेगपासून बचाव केला पण त्याच्या गाठी लोकांना श्री साईनाथांच्या शरीरावर उत्पन्न झालेल्या दिसल्या. भक्ततारक सद्गुरू अनेकाना दुःखमुक्त करून स्वतः भोग भोगतो. प्रत्येकाच्या वाट्यास प्रारब्धाचे भोग येतात. साई दुःखात तुमचा सहकारी बनतो. अवतारी सत्पुरुषांचा अवतार ईश्वरभक्तांना सहाय्य करून परमार्थाची दिक्षा देण्याचा असतो. त्यांचा भिक्षाक्रम नित्य चालत असे व त्यातूनच सर्वांची विचारपूस चालू ठेवून जनसंपर्काने दुष्ट प्रवृत्तीची चाहूल घेत असत. श्री साईचे अंतःकरण मानवी जीवाच्या कल्याणाकरिता तळमळत असे. कोणीही त्यांचा शिष्टसंमत शिष्य होऊ शकला नाही. श्री. बाबांच्या हयातीत तद्नंतर आजपर्यंत व पुढेही जे झाले, जे आहेत आणि जे होतील ते भक्तच राहतील.

साईनाथ वयाचे १६ वे वर्षी प्रगट झाले व वयाचे ३५ वे वर्षी अवतारकार्य संपले. शिर्डीच्या सर्व लोकांवर त्यांचे प्रेम होते. गावांवर कोणतेही संकट आले किंवा यावयाचे असेल त्याची सूचना त्यांच्या बोलण्यातून मिळत असे. जे भक्त त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागत ते सर्व संकटातून मुक्त होऊन नित्य दर्शनास येत असत. त्यांच्या प्रखर वृत्तीमुळे काही ठराविक मंडळीच मशिदीत जाणे येणे करीत असत, पण दर्शन सर्वांना होई. श्री साईबाबा समाधिस्त झाल्यानंतर शिर्डीला संस्थानचे रूप आले. केवळ बाबांच्या उदारतेने भक्त तसेच अनेक देश विदेशांतील बंधुभगिनी व माता शिरडीच्या समाधीदर्शनास सदैव उत्सुक असतात.

★★★★★

# साई प्रेमाचे मनोगत

प्रथमतः आयुष्यात
गीत एक रचतो
जणू भावबंधांचा पुष्पहार
साई चरणी अर्पितो ॥१ ॥

साईच्या महिमाच्या
नव्हता मज गंधही
परि अनुभवाने तयांच्या
झालो सज्ञान मी ॥२ ॥

भेद-भाव नसे जया
असे साई थोर हो
श्रद्धा अन् सबुरीचे
मिळे निश्चित फळ हो ॥३ ॥

नाम घेता साईचे
आनंद गगनात न मावे
दर्शन घेता मूर्तिचे
स्वर्ग दोन बोटे भासे ॥४ ॥

बाबांच्या पदकमळांशी
सदा मम मस्तक राहो
अंतसमयींच्या श्वासातही
साई-साई नाम राहो ॥५ ॥

— **श्री. प्रदीप शं. पिरणकर**
विर्नोडा पेडणे-गोवा ४०३५१४

# श्रीबाबांच्या उदीचा महिमा

**सौ. मीरा सुमन्त ढोके**
खीरा नगर बी३/११ ए.
एस. व्ही. रोड, सांताक्रुझ, मुंबई ५४.

जून १९८४ ची गोष्ट. माझा मुलगा खूप आजारी झाला. आजारपण म्हणजे हगवण. हगवणीने इतका हैराण झाला की, हातपाय कडकड कापायचे. हातात बारीक चमचा सुद्धा धरता यायचा नाही. त्याची ती अवस्था पाहून रडूं कोसळायचं. हातपाय बारीक झालेले. डोळे बाहेर आलेले.

औषध चालू होतं पण गुण नव्हता. आमचं श्रीबाबांच्याकडे रोज सांगणं असायचं की, बाबा मुलाला लौकर बरा करा. म्हणून मी त्याला औषधा बरोबर पाण्यातून उदी द्यायला सुरुवात केली. हगवण थांबली. तब्येत कणाकणाने सुधारायला लागली.

नंतर कांही दिवसांनी मला त्याचा गळा मोठा दिसला. मी त्याला तसं बोलून दाखवलं पण त्याने दुर्लक्ष केलं. ह्यांना म्हटलं तर ते म्हणाले, अग तो बारीक झाला आहे ना म्हणून तसं वाटतं. तुला उगाच नाही तो संशय. पण मला चैन पडेना. श्री बाबांना म्हटलं बाबा माझं कोणीच ऐकत नाहीं तेव्हां तुम्हींच काय तें बघा. त्याचा गळा बरा होऊ दे.

असे दोन महिने गेले. तब्येत सुधारत होती. एक दिवस दुपारी मी सहज पडले होते (तो दिवस गुरूवार होता.) तेव्हां मला एकदम आठवलं की, 'थायरॉईड' झालेल्या लोकांचे हातपाय बारीक होतात. डोळे बाहेर येतात. गळा मोठा होतो केस- गळतात वगैरे असं मी ऐकलं होतं, आणि माझ्या मुलाची तर तीच लक्षणं होती. लगेच मी त्याला बोलून दाखवलं. फॅमिली डॉक्टर गळ्याच ऐकून घ्यायला तयारच नव्हते म्हणून मी त्याला कॉलनीतल्या डॉक्टरकडे पाठवलं. त्यांनी त्याला रक्त तपासून आणण्यासाठी चिठ्ठी दिली. रिपोर्ट १०-१२ दिवसांनी मिळणार होता. मी बाबांना सारखं सांगत होते, बाबा तुमच्या शिवाय आमचं कोणी नाही. तुम्हीच सांभाळा. आम्हाला तर कांही कळत नाही.

त्यातच मला एका रात्री स्वप्नात आमच्या फॅमिली डॉक्टरची असिस्टंट लेडी डॉक्टर (सवाष्ण) दिसल्या. त्या हयात नाहीत त्या म्हणाल्या, त्याला टाटा मध्ये दाखव चांगलं औषध मिळेल व लौकर बरा होईल. मी एकदम दचकून जागी झाले. स्वप्न कुणालाच सांगितलं नाही. सारखं बाबांच नांव घेत राह्यचे.. शेवटी सांभाळणारी ती साई माऊली.

दहा दिवसांनी रिपोर्ट मिळाला. डॉक्टरला रिपोर्ट दाखवून मुलगा घरी आला व म्हणाला. डॉक्टर म्हणताहेत थायरॉईड आहे. मी तुला चिठ्ठी देतो तूं टाटामधे जा. ते ऐकल्या बरोबर मी गार पडले. (मी पोथी वाचत होते. मला वाटतं तो दिवस पण गुरुवारच असावा.) मग मुलगा म्हणाला, अग घाबरु नकोस. तिकडे बी. ए. आर. सी चा एक विभाग आहे. तिकडे डॉ. नायर म्हणून थायरॉईड स्पेशलिस्ट आहेत. ते तपासून व्यवस्थित औषध देतील. मला स्वप्न आठवलं. बाबांना म्हटलं सांभाळा.

माझ्या मनात गुरुवारी डॉक्टरकडे जावं असं आलं. पण बोलले नाही. हे मुलाला घेऊन हॉस्पिटलमध्ये गेले इकडे मी बाबांना सारखं विनवीत होते. बाबा, तुम्ही त्याचे डॉक्टर व्हा. तुम्ही त्याच्या बरोबर रहा. माझा आपला सारखा जप चालू होता. हे लोक येईपर्यंत चैन नव्हती. दुपारी दोघे घरी आले व म्हणाले डॉक्टर नायर गुरुवारी येतात. दोघे गुरुवारी गेले. डॉक्टरना भेटले. त्यांनी सर्व तपासणी केली. परत रक्त तपासलं. व औषध लिहून दिलं. फक्त गोळ्या होत्या. एका महिन्यानी बोलावलं तब्येत बरीच सुधारली होती व वजन पण वाढलं होतं. डॉक्टरने १ गोळी कमी करायला सांगितली. गळा तसाच वाटायचा दुसऱ्या महिन्यात त्याने डॉक्टरनां गळ्याबद्दल सांगितले तर ते म्हणाले, तुला तसं वाटत असेल तर आपण ऑपरेशन करू. मी मुलाला म्हटले. आपण बाबांची उदी गळ्याला लावूया बरं वाटेल. मी बाबांना म्हटलं बाबा, मी साईलीलेमध्ये उदी महिमेचे खूप लेख वाचलेत. मला पण स्वतःला खूप अनुभव आहे आणि बाबांची प्रासादिक आरती "आरती साईबाबा" व श्री सत्यसाईबाबांच्या प्रार्थनेचं एक कडवं म्हणत उदी लावायला सुरुवात केली. पाण्यातून उदी देणं पण चालूच होतं. दर महिन्याला खूप गुण यायचा. डॉक्टर पण खुष झाले.

मधे औषध कंपनीचा संप सुरु झाला. मुलाने डॉक्टरना म्हटलं, डॉक्टर, औषध नाही मिळालं तर काय करणार? डॉक्टर म्हणाले, अरे, घाबरतोस कशाला? तूं ६ महिन्यात बरा होशील बघ. ह्यांनी इकडून तिकडून औषधाच्या बाटल्या मिळवल्या.

डिसेंबर मध्ये तो शिरडीला पण जाऊन आला. प्रकृती खूपच सुधारली होती. दर महिन्याला औषधांचं प्रमाण कमी करीत ऑगस्ट १९८५ मध्ये पूर्ण बंद केलं, व डॉक्टर म्हणाले आतां तू पूर्ण बरा झालास. एक महिना औषध बंद करू या व बघूया काय फरक पडतो ते. परत एकदा रक्त तपासू.

त्याप्रमाणे एक महिन्या नंतर रक्त तपासलं. रिपोर्टला परत १५ दिवस लागणार होते. परत टेन्शन. बाबांच्यावर पूर्ण विश्वास होता. त्यांच्या प्रेरणेने तर आजार समजला. डॉक्टरने एकदा मुलाला विचारलं होतं म्हणे कि हे तुझ्याकडे कुणाला कळलं. मुलाने सांगितले की आईच्या लक्षात प्रथम आलं. आमच्या पाठीशी बाबा होते म्हणून कळलं.

रिपोर्ट मिळायला १ महिना लागला कारण दोन्ही गुरूवारी डॉक्टर भेटू शकले नाहीत. तिसऱ्या गुरुवारी रिपोर्ट मिळाला. मुलगा घरी येईपर्यंत सारखा बाबांचा धावा चालू होता. दुपारी आल्याबरोबर म्हणाला, आई, आता औषध एकदम बंद. रिपोर्ट एकदम क्लिअर आहे. मला अगदी भरून आलं. मी बाबांना दंडवत घातला व म्हटलं बाबा असाच त्यांचा सांभाळ करा.

बाबा हाकेला धावून आले होते. आमच्यावर बाबांनी केवढे अनंत उपकार केले होते. बाबा असेच आम्हां सर्वांच्या पाठीशी उभे राहोत. बाबांच्या चरणी आमचे कोटी कोटी प्रणाम.

# सहजीवन व सहजजीवन

## श्रीसाईनाथांचे एक अलौकीक वैशिष्ठ्य

**श्री शाम जुवळे**
जनार्दन भुवन
९, छबिलदास रोड
दादर (प.) मुंबई- ४०० ०२८.

"सर्वांसाठी झिजणारा संत-श्रीसाईबाबा" हा ऑक्टोबर ८४ चा संपादकीय लेख वाचून वरील आशयाचा लेख लिहिण्याची श्रीसाईकृपेकरून प्रेरणा झाली. ईश-कृपा असल्याविना अशी प्रेरणा होत नाही. श्रीज्ञानेश्वर महाराज याविषयी म्हणतात, "शब्द पाठी। अवतरले कृपा आधी॥"

भक्ताच्या मनात देवाशिवाय दुसरा विचार येत नाही. साई-भक्ताच्या मनाला साईविना अन्य विषय शिवत नाही. जसा विचार तसा माणूस घडत असतो. विचाराला मानवी जीवनात अनन्यसाधारण असे महत्व आहे म्हणून विचार हे मानवी बुद्धीचे द्योतक मानले जातात. समभावाचे विचार मनात घोळत असले म्हणजे माणसाची वृत्ती समाधानी बनते. या बाबतीत श्रीसाईबाबांचे खालील अमृतबोल फारच मननीय आहेत.

"आत्म्याचे सम्यग्विज्ञान। सम्यग्विज्ञानाकारण ध्यान।
ते ध्यानचि आत्मानुष्ठान। तेणेच समाधान वृत्तीचें॥" (श्रीसाईसच्चरित, अ. १९ ओ. १०६)

श्री साईबाबांनी आपले उभे आयुष्य वेचून जर कसली जन-कल्याणाची महत्वाची शिकवण दिली असेल तर ती सहजीवन व सहजजीवन यांची सुंदर गुंफण विणण्याची होय, असे मला प्रांजळपणे वाटते. श्रीक्षेत्र शिर्डी येथे आजही आपणास या दोहोंचा मनोहर संगम पहावयास मिळतो. सर्व धर्मांचे, सर्व जातीचे, सर्व राष्ट्रांचे नानाविध क्षेत्रातील भाविक जन या संगमावर रोज स्नान करून पुनित होत आहेत. असे रम्य दृश्य इतर ठिकाणी क्वचितच दृष्टीस पडते. श्रीसाईबाबांच्या अलौकिक दैवी सामर्थ्याचे हे एक महत्वपूर्ण द्योतक आहे.

बाबांच्या सच्चरिताचे बारकाईने अवलोकन केले असता आपणास असे आढळून येते की बाबा समस्त लोकांमध्ये सतत अभेदाने वागत असत. स्वतः अहंकारविरहित राहून इतरांनाही तसे रहाण्याची महान शिकवण ते कटाक्षाने देत असत. जसे मानवावर त्यांचे अकृत्रिम प्रेम होते तसेच सर्व प्राणीमात्रावर ते निःस्वार्थपणे प्रेम करीत असत. त्यांच्या सम-दृष्टीला भेद असा कधी शिवलाच नाही. समदृष्टी ही शुभ-दृष्टी असते याचे प्रात्यक्षिक सर्व जगाला त्यांनी स्वकृतीने दाखवून दिले. सुशिक्षित/अशिक्षित, श्रीमंत/गरीब, विद्वान/अविद्वान, रोगी/निरोगी, स्वकीय/परकीय वगैरे इतरत्र हमखास दृष्टीस पडणारे भेद बाबांच्या ठायी तिळमात्रही वसत नव्हते. सर्वांना सारख्याच कळकळीने ते हितोपदेश करीत. सर्वांचे कल्याण इच्छिताना त्यांनी अकल्याण चुकूनही कोणाचे केले नाही. हे त्यांचे अभूतपूर्व असे कार्य होते. साई-दरबार सर्वांसाठी खुला केल्याने आडकाठी अशी

कसलीच नव्हती. मनामध्ये अभेद वसत असल्यामुळे त्यांना बाह्यसृष्टीत भेद प्रतीत होण्याचे कारणच उरले नाही. अनेकामध्ये एकत्व पहाण्याची त्यांची ही कला खरोखरीच अलौकिक अशीच होती. सहजीवन बाबांच्या रोमरोमी भिनले होते. बाबा म्हणजे सहजीवनाचा उच्चांक असेच म्हणावे लागते.

जीवन-गंगा सहजपणे कशी वहात ठेवावी याचे प्रात्यक्षिक बाबांनी शिर्डीमध्ये करून दाखविले. जगामध्ये वैयक्तीकरीत्या काही मिळवावयाचे नव्हते तरीसुद्धा बाबा व्यावहारीक दृष्ट्या फार दक्ष रहात असत. हेतू हा की सर्वांनी व्यवहार करताना जपून वागावे. थोरांचे अनुकरण इतर जन करीत असतात म्हणून बाबा ही दक्षता घेत असत. अवतारी पुरुष वारंवार अशा हेतूने प्रेरित होऊन पृथ्वीतलावर जन्म घेत असतात. बाह्य वेषावरून त्यांच्याविषयी काही अनुमान काढणे सामान्य जनांच्या दृष्टीने अयोग्य ठरते. अंतरिची खूण जाणणारे विरळाच असतात. त्यांचे प्रत्येक कर्म जनहीत लक्षात ठेवून ते सहजतेने करीत असतात. प्रत्येक कर्मानि किती लोकांचे कल्याण होत असते याचे -इतराना न उकलणारे गणित त्यांचे त्यांनाच ठाऊक असते. निष्काम कर्म करीत राहिल्याने कर्माची बाधा त्यांना कधीच होत नसते. त्यांच्या हिशेबी उपदेश मुखानी केला काय किंवा अनेक पुस्तके छापून केला काय सर्व एकच असते. दुजेपणालाच जेथे थारा असत नाही त्याला परा म्हणून जगामध्ये कोणी असणे संभवत नाही. बाबा सहजतेने जीवन जगत असल्यामुळे निर्भयता त्यांच्या अंगी पूर्णपणे वसत होती. कोणत्याही तऱ्हेची अभिलाषा वा महत्वाकांक्षा बाबांच्या ठायी कधीच दिसून आली नाही. रागवावयाचे झाले तरी ते स्वतःच स्वतःवर रागवावे अशा प्रकारचे होत होते. रागाद्वारे सुद्धा त्यांना जनहीतच साधावयाचे होते. मनाने ते विश्वाशी निगडीत राहिल्याने सर्वांचे मनोव्यापार ते जाणत होते. विश्वामध्ये अज्ञात असे त्यांना काहीच नव्हते. इतक्या सहजतेने विश्वाशी पूर्णतया समरस होऊन जीवन जगणे फक्त साईबाबांसारख्या विभूतीनाच शक्य होत असते. त्यांच्या जीवनाला दुःखाची छटा कधी लागलीच नाही. किंबहुना दुःखाचा वियोग म्हणजेच "योग" ही भगवद्गीतेची उक्ती बाबांनी आपल्या प्रत्यक्ष आचरणानी सिद्ध करून दाखविली. (भ.गीता अ ६ श्लो. २३) भगवान श्रीरामचंद्राप्रमाणे बाबांचे जीवन निष्कलंक असेच होते. कलीयुगामध्ये यापेक्षा अधिक असा आदर्श कोणता असू शकेल असे भक्त-मनाला तरी खासच वाटत नाही. कलीयुगामध्ये सर्व तऱ्हेचे कलह सर्व ठिकाणी थैमान घालीत असता इतक्या कुशलतेच्या सहजतेने सहजीवन कसे जगता येते याचे जणू प्रात्यक्षिक बाबांनी साठ वर्षाहून अधिक काळ शिर्डीमध्ये वास करून अखिल जगाला दाखवून दिले. एवढे करूनही "निस्पृहस्य तृणं जगत्" ही प्रसिद्ध उक्तीसुद्धा बाबांनी सत्य करून दाखविली.

प्रत्येक व्यक्तीला सहजीवन व सहजजीवन यांचा सुंदर व मनोहारी मिलाफ आपल्या वैयक्तीक जीवनात घालता आला तर ते जीवन कृतार्थ झाल्याविना रहाणार नाही हे निश्चित!



# ''परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे!''

**सौ. सुलोचना मधुकर जोशी**
खरे टाऊन नागपूर

● माणूस आशेवर जगत असतो. जीवनात लहान मोठ्या प्रसंगांना सामोरे जावे लागते. संकटांमध्ये पुष्कळदा मन विचलित होते. किंकर्तव्यमूढ होते. सगळीकडे काळोख जाणवू लागतो. मन सैरभैर होऊन भेलकांडू लागते. अशावेळी परमेश्वर हाच आधार असतो. त्याची आठवण येतेच! मग तो त्याला कुठल्याही रुपात आठवो. मूर्ती, छबी किंवा आणखी कसेही! त्याच्या स्मरण, चिंतनाने आधार सापडतो. दिलासा मिळतो. व त्या रूपाची तो भक्ती करू लागतो. दुःख, संकट विसरण्याचा प्रयत्न करतो. त्यात हळू हळू त्याला बळ व समाधान मिळते.

अशाच एका अवस्थेतून जाताना मला साईबाबा विषयी आसक्ती वाटू लागली— भक्ती फूलली. आता तर संसारात त्याच्याशिवाय पानच हालत नाही! सगळीकडे बाबा दिसावेसे वाटतात. मन वेडे आहे ते हट्ट करते की, ''बाबा तुम्ही सर्वांसाठी सर्व करता मग आमच्याचसाठी का नाही?'' लगेच दुसरं मन म्हणतं, ''जे घडतं ते बाबाच घडवतात— आपण कर्तेपण घ्या कशाला? सुख दुःख म्हणतो ते सगळ बाबांमुळेच! मान लौकिक सगळं बाबांचीच इच्छा! अपमान अवहेलना हे सुद्धा बाबांच्याचमुळे! मग मनी विषाद कशाला?'' पण मन तितकं पक्कं झालेलं नाही! बनेल! बनता बनता बनेल! बाबाच नानांना म्हणाले होते, ''नाना! बनता बनता बनेल!!

मनाला इतका धीर नसतो! सबूरी नसते! श्रद्धेला जोड सबूरीपण हवी! झटकन् प्रत्यंतर हवे असते. देवाने लगेच धावावे असे वाटते. कसोटी इथच असते. त्याने तरी अनन्यशरणता पाहिल्याशिवाय कसे धावून यावे? अनन्यशरण गेले की, ''बेडा पार झालाच म्हणून समजा!'' बाब लहानशी असो मोठी असो भार देवावर टाका (श्रद्धा!), तो सुचवील तसे नेक प्रयत्न करा (सबूरी!!) बेडा पार! माझा तरी हा अनुभव आहे. आम्ही मुलांना पण हेच सांगतो. ''अगदी सकाळी उठण्यापासून झोपेपर्यंत, खाण्यापासून अभ्यासापर्यंत खेळण्यातसुद्धा प्रत्येक बाबतीत बाबांची आठवण करा, त्यांचे स्मरण करा व पाऊल पुढे टाका. ते सदैव क्षणोक्षणी तुमच्या पाठीशी असतात.'' आहे पासीच उभा ठाकला। प्रेमाचा मी सदा भुकेला। हाक हाकेला देतसे'' ''जया माझे नामाची घोकणी तयाचा मी ऋणी सर्वकाळ''. पुष्कळदा आपल्या हातून अशक्य वाटणाऱ्या गोष्टी सुद्धा होतात त्यात परमेश्वरी प्रेरणा व बळच असतं. परमेश्वराचे अधिष्ठान असले तरच प्रयत्नांना चांगली फळे येतात. परमेश्वराचे अधिष्ठान सदैव ठेवले तर माणूस चांगलेच कार्य करू धजतो. कुकर्माकडे तो जातच नाही. सत्कर्माला परमेश्वरी अधिष्ठानाचे बळ मिळाले की फळ रसाळ व गोमटंच हाती येणार! ●

# श्री साई भक्तीची-साधना

**श्री वसंत वामन प्रधान**
श्री गणाधीराज को ऑ. हाऊसिंग सोसायटी लि.
बि. नं. २ ब्लॉक नं. १२ मिठागर रोड,
मुलुंड (पूर्व) मुंबई ४०० ०८१

मी पूर्वी १९४६ मध्ये प्रसिद्ध संतश्री नित्यानंद महाराज यांचे दर्शनास वज्रेश्वरी येथे गेलो असता ते मला फक्त एवढेच बोलले 'जावो न्हाओ धूवो और खावो' त्यावेळेस मला त्या शब्दांचा अर्थ कळला नाही. केवळ आंघोळ व जेवण एवढाच मर्यादित अर्थ मी जाणला परंतु आज विचारांच्या प्रगल्भतेमुळे त्यातील गर्भितार्थ समजला. स्नानाने मलीनता आंतील दुर्विचार, दुर्वासना धुवून काढून पोटभर खाणे म्हणजे परमेश्वर चिंतनाने नाम स्मरणाने हा देह भरणे हे समजण्यास दीर्घ कालवधी लागला. श्री साईबाबांचे बोलणे पण असेच असे ते चटकन आकलन होत नसे उदाहरणार्थ साईचरित्र. घोड्याने नवाचे लेंडार घातले व ते सौदागराने बांधून घेतले. हे नवविधा भक्तीचे देणे भक्ताला समजावून घ्यावे लागले. तात्पर्य अगदी सोपे वाटणारे प्रमेय किती अवघड असते हे विषय प्रवेशानंतर कळू लागते. एका संताचे वचन मला स्मरते 'भक्ती ही सुळावरची पोळी आहे' तरी सुद्धा साईभक्ताना निराश होण्याचे कारण नाही. शामा उर्फ माधवराव देशपांडे यानी म्हटले आहे, 'श्री साईबाबांसारखे असता लेणे, आपण मूख कां करावे केविलवाणे' श्री साई सत्‌चरित्रांतर्गत भक्तीमार्ग व ज्ञानमार्ग याचे उत्तम विवेचन वाचावे. परमेश्वर प्राप्तीचे दोन मार्ग आहेत भक्ती मार्ग व ज्ञानमार्ग परमेश्वर प्राप्ती म्हणजे काय हे प्रथम स्पष्ट व्हावयास पाहिजे. प्राप्ती म्हणजे एखादी वस्तू अन्यत्र असणे व ती मिळवणे. अर्थात त्याकरिता भक्तीमार्गाचा अवलंब सांगितला आहे. श्रीसंत तुकाराम म्हणतात 'देव पाहण्यासी गेलो देव होवूनच ठेलो' म्हणजे देव पाहण्याच्या प्रयत्नात ते स्वतःच देव झाले याचा अर्थच असा देव ही कुठे तरी अन्यत्र असणारी बाब नव्हे. तर तो स्वतःचे ठिकाणी व सर्व प्राणी मात्राचे ठिकाणी असणारी अदृष्य शक्ती आहे व त्याची अनुभूती येणे किंवा मिळविणे हे होय. भक्तीचे गोडफळ चाखताना आपल्याला किती आनंद होतो हे श्रीसाईलीलामध्ये भक्तांचे अनुभव वाचताना आपल्याला कळते. श्री साईबाबांच्या भक्तीची गोडी एकदा लागली की मन मागे फिरत नाही. कालांतराने बाब हेच जीवनाचे सर्वस्व होते व तो निष्काम भक्ती करू लागतो. भक्तीमार्गाची अंतीम अवस्था म्हणजे ज्ञान जे संतश्रेष्ठ नामदेव महाराजाना त्यांचे गुरु श्री विसोबा खेचर यांचेकडून झाले. पांडुरंगाजवळ संभाषण करणारे श्री संत नामदेव स्वतःचे ठिकाणी चराचरांत परमेश्वराचे अस्तित्व अनुभवू शकले नव्हते कारण त्यांची सगुणभक्ती पांडुरंगाचे विवक्षीत रूप व आकार या ठिकाणी केंद्रीत होती. परंतु ती एकनिष्ठ असल्यामुळे पांडुरंगानेच त्याना गुरुमुखातून ज्ञान देवविले. भक्ती एकनिष्ठ पण जेव्हा पराकोटीला जाते तेव्हा परमेश्वर भक्ताचे ठिकाणी असणारे ज्ञान जागृत करतो. श्री साईबाबांनी आपल्या

परम भक्ताना हे ज्ञानामृत दिले. 'मेघाच्या शय्येजवळ त्याच्या जागृतावस्थेत श्री साईबाबा उभे राहून त्याला त्रिशूळ काढावयास सांगून त्याच्या शय्येवर तांदूळ टाकले या घटनेने मेघाने म्हटले मी तुम्हाला (श्री बाबांना) पाहिले पण दरवाजे बंद होते म्हणून तुमचे वास्तव दर्शन स्वप्नवत वाटले त्यावर श्री साईबाबा म्हणाले :- माझिया प्रवेशा नलगे द्वार।। नामज आकार नाविस्तार।। वसे मी निरंतर सर्वत्र॥ म्हणजे अणुरेणूत माझे अस्तित्व आहे. दुसरे उदाहरण वांद्रयाचे श्री बाबासाहेब तर्खड यांचे. त्यांची पत्नी व मुलगा शिरडी येथे गेले असता मुलाच्या सांगण्याप्रमाणे — वडील श्री बाबसाहेब तर्खड घरी पूजा व नैवेद्य करीत असत एक दिवस नैवेद्याला खंड पडला व ते विसरले तेव्हा श्री साईबाबा शिरडीत त्यांच्या मुलाला व आईला म्हणाले नित्याप्रमाणे आज वांद्र्याला मला कांही खावयास मिळाले नाही, मला उपाशी रहावे लागले.

याचा अर्थ मी जसा शिरडीत आहे तसाच वांद्रयाला पण आहे म्हणजेच सर्वत्र आहे. श्री साई सत चरित्रामध्ये असे अनेक प्रसंग त्यांच्या सर्वांतर्यामीत्वाची साक्ष पटविणारे आहेत. पंधरावा अध्याय पालीचे मनोगत, पालीच्या बहिणीचे औरंगाबादेहून आगमन त्यांचे मीलन या सार्‍या घटना म्हणजे श्री बाबांची सर्व विश्वातील जीवमात्रासी एकात्मता दर्शविते. श्री ज्ञानेश्वर माऊलींने रेड्यामुखी वेद वदविले तसेच श्रीदासगणूंना पार्ल्यास श्रीसाईबाबा काकांच्या घरच्या मोलकरणीच्या मुखाने श्रूतींचा अर्थ उपनिषदाचा भावार्थ समजावून दिला जातो. तेव्हां श्री दासगणूना साडेतीन हाताच्या देहांत असणारे बाबा देहातीत सर्वव्यापी आहेत हे पटले. संबंध साईचरित्र असेच अगम्य अतर्क्य आहे म्हणून सार्‍या ग्रंथांचे सार सर्व अध्यात्मिक तत्व ज्ञान एकाच श्री साई सत् चरित्रात एकवटले आहे.. श्री साईचा मागोवा प्रेमाने घेता येईल. मोठमोठे अवघड अध्यात्मिक ग्रंथ वाचणे ते समजणे व त्यानुसार देवाचा शोध घेणे याला आपले आयुष्य अपुरे पडेल; याचा अर्थ ग्रंथ अभ्यासू नये असा नव्हे. उपलब्ध वेळ व व्यावसायिक बंधने यातून सुवर्ण मध्य साधावयाचा असेल तर 'कितीही पापे असोत माथा, व पुरे एक हा साईचा गाथा'. हे लक्षात ठेवावे. आपले सर्व धार्मिक ग्रंथ वेद गीता उपनिषद, रामायण, महाभारत, योगावरील ग्रंथ इ. हिंदू धर्माचे, राष्ट्राचे भूषण आहे. इतकेच नव्हे तर ते सार्‍या जगाचे मार्गदर्शक आहेत. स्वामी विवेकानंदांचे जीवन त्यांचे कार्य व त्यांनी प्रसिद्ध केलेले ग्रंथ अजोड आहेत. प्रत्येक भारतीयाने ते अवश्य वाचावे. एका सर्वसंगपरित्याग केलेल्या संन्याशाचे भारताच्या उत्कर्षाचे प्रयत्न व अमेरिकेतील शिकागो येथे सर्वधर्म परिषदेत हिंदू धर्माची पटविलेली महती जगन्मान्य आहे. आपल्या भारतातील प्राचीन व अर्वाचीन संतचरित्रे वाचल्याने मनाचे शुद्धीकरण होवून भक्तीची दिशा व महती कळते. आपली संस्कृती जीवनातील त्याग याने भारतीय जीवन कसे समृद्ध केले आहे ते कळते. आपले सर्वस्व अर्पण करणारे त्यागी फक्त इथेच आढळतात. प्रस्तूत लेखात थोडे विषयांतर झाले ते ग्रंथासंबंधी गैर समज होवू नये म्हणून. असे सुद्धा थोडे लोक असतील कि ज्याना व्यवसायामुळे इतर वाचनास वेळ नसेल त्यांचा विचार गृहीत धरून वरील विधान केले, व फक्त साई सत्चरित्र वाचल्याने त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण होतील.

श्री साई सत् चरित्राची पारायणे व मनन केल्याने 'श्री साईबाबा रमावर' आपल्या भक्तांना साक्षात्कार घडविल्याशिवाय रहाणार नाही फक्त 'श्रद्धा व सबूरी सोडू नये. सबूरी वरी यशाचा वाडा, विपत्ती पळवी बारा वाटा,'' श्री साईबाबांचे ज्ञानीभक्त अनेक होते त्यांत श्री संत उपासनी महाराज सर्वप्रथम अग्रणी होते. कै. दादासाहेब खापर्डे, कै. दिक्षीत, कै. जोग, कै. बापूसाहेब बुटी, कै. चांदोरकर, कै. देवमामलेदार, कै. साठे व इतर अनेक सदभक्त मला अज्ञात. भक्तीमार्गी श्रींच्या सहवासात, कै. श्रीसंतदास गणूमहाराज, श्री म्हाळसापती, श्री शामा उर्फ माधवराव देशपांडे, श्रीमती बायजाबाई, श्रीमती लक्ष्मीबाई श्रीमती राधा कृष्णबाई. कै. पैगंबरवासी श्री संत अब्दुल्ला (बाबांचे सेवेकरी व शिरडी संस्थानचे अंकित) श्री सगुण मेरू नाईक अशी किती तरी मानवी पुण्यशील रत्ने जरी कालवश असली तरी भक्तीमार्गात चिरंजीव आहेत त्यांच्या स्मरणाने आपली मने भारावतात, व गत कालात जावून श्रींच्या चरणाजवळ स्थिरावतात. देव किंवा संत स्वतः चमत्कार करीत नाहीत तर ते भक्तांचे मुळे त्यांच्याकडून घडतात. शिरडीमध्ये श्री बाबांचे चरणाजवळ व स्मरणाने इतरत्रसुद्धा आजही चमत्कृतीजन्य मार्गदर्शनपर भक्तीमार्गात प्रगती व्हावी म्हणून प्रसंग घडून येतात व त्यांतील काही आपण साईलीला मासिकात वाचतो. श्री ज्ञानेश्वरमाऊली जन्मतः ज्ञानी सिद्ध होते.

(भगवान कृष्णाचा अवतार) त्यांनी केलेले चमत्कार हेतूपूर्वक नव्हते. रेड्याच्या मुखाने वेद वदविणे, भिंत निर्जीव चालविणे, स्वतःच्या पाठीवर योग सामर्थ्यांने मांडे भाजणे. या प्रसंगोपात घडलेल्या घटना. एक लहान चिमुरडी मुक्ताबाई त्यांची भगिनी श्री ज्ञानेशाना 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' जगाचा उद्धार करा हा तत्वज्ञानपर अभंग म्हणते हाच चमत्कार नव्हे काय? चमत्काराचे मोजमाप काही ठराविक नाही. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' म्हणणारे श्री संत तुकाराम व प्रत्यक्षात वनचऱ्याशी श्वान सुकरे इ. जीव मात्रासी एक रूप होवून खेडवळ ग्रामीण जनतेत जीवन व्यतित करणारे श्री साईबाबा। म्हणजेच महान चमत्कार. त्यांचे अनेक भक्त साधकावस्थेतून सिद्ध झाले. त्यांत श्री संत उपासनी महाराज व श्रीसंत दास गणू महाराज माझ्या प्रत्यक्ष परिचयातले. श्री संत दासगणू महाराजाना सिद्धी अनुकूल असून सुद्धा कधी त्यांचा उपयोग केला नाही व स्वतःचा मोठेपणा कधीच भासविला नाही. ते अखंड नाम स्मरणात असत फार थोडे जरूरी पुरतेच बोलत. माझ्या परमभाग्याने त्यांनी माझ्यावर अनुग्रह केला. श्री साईबाबांच्या गळ्यात ही सदभक्तांची रत्नमालिका रूळत आहे. श्रींच्याच चरणावर अनेक लहान मोठी रत्ने विखुरली आहेत. दगडाच्या घडवलेल्या मूर्तीत भक्त देवपण आणतात, तर हा शिरडीतील चालता बोलता देव अनेकाना देवपण देवून पार्थीव रूपात चैतन्यमय आहे. हा सत्+चित्+आनंद रूपी ज्ञान सूर्य शिरडीत तेजाने तळपत आहे. त्याचा प्रकाश जगभर पसरला आहे. हा प्रकाश जसे डोळस (ज्ञानी) अनुभवतात तसेच अंधसुद्धा (अज्ञानी) अनुभवू शकतात. ज्ञान पुस्तकातून वाचता येते ते मिळविता येत नाही, शाळा कॉलेजातून ते गुरुमुखाने समजावून घ्यावे लागते. तसेच अध्यात्मविद्या पुस्तके वाचून गळी उतरत नाहीत मी वर म्हटल्याप्रमाणे ज्ञानभांडार अपार आहे ते आत्मसात करण्यास आयुष्य

अपुरे पडेल म्हणून निराश होण्याचे कारण नाही. श्री साईसत्चरित्र भक्तीभावे मनापासून वाचावे श्री साईंचे सतत चिंतन करावे, त्यांची शिकवण आचरणात आणावी. श्री दासगणू महाराजांची रत्नवत मंजिरी नित्याचे पाठांत असावी सर्व जीवमात्र, विषयी दया प्रेम बंधुभाव असावा. जमल्यास हा दयाधन करूणासागर श्री साई शिरडी क्षेत्री जावून डोळे भरून पहावा तो आपले हृदयात साठवावा इतरत्र तो निरंतर आठवावा म्हणजे 'अवघाची संसार सुखाचा करीन॥ आनंदे भरीन तिन्ही लोकी॥

## साई साई दुमदुमे किर्ती

साई साई दुमदुमे किर्ती
नित्य लाभे भाविका स्फूर्ती ॥धृ.॥
नगर जिल्हा शिरडी गांव
जाता स्थळा येई अनुभव
दूर संकटे ठेविता भाव
रम्य परिसर प्रशांत मूर्ती ॥१॥
भाविक भक्त सात्वीक वृत्ती
बाबा देती अद्‌भुत शक्ती
भेटती बाबा येते प्रचिती
अगणित जन दर्शना येती ॥२॥
जगी आले मानव रूपा
निस्सीम प्रेम केली कृपा
भक्तीमार्ग दिधला सोपा
समाधी स्थिरावली प्राण ज्योती ॥३॥
सकळ धर्माचे जन सहवासात
स्वये घेवुनी रमले जगात
येता प्रसंग चमत्कार बहुत
सोज्वळ कृती तोषविली तृप्ती ॥४॥
धन्य तिर्थ महिमा महान
फुटती भक्त सुख समाधान
साध्य होण्या मंगल ध्यान
सप्रेमे करिती पूजा आरती ॥५॥

— श्री. अ.प. गुजर
सेक्टर नं. ७ बिल्डींग ११/२५६
अॅन्टॉप हिल वडाळा मुंबई ४०० ०३७

## शिरडीचे बाबा साई

शिरडी आहे गांव लहान
बाबांचे ते क्षेत्र महान
खंडोबाचे देऊळ मोठे
म्हाळसापती होते तेथे-,,-
बाबा येती शिरडी गांवी
पती वदले "यावे साई"
तेंच नाव ते प्रसिद्ध झाले
सकल जनांना समजून गेले-,,-
तेथे आहे मशिद माई
दर्शन घेण्या होते घाई
चावडीवरी बाबा बसती
भक्त जाऊनी दर्शन घेती-,,-
पालखीचा सोहळाच मोठा
आनन्दाला नसेच तोटा
दाटी भक्ती जनांची होते
तरी पालखी दर्शन मिळते-,,,,-

— सौ. प्रज्ञा ब्रीद
२६ नवयोजना सदन
ताडदेव, मुं. ३४

# श्री साईबाबांचे आदर्श विचार व उपदेश

— कु. सुधा लक्ष्मण पाटील
महेश कृपा चाळ, लोकमान्य नगर,
ठाणा - ४०० ६०६

श्री साईबाबांनी भक्तांना दिलेली अमृत वचने आज कित्येकांना अनुभवास येत आहेत. याचे साईलीला मासिक अक्षरशः बोलके प्रतिक आहे. श्री साईनाथ साठ वर्षापर्यंत शिरडीत राहून त्यांनी आपल्या भक्तांना अनेकविध लीलांनी भारून टाकले. श्री साईबाबा भक्तांच्या विवंचना दूर करण्यासाठी सदैव झटत असत. त्यांची अग्नी, वारा, पाऊस यांच्यावरही सत्ता चालत असे. श्री साईनाथ हे अंतर्यामी होते. त्यामुळे त्यांना कोणतीही गोष्ट आगाऊ समजत असे. ते हिंदूंना सोज्वळ ब्राम्हण तर मुसलमानांना यवन दिसत. त्यांनी द्वारकामाईत हिन्दू-मुस्लिम बांधवांना एकत्र आणून व त्यांच्या समवेत दररोज सहभोजन करून त्या सर्वांना "सबका मालीक एक आहे" हे पटवून दिले.

श्री साईबाबांची उपदेश करण्याची पद्धत वेगळी होती. ते कधीही कोणाला प्रत्यक्ष बोलत नसत तर दुसऱ्यांसंबधी बोलून ते त्या माणसाला सुचवित असत. मुक्या प्राण्यांवर दया केल्याने त्यांना समाधान होते. बाबांनी स्वतःच्या हातांनी अनेक दुःखीतांची दुःखे, आजार दूर केले आहेत.

श्री साईबाबा हे ईश्वरी अवतार असूनही त्यावेळच्या अनेकांना ते एक साधे फकीर वाटत असत. परंतु महाराज आनंदनाथ व गंगागीरबाबा संत या दोघांनाच साईचे सामर्थ्य माहित होते. परंतु ज्यावेळी साईबाबांनी दिवाळीच्या दिवशी तेलविना पणत्या पेटवून तेथील गावकऱ्यांना चकित केले. त्यावेळे पासून साईबाबा हे साक्षात अवतारी परमेश्वर जाणून तेथील 'शिर्डीवासीयांनी व प्रतिष्ठीत लोकांनी त्यांच्या चरणी मस्तक ठेवले.

श्री. साईबाबांनी कृपण माणसाला धिक्कारले आहे. पैशासाठी खोटी तळमळ केलेली त्यांना पटत नसे. स्वकष्टाने मिळविलेल्या पैशातच समाधान मानावे असे ते सदैव उपदेश करीत असत. ब्रम्हज्ञान मागण्यासाठी आलेल्या कृपण माणसाला बाबांनी त्याच्या जवळचे पाच रुपये मागून घेऊन त्याला द्रव्यलोभापासून मुक्त केले. हे पाच रुपये म्हणजे काम, क्रोध, मोह, मद, मत्सर हे होत. अशा प्रकारे बाबांची उपदेश करण्याची पद्धत होती. ज्यांच्याजवळ भरपूर पैसा आहे अशांनी स्वतःच्या चैनीसाठी खर्च न करता गोरगरिबांनाही सहभागी करा असे ते सदैव सांगत. म्हणूनच बाबांनी त्यांच्या श्रीमंत अधिकारी व्यक्तींना उदा. नानासाहेब चांदोरकर, बापूसाहेब जोग, गोपाळराव बुट्टी, हरि सिताराम दिक्षीत यांना आपल्याजवळचा पैसा सत्कारणी लावण्यास प्रवृत्त केले.

साईबाबा भक्तांकडून जी दक्षिणा घेत त्याचा उपयोग ते स्वतःसाठी न करता गोरगरिबांना वाटून टाकत. याचाच अर्थ ते सर्वांना दान करण्यास प्रवृत्त करत असत. त्यांनी सांगितलेल्या श्रद्धा-सबूरी या महामंत्राने आज सर्वांचे भले होत आहे. आजही साईबाबा

चराचरी वास करून आहेत. त्यांनी योगशक्तीने पेटविलेल्या धुनितील उदीने आजही अनेकांची दुःखे दूर होत आहेत.

साईबाबा निंबवृक्षाच्या छायेत बालमूर्ती रूपात प्रगट झाले त्यावेळी तेथील अनेकांनी त्यांचा जन्मठिकाणचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचा थांगपत्ता अद्यापही कोणाला लागलेला नाही, आणि कधीही लागणार नाही. कारण दयाघन परमेश्वर शिर्डी गावी अवतरले. श्री साईनाथ आजही भक्तांच्या पाठीशी गुप्त रीतीने राहून त्यांना संकटमुक्त करून अंतर्धान पावत आहेत. याची प्रचिती अनेकांना येत आहे. श्री. साईबाबांनी आपल्या वचनात म्हटले आहे तुम्ही कोठेही असा, मला अनन्यभावाने हाक मारा. मी सदैव तुमच्या पाठीशी उभा आहे.''

अशा या श्री सद्गुरु साईबाबांच्या चरणी शतशः प्रणाम.

# नित्य मी जीवंत जाणा हेची सत्य

— श्री या.ना. यम्पलवार
सेवानिवृत्त मुख्याध्यापक
पूर्व माध्यमिक शाळा निमगाव
जिल्हा - चंद्रपूर

प्रभाकर या माझ्या मोठ्या मुलाचे पोटात प्लीहा वृद्धी होऊन बरेच दिवस झाले त्याचे ऑपरेशन करिता नागपूर मेडिकल कॉलेज मध्ये अनेक वाऱ्या झाल्या शेवटी बाबांना साकडे घातले त्या वेळेस ऑपरेशन झाले पाहिजेच त्या प्रमाणे बाबांच्या कृपेमुळे दि. २४।८।८५ ला निर्विघ्नपणे ऑपरेशन पार पडले प्रकृती सुधारणा होत गेली, परंतु एकाएकी दि. १३।९।८५ ला प्रकृती बिघडली की एकदम मृत्यूच्या दाढेतच मुलगा जावून पोहचला. शेवटी बाबाचा धावा सुरू करून श्रीसाईबाबा तूच मुलाचा रक्षणकर्ता आहेस असे म्हणून बाबांवर भार टाकला मुलगा जगणे अशक्य होऊन गेले. डॉक्टरनी सांगितले की तुमचा मुलगा दोन तासात जाईल. लगेच बाबांची उदी त्याच्या तोंडात टाकली आणि बाबांवर विश्वास टाकला लगेच बाबांनी हाकेला ओ दिली. दुसरे दिवशी दि. १४।९।८५ ला मुलगा थोडा शुद्धीत आला प्रकृतीस थोडा थोडा आराम होत जावून दि. २७।९।८५ ला मेडिकल मधून सुट्टी मिळाली आज प्रकृती फारच अशक्त आहे ती बाबाचे कृपेने बरी होईल अशी दृढ आशा बाळगतो

माझ्या मुलास यमाच्या दाढेतून श्री साईबाबांनीच ओढून आणून माझे स्वाधीन केले हे अगदी सत्य आहे.

माझा दुसरा अरूण मुलगा एम.ए.च्या परिक्षेत सेकंड यावा म्हणून श्री बाबांना अट्टाहास पूर्ण साकडे घातले असता श्री साईबाबांनी ही माझी अट पूर्ण केली.

सेकंडमध्ये आलेल्या मुलास नोकरी मिळून पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्याबाबत श्री बाबांजवळ हात पसरला असता ही सुद्धा बाब बाबांनी पूर्ण केली तो आज गोंडपिंपरी येथे जनता विद्यालयात हायस्कूल शिक्षक आहे.

जरि हे शरीर गेलो टाकून। तरी धावेन भक्तासाठी
हे सत्य पटले.

जगद्गुरु भगवान श्री साईबाबांचे पवित्र चरणाचे पुन्हा एकदा स्मरण करून व बाबांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानून हा लेख मी बाबाचे चरणावर अर्पण करतो.

# बाबांविषयी माझा अनुभव

**—श्री लक्ष्मण रा. कडव,**
ठाकुरद्वार, मुंबई नं. ४०० ००२

माझा बालपणापासून परमार्थाकडे ओढा असल्यामुळे त्या काळात बरेच साक्षात्कार झाले. काही वर्षापूर्वी झालेला एक साक्षात्कार देत आहे.

बालपणापासून आर्थिक परिस्थिती गरीबीची व कष्टमय जिवन गेले. असेच एकदां अस्वस्थ परिस्थितीत असता एके दिवशी साईबाबांचा मला फार राग आला व मी मनातच त्यांना म्हणालो "तुम्ही भोंदूबाबा आहांत गरीबाकडे तुम्ही पहात नाहीत, मोठा हार, पेढे, बरफी देणाऱ्यावर तुम्ही खुष असतां आमच्या सारख्या गरींबाकडे तुम्ही लक्ष देत नाहीत, आम्ही फक्त पुजाच करू शकतो. पुजाअर्चा केल्याशिवाय कधीं ऑफिस मध्ये गेलो नाही किंवा तुमची आठवण केल्याशिवाय कधी अन्न घेतले नाही" थोड्याच कालावधीनंतर साक्षात्कारांना सुरूवात झाली. माझ्या मुलीची इनकमटॅक्समध्ये प्रेसवाली एक मैत्रिण आहे. तिने तिला साईबाबांचा आर्शिवाद देणारा "१२×१५" चा एक फोटो दिला. मुलीने तो फोटो मला दिला व म्हणाली भाऊ हा फोटो तुम्ही भरून घ्या व हार घाला. मला फार आनंद झाला. बाबांचा आर्शिवाद देणारा फोटो मला मिळाला मग आपल्याला काय चिंता, अशा धुंदीत असतां मी तो फोटो सदाशिव लेनमध्ये एका फोटोफ्रेम वाल्याकडे दिला. दोन, तीन वेळा चौकशी करून सुद्धा मला तो मिळाला नाही चौथ्या खेपेला रस्त्यातून विचार करीत जात असतां एक गृहस्थ धांवतच माझ्याकडे आले व मला हात दाखवून म्हणाले "What you can see in my hand? There is some thing in my hand which I can give you. Everything is in the hands of this God." मी तर चकीतच झालो. ते गृहस्थ चालतच राहीले, बरेच चालून गेल्यावर, मागे वळून माझ्याकडे पाहिले, तेव्हा माझ्या लक्षात आले की हे साईबाबा तेवढ्यात ते

पटकन पुढे सरकले. तो पण फोटो मी भरून घरात लावला. त्यांना -"इन्कमटॅक्स" बाबा" व अगोदरच्या फोटोस मंत्रालय बाबा' असे म्हणतो. कांही दिवसानी (सन- १९७४) माझे रजेवर गावी जाण्याचे ठरविले. चार मुले कॉलेजमध्ये शिकत असता आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्यामुळे १२ वर्षे गावी जाणे झाले नाही. घर नादुरूस्त होऊन, माझी खोली पडून माफ जमीनदोस्त झाली. आमच्या पुढे रहाण्याचा मोठा प्रश्न उभा होता. मी मंडळीला म्हटले. माझा जन्म व बालपण इथेच गेले असल्यामुळे कोणीतरी तात्पुरता रहायला जागा देण्याचे नाकारणार नाही. घाबरण्याचे कारण नाही. आम्ही बोटीने निघालो होतो व पहाटे ४ वाजता मालवणला पोहोचलो. पहाटे भाडोत्र्याच्या खोलीत झोपलो. सकाळी घराच्या बाहेर उभा असता शेजारचे ओळखीचे असे एक गृहस्थ मला म्हणाले "बाबा तुझी रहाण्याची सोय आमच्याकडे केली आहे. जमीन सारवून ठेवली आहे. आंघोळ करून आमच्याकडे चहाला सुद्धा ये. आम्ही त्यांच्याकडे गेलो त्यांची बायको सायंकाळी म्हणाली, "साईबाबा २-३ दिवसापूर्वी म्हणाले होते की मुंबईहून माझा एक भाऊ तुझ्याकडे रहायला येणार आहे. त्याच्याबरोबर एक माऊली असेल त्याला जागा दे नाही म्हणू नकोस. या गोष्टीचा तिला मागाहून उलगडा झाला.

परमेश्वर प्रत्येक अणुरेणूत आहे. मानवप्राणी, पशूपक्षी, जनावरे यांच्यात आहे आपल्या मनातील भावना, विचार व कार्य सर्व त्याला समजते. आपण अडचणीत असतां त्याची आठवण केल्यावर तो मदतीला धावून येतो. याचे प्रात्यक्षिक दाखविले ते इथे देत आहे.

बाबाच्या घरापासून (एक तरुण ब्रम्हचारी ज्यांच्या अंगात बाबा संचारत असत) कांही अंतरावर रहाणाऱ्या एका बाईने बाबांना आपल्या घरी येण्याची विनंती केली. बाबांनी विनंती मान्य केली व म्हणाले मी तुझ्याकडे अवश्य येईन हो. बाब बरेच दिवस आले नाहीत म्हणून ती म्हणाली बाबा तुम्ही माझ्याकडे येण्याचे कबूल केले होते ना, तुम्ही आले नाहीत. बाबा म्हणाले, "मी तुझ्याकडे आलो होतो त्यावेळी तू शेजारणीशी बोलत बसली होतीस "बाजारात ताजे बांगडे आले आसत रुपयाक चार, लवकर जावक होया नायतर खपून जातले" मेल्या तुझी टरटर कशाक जा कसो" असे म्हणून मला हाकलले. बाई म्हणाली, बाबा माफ करा चुकले माझे"

आम्ही मालवणहून परत मुंबईला यावयास निघालो. बाबा म्हणाले आंगण्याची जत्रा केल्याशिवाय जाऊ नका. पण आम्ही रजा संपल्यामुळे मुंबईस निघालो. बोटीचे तिकीट माझ्या? मित्राने दिले. समुद्र शांत होता. आम्ही पडावात बसलो आणि येवढ्यात जोरदार वादळ सुरू झाले. परिस्थिती एवढी आली की यांत्रिक पडावाला बांधलेला आमचा पडाव सुटून भरकटला व आंतील बायका मुले खलाशी वगैरेनी आरडाओरडा करायला सुरुवात केली. कांही लोकांनी माझे पाय पकडून ठेवले. मला मात्र कसलीच भिती वाटली नाही. मोठ्या प्रयासाने खलाशानी पडाव बोटीला बांधला व आम्ही मालवणहून थेट मुंबईला आलो. बाबानींच सर्वांना या संकटातून वाचवले. ●

# देव भाव भक्तीचा भुकेला

— लक्ष्मण बापूराव रापतवार
रिटायर्ड ड्राफ्समन जिल्हा नांदेड

भाऊ कबर हा संत गजानन महाराजांचा निसीःम भक्त. त्याच्या वडीलाचा अकोल्यात सराफीचा धंदा होता. भाऊ हैद्राबादेत मेडिकल कॉलेज मध्ये शिकत होता. सुट्टीत तो अकोल्यास आला. त्याच्या मनात महाराजांस भोजन घेऊन शेगावी जाण्याचा होता. परंतु आई नसल्यामुळे तो उदास होऊन बसला. त्याचा चेहरा उदासीन झालेला पाहून त्याची भावजय ''नानी''ने कारण विचारले. भावजय आईसमान असते तिला कोणतीही गोष्ट लपवू नये आज तू उदासीन का दिसतो ते मला सांगावे तेव्हा भाऊ कवरने आपले मनोगत व्यक्त केले. नानीने लवकर लवकर स्वयंपाक करून ज्वारीच्या भाकरी, अंबाड्याची भाजी, बेसन, कांदा, मिरची बांधून शिदोरी दिराजवळ दिली.

भाऊ लगबगीने अकोला स्टेशनवर आला परंतु त्याच्या पाच मिनीट अगोदरच गाडी निघून गेली. भाऊचे उत्साही मन हिरमुसले तो खिन्न झाला. त्याच्या डोळ्यात आश्रू भरून आले. दुसरी गाडी येईपर्यंत तो उपाशीच स्टेशनावर बसून राहिला. नाना तऱ्हेचे विचार त्याच्या मनात येऊ लागले. दुसरी गाडी येण्यास तीन तासाचा अवकाश होता. सद्‌गुरुने आपला आव्हेर केला असे त्याच्या मनास टोचू लागले. तो रडतच राहिला.

इकडे शेगावात भक्तांनी गजानन महाराजांची दुपारची आरती केली व नाना पक्वानाची ताटे नैवेद्य आणून ठेवली. महाराजांनी एकही नैवेद्यास हात लावला नाही. भक्तांनी आग्रह केला तेव्हा महाराज म्हणाले आज मी चौथ्या प्रहरी भोजन करील. महाराजाने नैवेद्याचा स्वीकार न केल्यामुळे सर्वजण उपाशीच राहिले. तीन तासानंतर गाडीने भाऊ कवर उतरला व शिदोरी घेऊन धावतच महाराजांजवळ आला. महाराज हसून त्यास म्हणाले हीच आमंत्रण देण्याची तुझी रीत आहे का मला तुझ्या भाकरी करता आतापर्यंत उपाशीच रहावे लागले. आण लवकर शिदोरी दे, म्हणून महाराजानी दोन भाकरी अंबाड्याच्या भाजी बरोबर खाल्ल्या व एका भाकरीचा प्रसाद सर्व भक्त मंडळीस वाटला. भाऊ कवरचे मनोगत पूर्ण झाले होते. त्याने साष्टांग दंडवत घातले व डोळ्यातून आनंद अश्रू वाहू लागले. इतर सर्व भक्तगण आश्चर्यचकीत झाले. पक्वानानी व मिठाईने ताटे भरलेले होते परंतु महाराजाने त्यास स्पर्श सुद्धा केला नाही व भाऊ कवरच्या भाकरी करता उपाशी राहिले. त्या ज्वारीच्या भाकरीत भक्ती श्रद्धा भरलेली होती. -तर नैवेद्यात त्याचा अभाव होता हेच खरे.

श्रीकृष्णाचे सुदामाचे पोहे आवडले तर प्रभू रामचंद्रांना शबरीने उष्टी बोरे खाऊ घातली, व त्यांनी ती आनंदाने खाल्ली कारण भक्तीभावाची गोडी भरलेली होती.

त्याचप्रमाणे शिरडीत तात्या गणपत कोते पाटील याची आई बायजा बाईने दोन उन्हात दोन दोन कोस जंगलात भटकत फिरावे व एखाद्या ओढ्याच्या ठिकाणी झुडपात ध्यानमग्न स्थितीत शांतपणे बसलेल्या बाबांच्या पुढे केळीच्या पानात डोक्यावरची टोपली

खाली उतरून भाजी, भाकर , कांदा आग्रह करून खाऊ घालावे. बायजाबाईची चिकाटी आणि भक्ती खरोखरच कौतुकास्पद होती. बाबानी अन्न ग्रहण केल्याशिवाय स्वतः भोजन करावयाचे नाही हा नियम तिने मरेपर्यंत पाळला. ती व तिचा मुलगा दोघे ही बाबास देव म्हणूनच समजत त्याचे फळही बायजाबाई व तात्या कोते यांना मिळाले व ते मोक्षपदास पोहचले.

इ.स. १९१० नंतर चांदोरकरांच्या प्रचारामुळे व दासगणूच्या कीर्तनाने साईबाबांनी किर्ती चोहोकडे पसरली व दर्शनाकरता भक्तांची रीघ लागू लागली. पूजा, अर्चा, नानातऱ्हेच्या पक्वानाचे नैवेद्य लोक दाखवू लागले. परंतु भक्ताचा भाव पाहून साईबाबा प्रसाद म्हणून अगदी लहान वस्तू देखील अत्यंत प्रेमाने मागून खात होते. तर्खडाच्या पत्नीने पुरंदरेबाई बरोबर दोन वांगी मुंबईहून शिर्डीस पाठविली व एकाचे भरीत व दुसऱ्या वांग्याच्या कचऱ्या तळून देण्याची विनंती केली. पुरंदरे बाईने भरीत करून नैवेद्याचे ताट नेले तेव्हा बाबा म्हणाले कचऱ्या कुठे आहेत. बाबा सर्वज्ञ होते पुरंदरे बाईनी तावडतोब कचऱ्या तळून आणून ठेवल्या त्या बाबानी प्रेमाने खाल्ल्या. तसेच तर्खडबाईने गोविंद बरोबर पेढा पाठवला होता व तोही त्याने द्यावयाचा विसरला बाबानी मला दिलेला पेढा कोठे आहे म्हणताच गोविंदाने बिऱ्हाडी जाऊन पळतच बाबाच्या हातावर ठेवला बाबानी तो पेढा एकाच घासात खाऊन टाकला. खापर्डे साईबाबाचे परमभक्त ते पत्नीसह सात महीने शिर्डीत येऊन बाबाची सेवा करीत राहिले. खापर्डे यांची पत्नी बाबाने नैवेद्य स्वीकारल्याशिवाय अन्नग्रहण करीत नसत. एके दिवशी बाबांनी नैवेद्याची सर्व ताटे सोडून खापर्डे बाईचे ताट ओढून घेतले व आस्तीन्या वर करून सांजा, शिरापुरी, भात, वरण, पापड वगैरे सर्वच खाऊन टाकले. खापर्डे बाईच्या मनास त्या वेळी जो आनंद झाला त्याचे काय वर्णन करावे.

लक्ष्मीचंदाने आणलेले पेरू, बाबानी आनंदाने खाल्ले. बऱ्हाणपूरात एका बाईस स्वप्नात खिचडी खाऊ घालण्याचा दृष्टांत झाला. तिचा पती टपालखात्यात ऑफिसर होता त्याची बदली अकोल्यास आल्यावर दोघेही शिर्डीस दर्शनास आले. ती बाई खिचडीचा नैवेद्य दाखवावा म्हणून उतावीळ होती. नाना तऱ्हेचे लोकांचे पक्वानाचे पंधरा ताट येत होते. शेवटी तिला राहवले नाही व पंधरा दिवस वाट पाहून ती पंधराव्या दिवशी बाबाची भोजनाची पंगत बसली असता पडदा सारून खिचडीचे ताट पुढे केले. बाबानीही फार आतुरतेने ते ताट घेतले व आज खिचडीही खायेंगे म्हणून संपूर्ण ताट रिकामे केले. त्या बाईस आनंदी आनंद झाला. कोण्या भक्ताने पाठवलेल्या वाल पापडीच्या शेंगाच खाल्ल्या. लक्ष्मीबाई शिंदे अती श्रद्धाळू शिर्डीतच राहत होती. तिने आणलेले शेवायाचे ताट ओढून बाबानी खाऊन टाकले व तिचे मनोरथ पूर्ण केले.

साईबाबा परमेश्वराचे अवतार त्यांना पदार्थाची रूची अथवा गोडी नको होती. त्यात भक्ती श्रद्धेची गोडी हवी होती व ते ओळखूनच बाबा खऱ्या भक्ताचे मनोरथ पूर्ण करीत असत, व आताही करतात. जया मनी जैसा भाव। तया तैसा अनुभव। आता ही लोकाना येतच आहे म्हणून दिवसेंदिवस भक्तांची संख्या वाढत आहे.

# शिरडी वृत्त
# माहे — ऑक्टोबर १९८५

या महिन्यात श्री साईबाबांचा पुण्यतिथी उत्सव आल्याने बाहेरगांवचे साईभक्तांची गर्दी जास्त प्रमाणात होती.

दसरा उत्सव १ ला दिवस - सोमवार दि. २१.१०.८५ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५.१५ वा. काकडआरती झाली. आरती संपल्यानंतर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत आली. त्या ठिकाणी साई सच्चरित अध्यायवाचनास सुरवात झाली. सकाळी ६.३० वा. श्रींचे स्नान झाल्यानंतर नित्यकार्यक्रमा व्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ ह.भ.प. सौ. सरोज बर्डे, मुंबई यांचे कीर्तन झाले. सायंकाळी धुपारती झाल्यानंतर ७.३० ते ९.०० व ११.३० ते पुढे श्री. अनंत एस. दामले मुंबई यांचा गायनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ९.१५ ते ११.१५ पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक निघाली. मिरवणूक वाद्यांच्या गजरात फिरून आल्यानंतर शेजारती झाली.

उत्सवाचा मुख्य दिवस - मंगळवार दि. २२.१०.८५, पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५.१५ वा. काकड आरती सुरू झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून निघून गुरुस्थानमार्गे समाधी मंदिरात आली. नित्यकार्यक्रमा व्यतिरिक्त ९ वा. भिक्षा झोळी कार्यक्रम सुरू झाला. संस्थान विश्वस्तांसाठी १० व साई भक्तांसाठी २० झोळ्या ठेवण्यात आल्या होत्या. विश्वस्तांनी आपसात ठरवून झोळ्या घेतल्या व भक्तांसाठी, झोळी घेऊ इच्छिणाऱ्या भक्तांची नावे नोंदवून सोडत पद्धतीने २० भाग्यवान भक्त निवडण्यात आले. त्यांना मंदिर प्रमुख श्री. वि.वि. बागवे यांनी त्यांची नावे नोंदवून झोळ्या दिल्या. शिर्डी गावात घरोघर भिक्षेसाठी गेल्यावर सुवासिनींनी श्रींच्या निशाणाची पूजा आरती करून भिक्षा झोळीत गहू, ज्वारी, बाजरी, तांदूळ, फळे, नारळ, पैसे अशी भिक्षा यथाशक्ती अर्पण करून प्रसाद घेतला. झोळी कार्यक्रम संपल्यानंतर धान्य संस्थानमध्ये नोंद करून जमा केल्यावर झोळ्या मंदिर प्रमुखाकडे जमा केल्या. सकाळी १०.३० ते १२.०० ह.भ.प. सौ. सरोज बर्डे, मुंबई, यांचे श्री साईबाबा पुण्यतिथी आख्यान कीर्तन झाले. त्यानंतर मध्यान्ह आरती झाली. व तीर्थप्रसाद वाटण्यात आला.

दुपारी १ ते ३.०० वाजेपर्यंत श्रींचा आराधना कार्यक्रम झाला. ब्राम्हणांना धोतर उपरणे, सुवासिनींना खण व सेवेकऱ्याना धोतरजोडी व कपडे देण्यात आले. सायंकाळी ५ वा. सिमोल्लंघन मिरवणूक वाजतगाजत खंडोबाचे देवळाजवळ गेली. त्या ठिकाणी श्रींचे निशाणाची व शमीची पूजा झाल्यानंतर सोने लुटण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर उपस्थित साईभक्तानी खंडोबा देवाचे दर्शन घेतले व मिरवणूक परत येतेवेळी गावातील सर्व मंदिरात जाऊन देवतांचे दर्शन घेतले.

रात्रौ ९.१५ ते १२.०० पर्यंत श्रींच्या रथाची गावातून भव्य मिरवणूक निघाली होती. मिरवणुकीला श्रीकृष्ण बॅण्डपथक, मुंबई अग्रभागी होते. सनई, चौघडा, डफ व राहाता येथील बॅण्डपथक बरोबर होते. साईभक्तांचे भजन, गायन, वादन, कार्यक्रम झाले.

श्री. रघुनाथ वाबूराव सांडभोर, सिने-कलाकार पुणे यांचा भारूड कार्यक्रम झाला. ग्रामस्थांनी गारूड-भारूड कार्यक्रमात भाग घेतला. रथाची मिरवणूक रात्रौ १२.०० वा. समाधी मंदिरात आली. व भक्तांनी कलाकारांचे गायनाचे कार्यक्रमात भाग घेतला. रात्रभर हजेऱ्या झाल्या. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले होते.

दसरा उत्सव ३ रा दिवस — शेवटचा दिवस बुधवार दि. २३.१०.८५, पहाटे ६ वा. श्रींचे मंगल स्थान झाले. गुरुस्थान ठिकाणी सकाळी ७.३० ते ८.३० रुद्राभिषेक झाला. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी १०.३० ते १२.०० ह.भ.प. सौ. सरोज बर्डे मुंबई यांचे कालाकीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर मध्यान्ह आरती झाली व तीर्थप्रसाद वाटण्यात आला. धुपारतीनंतर रात्रौ ७.३० ते १०.०० पर्यंत कु. कीर्ती शिलेदार पुणे यांचे गायनाचा कार्यक्रम झाला. १० वा. शेजारती झाली. शेजारती नंतर मंदिराबाहेर शांती निवासजवळ स्टेजवर ''घराबाहेर'' हे तीन अंकी नाटक नाट्य रसिक संच शिर्डी यांनी सादर केले. व उत्सव समाप्त झाला.

कोजागिरी पोर्णिमा — रविवार दि. २७.१०.८५ रोजी रात्रौ ८.०० ते १०.०० कलाकारांची हजेरी, १० ते ११.०० कीर्तन, कार्यक्रम कै. डॉ. के.बी. गव्हाणकर आणि पार्टी, कुर्ला मुंबई यानी केला. रात्रौ १२.०० श्रीसाईबाबांची पूजा पुरोहीत यांनी व चंद्रपूजा कार्यक्रम मा. कार्यकारी अधिकारी श्री. रा.द. बन्ने साहेब यांचे हस्ते झाला. १२.०० वा. शेजारती झाल्यानंतर मंदिर बंद झाले. उपस्थित भक्तमंडळीना दूध, पोहे वगैरे प्रसाद वाटण्यात आला. मंदिराबाहेर शांतीनिवासजवळ स्टेजवर रात्रौ १२.३० ते सकाळी ६ वाजेपर्यंत डॉ. के.बी. गव्हाणकर आणि पार्टीतील सहकाऱ्यांनी ''गाढवाचे लग्न'' हा लोकनाट्य कार्यक्रम सादर केला.

या महिन्यात कलाकारांनी खालीलप्रमाणे हजेरी दिली.

कीर्तन :- १) ह.भ.प. गजानन महाराज कराडकर, नरसिंगपूर (सांगली)
२) ह.भ.प. सौ. सरोज बर्डे, मुंबई.
३) ह.भ.प. सौ. पद्मजा सहस्त्रबुद्धे, घाटकोपर.
४) ह.भ.प. श्री. लक्ष्मण आनंदा मिरजकर, इस्लामपूर.

**प्रवचन :-** ह.भ.प. श्री. लक्ष्मण महाराज वाकचौरे. शिर्डी. भजन, गायन, वादन, नृत्य, नाट्य इ. १) श्री. रतनलाल शर्मा, नागपूर. २) श्री. काशीनाथ महादेव परब, मुंबई. ३) सौ. आसावरी वायकूळ, मुंबई. ४) श्री सत्य साई सेवा समिती श्रीफळहस्ती (आं.प्र.). ५) श्री. अजित कडकडे, सांताक्रुझ. ६) श्री. जगदिश मयेकर, मुंबई. ७) श्री. दत्ताराम रामकृष्ण जोगदंडे, मुंबई. ८) श्री. कृष्णाचार्य, मुंबई. ९) श्री. सदानंद वासुदेव कुळकर. १०) श्री. गोपाळ सुर्वे. मुंबई. ११) श्री. रामजान शहनाई पार्टी, जबलपूर. १२) श्री. श्रीराम व्ही. सातर्डेकर, परेल. १३) डॉ. एम. के. कीर्तीकर, मुंबई. १४) श्री. अनंत शंकर दामले, मुंबई. १५) सौ. सुशीला अनंत दामले. १६) श्री. अनंत के. थत्ते. १७) श्री. भारत अनंत दामले. १८) श्री. बाबूराव कुलकर्णी. १९) श्री. अनंत राणे, मुंबई. २०) श्री. गंगाधर धोंडीबा जाधव, पुणे. २१) श्री. भोलानाथ रामनाथ

समेळ, मुंबई. २२) श्री. नारायण क्षीरसागर, चिकलठाणा. २३) श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे. २४) श्री. संजय विठ्ठल माडीवाले, राजगुरूनगर. २५) सौ. शरयू साईदास मराठे, शिर्डी. २६) श्री. दौलतभाई शर्मा, बोरीवली. २७) श्री. शाहू भोसले, भायखळा. २८) श्री. नंदकिशोर पुरोहित, बांद्रा. २९) श्री. सुरेश दीपाजी बांदरे, परेल. ३०) श्री. राकेश मधूर, मेनपूरी. ३१) ज्ञानोबा तात्या वाडेकर, शिरडी. ३२) श्री. सुभाष पु. बावकर, भांडूप. ३३) कुमार भरत नटवर, विस्पुते, शिर्डी. ३४) कु. शेखर नटवर विस्पुते, शिर्डी. ३५) श्री. हरकचंद चंद्रभान रुणवाल, आलेगांव. ३६) श्री. दत्तात्रय विठ्ठल घाग, घाटकोपर. ३७) श्री. ए.आर. गुरव, कोपरगांव. ३८) श्री. नाना गोविंद गवते, विटावा. ३९) श्री. किशोर लक्ष्मण प्रभू, मुंबई. ४०) श्री. सी.व्ही. प्रसाद, हैद्राबाद. ४१) श्री. विद्युत विष्णू नायक, मुंबई. ४२) श्री. अशोक चिंतामण राऊत, मुंबई. ४३) श्रीमती मधू सक्सेना, मेठापूरी. ४४) श्री. विश्वास पंडीत जोशी, खेड. ४५) श्री. रावसाहेब देशमुख, नाशिक. ४६) श्री. जे.सी. कोहली, शिर्डी. ४७) श्रीमती व्ही. गणेश अय्यर, मालाड. ४८) श्री. नामदेव नागू भोईर, नवघर. ४९) श्री. रामकृष्ण सखाराम सालकर, कोपरगांव. ५०) श्री. बी.एन. कुलकर्णी, वैजापूर. ५१) श्री. पुंजाबा भाऊराव दवंगे, मळेगांव. ५२) श्री. मोहन शिवराम दिनकर, सर्जपुरा. ५३) श्री. शेख नबाब उमरपटेल, अस्तगांव. ५४) श्री. अशोक राजाराम परब, कणकवली. ५५) श्री. नारायण शामराव राऊत, आपनी. ५६) श्री. वसंतरावर दामोदर रासने, पुणे. ५७) श्री. रघुवीर शांताराम मिराणे. ५८) श्री. प्रमोद बर्डे, मुंबई. ५९) श्री. फारुख सय्यद हलीप, शिर्डी. ६०) हुसेन इस्माईल शेख, शिर्डी. ६१) श्री. विजय पुंडलीक बांदेकर, शिर्डी. ६२) श्री. अरविंद बाबूराव पवार, मुंबई. ६३) श्री. वसंत शेवलकर, खामगाव. ६४) श्री. के. गोपाळ शेट्टी, साकरवाडी. ६५) श्री. हीरूभाई पटेल, साकरवाडी. ६६) श्री. टी.बी. चौधरी, अहमदनगर. ६७) श्री. ए.एस. थेटे, अहमदनगर. ६८) श्री. गो.रा. आबोडकर, लक्ष्मीवाडी. ६९) सौ. अनुराधा शामराव पिंपळगावकर, पुणे. ७०) कु. कीर्ती शिलेदार, पुणे. ७१) सौ. जयमाला शिलेदार. ७२) श्री. जयराम शिलेदार. ७३) श्री. हेमकांत नावडीकर ७४) नाट्य रसिक संच शिर्डी निर्माता भास्करराव गोंदकर सर. ७५) श्री. शांताराम मिराणे-दिग्दर्शक. ७६) श्री श्रीकृष्ण सेवा मंडळ, श्री. सदानंद विठ्ठल दळवी, मॅनेजर परेल. ७७) श्री. विवेक यादवराव मुळे, मुंबई. ७८) श्री. विलास बळवंतराव परळकर, मुंबई ७९) श्री. विलास राजाराम महाडिक, दादर. ८०) श्री. प्रदीप रासने, अहमदनगर. ८१) श्री.शशीकांत ए. दळवी. ८२) श्री. सतीश ना. राव, मुंबई. ८३) श्री. वसंतराव जोशी. ८४) श्री.बारकू (मारुती) मांडवकर. ८५) श्री. सुरेश अंजर्लेकर. ८६) श्री. नरेश नाईक. ८७) श्री.राजेंद्र राऊळ. ८८) सुनील साळवी. ८९) श्री. मुरलीधर महाराज देशमुख, शिर्डी. ९०) श्री.माणिक साळी, शिर्डी. ९१) श्री. शांताराम मिराणे, शिर्डी. ९२) श्री. मधुकर निवृत्ती भालेराव, शिर्डी. ९३) श्री. बारावकर काका. ९४) श्री. चतुर्धन नागरे. ९५) श्री. रघुनाथ नागेर, शिर्डी. ९६) श्री. गुलजार भजन मंडळी, हैद्राबाद. ९७) श्री. महेश हि. सावर्डेकर. ९८) श्री. सुरेश बाबूराव ठूमकर, पुणे. ९९) श्री. राजेंद्र

हरीभाऊ देशमुख, यवतमाळ. १००) श्री. सुभाष गणपत कवळीकर, पैठण. १०१) सौ. उज्ज्वला उमेश कुलकर्णी, दादर. १०२) श्री. रामदास पाटील, दादर. १०३) श्री. रमेश धनावडे. १०४) श्री.सुधाकर पवार. १०५) सौ. स्मीता नार्वेकर, बोरीवली. १०६) श्री. श्रीधर विडू. १०७) श्री.श्रीधर राणे. १०८) श्री. शशीकांत शंकर पुसाळकर, मुंबई दादर. १०९) अलका कृष्णराव सुर्वे, दादर. ११०) श्री. शाहीर सुखदेव कांबळे, मुंबई. १११) श्री. विनायक लाड. ११२) श्री. अनंत दत्ताराम पंचाळ, मुंबई. ११३) श्री. रविंद्र पांचाळ. ११४) श्री. एकनाथ बोभाटे, मुंबई. ११५) श्री. विलास परब, मुंबई. ११६) श्री. दिपक मोरे, मुंबई. ११७) श्री.महेश लाड, मुंबई. ११८) श्री. संदीप पंचाळ. ११९) कु. ज्ञान प्रसन्नाबा जगन्नाथ, हैद्राबाद १२०) श्री. गोपाळ, चौरसीया, कलकत्ता.

* **हवा पाणी** - शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

★★★★★★★★★

# शिरडी वृत्त

## माहे — नोव्हेंबर १९८५

या महिन्यात श्री साईबाबांचे दर्शनासाठी बाहेरगावची भक्तमंडळी बरीच आली होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे —

कीर्तन :- श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थानगवई, कीर्तनकार - प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली.

प्रवचन :- १) ह.भ.प. लक्ष्मण वाकचौरे, शिर्डी.

२) ह.भ.प. विठ्ठल बाबाजी महाराज हैद्राबाद.

भजन, गायन, वादन इ. :- १) श्री. रमणभाई बडोदा. २) श्री. आदिमाया शक्ती, शेगांव. ३) श्री. बाबूराव गोदुजी डोके, कामठी. ४) श्री. तुकाराम दैठणकर, पुणे. ५) श्री. मोहन दैठणकर. ६) श्री. अशोक माधव दैठणकर. ७) श्री. पी. अंजय्या. ८) श्री. एस. साईनाथ. ९) श्री. एस. शैलेंद्र कुमार. १०) श्री. एस. कल्पना विश्वनाथ, मारस्पल्ली. ११) श्री. राजेश नागजे, नासिक. १२) श्री. चंद्रकांत कामत, पुणे. १३) श्री.प्रभाकर दिनकर भैलूमे, अहमदनगर. १४) श्री. अनुराग श्रीवास्तव, मुंबई. १५) श्री. भक्त संगम, मुलुंड. १६) श्री. राजन कुमार, सायन. १७) श्री. अनिल पगारे, मुंबई. १८) श्री. मनमोहन कुंभारे, चंद्रपूर १९) श्री. किशोरबाबा जाधव, अचलेश्वर. २०) श्री. वसंतराव पाडणेकर, मुंबई. २१) श्री. मोहन शिरोडकर, मुंबई. २२) श्री. विश्वनाथ शिरोडकर, मुंबई. २३) कु. वंदना शिरोडकर, मुंबई. २४) कुमार तिलक टिकू, मुंबई. २५) श्रीमती चंद्राबेन भाटे, मुंबई. २६) ब्रम्हानंद भजनी मंडळ, हैद्राबाद. २७) श्री.नारायण बाबा, पनवेल. २८) श्री. शिवलिंगम, मुंबई. २९) श्री. प्रगती बॅण्डपथक, मुंबई. ३०) सौ. आसावरी वायकूळ, घाटकोपर. ३१) निनाद वायकूळ. ३२) साईनाथ भजनी मंडळ, शिर्डी. ३३) कु. लता नारायण रानेट, बोरीवली. ३४) श्री. पांडूरंग वामन

ोसले, परेल. ३५) सौ. मीना लागू, पुणे. ३६) कु. अरुणा महादेव लागू. ३७) कु. ंजिरी भालचंद्र कर्वे, पुणे. ३८) राजकुमार रिजवी, अंधेरी.

कार्तिकी एकादशी - सालाबाद प्रमाणे कार्तिकी एकादशी निमित्त शनिवार दि. २३.११.८५ रोजी रात्री श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून मिरवून आल्यानंतर ११.०० वा. शेजारती झाली.

तुळशी विवाह - रविवार दि. २४.१२.८५ रोजी सालाबाद प्रमाणे श्रींचे द्वारकामाईत तुळशीविवाह कार्यक्रम संपन्न झाला. संस्थान कर्मचारी व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुलांनी फटाके, भुईनळे वाजवून आनंद व्यक्त केला.

हवापाणी - शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. थंडीचे प्रमाण वाढले आहे.

*******

# "स्मरा निरंतर नाम श्री साईंचे"

**साई निरंतर नाम श्री साईंचे, जेणें रिद्धिसिद्धि येती घरीं ॥धृ. ॥**

साईनाम गोड "श्री साई समर्थ"
हरवोनी अमृता पैज जिंके।
याची नाम मात्रें कैक ते पतित
गेले हो तरत भव सागरी ॥१ ॥

या नामाची गोडी आहे हो अवीट
चाखोनीया नीट पहा तरी।
साईनाम स्मरणे चित्त होई शांत
दुःख व्याधी खंत जाती दुरी ॥२ ॥

नाम संकीर्तन साईंचे कराल
प्रसन्न होतील साईनाथ।
प्रसन्न होताची श्री साईनाथ
मनिचा भावार्थ पूर्ण करी ॥३ ॥

"ॐ साई समर्थ, श्री साई समर्थ"
हा मंत्र हो सार्थ जीवन करी
"नाथ प्रभू" म्हणे धन्य ते नर-नारी
मंत्र हा जयांच्या जिव्हेवरी ॥४ ॥

**— श्री द्वारकानाथ साबाजी प्रभू दाभोलकर**
५१/६ साईनाथ सोसायटी, सांताक्रूझ

# घोषणा

श्री साईलीला मासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीलाबद्दल दरवर्षी फेब्रुवारीनंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा.

| | | |
|---|---|---|
| १ प्रकाशनाचे स्थळ | — | साई निकेतन<br>८०४ बी डॉ. आंबेडकर मार्ग,<br>दादर, मुंबई ४०० ०१४. |
| २ प्रकाशनाचा कालावधी | — | मासिक |
| ३ मुद्रकाचे नाव | — | श्री. एम. डी. राजन, |
| राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| पत्ता | — | गीता ऑफसेट, बी - २३,<br>रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट,<br>नायगाव, क्रॉस रोड, वडाळा,<br>मुंबई ४०० ०३१. |
| ४ प्रकाशकाचे नाव | — | श्री. रा. द. बन्ने |
| राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| पत्ता | — | साई निकेतन<br>८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग,<br>दादर, मुंबई ४०० ०१४. |
| ५ संपादकाचे नाव | — | श्री. रा. द. बन्ने |
| राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| ६ हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागदार यांची नावे व पत्ते | — | श्री साईबाबा संस्थान<br>शिरडी<br>(धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, श्री. रा. द. बन्ने यानुसार असे घोषित करतो की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

श्री. रा. द. बन्ने
(प्रकाशकाची सही)
कार्यकारी अधिकारी

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|
| १. श्री साई चरित्र | मराठी | ३४-५० | ६-०० |
| २. —"— | इंग्रजी | २०-०० | ४-२५ |
| ३. —"— | हिन्दी | १६-०० | ४-२५ |
| ४. —"— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ५. —"— | तेलगू | १४-५० | ५-२५ |
| ६. —"— | तामीळ | १२-०० | ४-५० |
| ७. —"— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ८. गुजराथी पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-०० |
| ९. श्री साईलिलामृत | मराठी | ७-५० | ४-०० |
| १०. —"— | गुजराथी | ४-२५ | ४-०० |
| ११. अवतार व कार्य | मराठी | ६-५० | ४-०० |
| १२. स्तवन मंजिरी | मराठी | ०-३० | ३-५० |
| १३. —"— | गुजराथी | ०-३० | ३-५० |
| १४. सगूणोपासना | मराठी | ०-७० | ३-५० |
| १५. चार अध्याय | मराठी | १-२५ | ३-५० |
| १६. सगूणोपासना | सिंधी | १-२५ | ३-५० |
| १७. सचित्र साईबाबा | इंग्रजी | ३-४० | ३-५० |
| १८. मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | ३-५० |
| १९. —"— | इंग्रजी | २-०० | ३-५० |
| २०. —"— | तेलगू | २-५० | ३-५० |
| २१. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २२. गाईड टू होली शिरडी | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| २३. —"— | मराठी | १-५० | ३-५० |
| २४. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २५. तेलगु पुजाविधी | तेलगु | —— | —— |
| २६. रूद्राध्याय | मराठी | ०-९० | ३-५० |
| २७. साईबाबा ऑफ शिरडी बाय प्रधान | इंग्रजी | ३-०० | ३-५० |
| २८. साईबाबा ऑफ शिरडी वाय. पी. भरूचा | इंग्रजी | ६-५० | ४-०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

# श्री साईबाबा संस्थान शिरडी
## फोटोंची यादी

| अनु. फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|
| १. आशिर्वाद फोटो | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| २. —"— | १०" × १४" | १-१५ | ३-५० |
| ३. —"— | १०" × १२" | १-५० | ३-५० |
| ४. —"— | ७" × २०" | ०-६० | ३-५० |
| ५. —"— | ५½" × ६½" | ०-३५ | ३-५० |
| ६. —"— | ४" × ५" | ०-३० | ३-५० |
| ७. —"— | २" × ३" | ०-२० | ३-५० |
| ८. दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| ९. " " (काळापांढरा) | १४" × २०" | ०-८५ | ३-५० |
| १०. दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | ३½" × ५½" | ०-६० | ३-५० |
| ११. द्वारकामाई (रंगीत) | १७" × २२" | ५-७५ | ३-५० |
| १२. —"— | १४" × २०" | १-६० | ३-५० |
| १३. —"— | १०" × १४" | १-२५ | ३-५० |
| १४. समाधी फोटो | १३" × ९" | १-१५ | ३-५० |
| १५. —"— | ८" × ६" | ०-७५ | ३-५० |
| १६. —"— | ४" × २½" | ०-१० | ३-५० |
| १७. कॅमेरा फोटो (रंगीत) | ९" × १२" | १-६५ | ३-५० |
| १८. ऑफसेट फोटो | ९" × १३" | १-५० | ३-५० |
| १९. —"— | ५" × ७" | ०-४० | ३-५० |
| २०. दगडावर बसलेले बाबा (निळा) | ९" × १२" | ०-७५ | ३-५० |
| २१. मूर्ती फोटो (बुस्ट) | ३¾ × ४½" | ०-३५ | ३-५० |

मुद्रक : श्री.एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३ रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई ४०० ०३१.
संपादक व प्रकाशक :श्री.रा.द. बन्ने, साई निकेतन